मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर
रविवार, २० ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १२० | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
किंमत : ३ रुपये



जम्मू आणि काश्मीरला मिळणार पूर्ण राज्याचा दर्जा

पान 8

## विशेष संपादकीय

# तेली 'मातोश्री' दारी...



**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील स्वयंभू राजकीय नेते राजन तेली यांनी अखेर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. यामुळे राजन तेली यांच्या प्रवेशाबाबत मागील चार महिने सुरु असलेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला. राजन तेली यांच्या प्रवेशामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उद्धव यांच्या शिवसेनेची किती वाढ होईल किंवा किती प्रगती होईल हे खुद्द राजन तेली आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वांनाच माहित आहे. किंबहुना राजन तेली यांच्या जाण्याने भाजपाला किती फटका बसेल हेही सर्वाना माहित आहे. वेगळे काही सांगण्याची गरज नाही. तरीही शिवसैनिकांची नाराजी घेत उद्धव ठाकरे यांनी राजन तेली यांच्या हाती भगवा गंडा बांधला म्हणा किंवा तेली यांनी बांधून घेतला म्हणा. सावंतवाडी मतदारसंघातून राजन तेली यांना निवडणूक लढविण्याची घाई झाल्यानेच तेली यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला हे सर्वांनाच माहित आहे. ज्यांनी मातोश्री आणि उद्धव ठाकरे यांच्या नावाने खडे फोडले त्याच राजन तेली यांना मातोश्रीच्या दारी जावे लागले. त्यामुळेच निष्ठा, प्रतिष्ठा स्वाभिमान सारे काही बाजूला ठेऊन राजन तेली यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे मान झुकवली. तब्बल 19 वर्षांनी तेली यांना शिवसेना किंवा उद्धव ठाकरे यांची आठवण का झाली तर यामागचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे राजन तेली महाराष्ट्राच्या जाऊद्या पण सिंधुदुर्ग जिल्ह्याच्याही राजकारणात कधीच स्थिरस्थावार होऊ शकले नाही. त्यामुळेच आमदार होण्याचे तेली यांचे स्वप्न कायमस्वरूपी भंगले. यंदा सावंतवाडी मतदारसंघातून भाजपामधून उमेदवारी मिळणार अशी राजन तेली यांना आशा होती. पण यंदाही तेली यांना उमेदवारी मिळणे अशक्यच होती. कारण राजन तेली हे सावंतवाडी मतदारसंघातील नसून कणकवली मतदार संघातील असल्याने स्थानिक भाजपा पदाधिकारी नाराज होते. त्यामुळेच शिवसेनेत जाण्याशिवाय तेली यांच्यासमोर दुसरा पर्यायच नव्हता. तसे पाहिले तर 19 वर्षांपूर्वी शिवसेना सोडून नारायण राणे यांच्यासोबत गेलेले राजन तेली यांची राजकीय नेते म्हणून तशी ओळख नव्हतीच. नारायण राणे यांचा माणूस अशीच राजकारणात राजन तेली यांची ओळख होती. याच ओळखीमुळे तेली यांना विधानपरिषदेची आमदारकी मिळाली आणि दुसरेही फार काही मिळाले. पण इतके सारे काही मिळुनही राजन तेली कधीच समाधानी मनाने जिल्ह्यात वावरताना दिसत नव्हते. ते नेहमीच अस्वस्थ दिसायचे. कारण तेली यांना आमदार होण्याची जी सुप्त इच्छा होती ती इच्छा त्यांची पूर्ण झालीच नाही. यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. प्रचंड धडपड केली. नितेश आणि निलेश राणे यांच्यामुळे कणकवली मतदारसंघात तेली यांना उमेदवारी मिळणे शक्यच नव्हते. त्यात राणे कुटुंबाशी तेली यांचे बिनसल्याने कणकवलीत राजकारण करणेही तेली यांना शक्य नव्हते. म्हणूनच शांत आणि संयमी समजला जाणारा सावंतवाडी मतदारसंघाची तेली यांनी निवड केली आणि मागील विधानसभा निवडणुकीत आपले नशीबही अजमावले पण.. पण त्यात त्यांना यश आले नाही. तरीही मागील पाच वर्षे तेली सावंतवाडी मतदारसंघात कार्य करीत राहिले. छोट्या मोठ्या कार्यक्रमात उपस्थित राहून तेली यांनी भाजपाच्या माध्यमातून मतदारासमोर सातत्याने राहण्याचा प्रयत्न केला. पण सावंतवाडी मतदारसंघातून उमेदवारी मिळणार नाही असे समजताच तेली यांनी उद्धव यांच्या शिवसेनेत उडी मारली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर तेली यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने सावंतवाडी मतदारसंघातून उद्धव यांच्या शिवसेनेची म्हणजेच महाविकास आघाडी ची उमेदवारी राजन तेली यांना मिळणार अशीच मतदारसंघात आता जोरदार चर्चा सूरू झाली आहे. याआधी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या अर्चना घारे यांना महाविकास आघाडीची उमेदवारी मिळणार असे स्पष्ट दिसत असतानाच राजन तेली यांचा प्रवेशामुळे नव्याने ट्विस्ट उभा राहिला आहे. यामुळे आधीच चर्चेत असलेला सावंतवाडी मतदारसंघ अजून चर्चेत आला आहे. या मतदारसंघातून महाविकास आघाडीची उमेदवारी राजन तेली यांना मिळणार की अर्चना घारे याकडे साऱ्यांचेच लक्ष लागून राहिलेले आहे. उद्धव ठाकरे यांचा आजपर्यंतचा अनुभव पाहता शिवसेना सोडून गेलेले आणि परत शिवसेनेत आलेल्या नेत्यांना फारसे काही दिले असे दिसत नाही. त्यात शिवसेना आणि ठाकरे कुटुंबाची सर्वात जास्त मानहानी नारायण राणे यांनी केली असे साऱ्याच शिवसैनिकांना वाटत आहे आणि या साऱ्या मानहानी करणाऱ्यामध्ये राजन तेलीही सामिल होते हेही शिवसैनिकांना माहित आहे. या याचा घटनांचा विसर उद्धव ठाकरे यांना होईल असे वाटत नाही. कारण अशा गोष्टी उद्धव ठाकरे मनात ठेवतात आणि योग्य वेळ येताच त्याचे उट्टे काढतात हा उद्धव ठाकरे यांचा स्वभाव आहे. त्यामुळेच पक्ष सोडून गेलेले आणि पुन्हा पक्षात आलेल्या प्रत्येकाला उद्धव ठाकरे यांनी त्यांची योग्य ती जागा दाखवलेली आहे. हे सारे पाहता आता वेळ आली आहे ती राजन तेली यांची. उद्धव ठाकरे यांनी राजन तेली यांच्या हाताला भगवा गंडा बांधून शिवसेनेत प्रवेश दिला खरा पण तेली यांना कुठल्या रांगेत किती काळ थांबावे लागेल हे सांगणे फार कठीण आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत अगदी पुढे पुढे करणारे विनायक राऊत यांनाही ते कळणार नाही. त्यामुळे राजन तेली यांना सावंतवाडी मतदारसंघातून उमेदवारी मिळेलच असे आज तरी सांगण्याचे धाडसाचे ठरेल. परिणामी मागील 19 वर्षे राजकारणात अस्थिर असलेल्या राजन तेली यांना आता तरी राजकारणात स्थिर राहता येईल का हा प्रश्न आहे याचे उत्तर येणारा काळच ठरवेल.

# लाडकी बहीण योजना थांबवली, निवडणूक आयोगाचे आदेश

प्रतिनिधी
मुंबई

मुख्यमंत्री लाडकी बहीण ही योजना सरकारने सध्या थांबवली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर महिला व बालकल्याण विभागाने हा निर्णय घेतला आहे. असे असले तरी 2 कोटी 34 लाख महिलांच्या बँक खात्यात नोव्हेंबर महिन्याचे पैसे आधीच जमा झाले आहेत. दुसरीकडे दहा लाख महिलांच्या खात्यात अद्याप या योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत.

मतदारांना आर्थिक लाभ देऊन प्रभाव टाकणाऱ्या योजना बंद कराव्यात, असे आदेश निवडणूक आयोगाने दिले होते. तेव्हा अशा कुठल्या योजना आहेत अशी विचारणा आयोगाने केली होती. तेव्हा राज्य शासन लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या खात्यात थेट रक्कम जात असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा ही योजना तत्काळ थांबवण्याचे आदेश निघाले. महिला व बाल कल्याण विभागाने या योजनेचे निधी वितरण चार दिवसांपूर्वी थांबवल्याची माहिती आयोगाला दिली. राज्यात आचारसंहिता लागली आहे, त्यामुळे राज्य सरकारने ही योजना थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

### लाडकी बहीण योजनेला ब्रेक लावण्याचा प्रश्नच नाही



*मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी लाडकी बहीण योजनेचा निधी थांबवल्याच्या मुद्यावर भाष्य केले. ते म्हणाले, आचारसंहितेमुळे लाडकी बहीण योजनेला ब्रेक लावण्याचा प्रश्नच येत नाही. कारण, आम्ही नोव्हेंबरचे पैसे ऑक्टोबरमध्येच दिले आहेत. आम्ही आमच्या लाडक्या बहिणींना अॅडव्हान्समध्ये पैसे दिले. हे सरकार अॅडव्हान्स देणारे आहे, घेणारे नाही. त्यामुळे आमची नियत साफ आहे. आमची वृत्ती देण्याची आहे. मुळात आम्ही हा निर्णय निवडणूक डोळ्यापुढे ठेवून घेतलाच नाही. आमच्या लाडक्या बहिणींना हे पैसे पर्मनंट मिळावेत ही भावना मनात ठेवून आम्ही हा निर्णय घेतला. त्यामुळे ऑक्टोबरमध्येच आम्ही नोव्हेंबरचे पैसे दिले.*

# डॅमेज कंट्रोलसाठी काँग्रेसची धावाधाव राज्य प्रभारी चेन्नीथला 'मातोश्री'वर

प्रतिनिधी
मुंबई

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्याने महाविकास आघाडीच्या जागा वाटपाच्या बैठकांना वेग आलाय. तर विदर्भातील 10 जागांवरून ठाकरे सेना आणि काँग्रेसमधील वाद विकोपाला गेलाय. त्याचे उग्र पडसाद महाविकास आघाडीच्या बैठकीत उमटायला लागले. एवढंच नाही तर तुटेपर्यंत ताणू नये, असा इशाराच उद्धव ठाकरेंनी मित्रपक्षांना दिला. त्यामुळे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथलांनी डॅमेज कंट्रोलसाठी आधी शरद पवार आणि त्यानंतर थेट मातोश्रीवर जात उद्धव ठाकरेंची भेट घेतली. तर या भेटीनंतर मविआची तब्बेत ठीक असल्याची मिश्किल टिपण्णी चेन्नीथलांनी केली. तर आघाडीत बिघाडी नसल्याचं राऊतांनी म्हटलं.



**मविआत या जागांवर रस्सीखेच**

*अर्जुनी मोरगाव, परळी, तुमसर, सिंदखेडा, दर्यापूर, गेवराई, उदगीर, रामटेक, चंद्रपूर, ऐरोली, बेलापूर, वर्सोवा, धारावी, भायखळा*

मविआतील तिढा सोडवण्यासाठी महाविकास आघाडीची बैठक झाली. या बैठकीनंतर राऊत आणि पटोलेंनी एकतेचं दर्शन घडवलं. महाविकास आघाडीतील डॅमेज कंट्रोलसाठी वरिष्ठांनी लक्ष घातल्याने जागा वाटपाचा तिढा सुटण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे विदर्भातील जागांवर ठाकरे गट माघार घेणार की काँग्रेस? याची उत्सुकता आता सगळ्यांना लागून राहीली आहे.

# गडकरींच्या घरी फडणवीस-बावनकुळेंची 2 तास खलबते

प्रतिनिधी
नागपूर

महायुतीचे जागावाटप अंतिम टप्प्यात असून, लवकरच भाजपची पहिली उमेदवार यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी रात्री उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी पोहचले. सुमारे दोन तास या तीनही नेत्यांमध्ये चर्चा झाली.



या चर्चेत विदर्भातील जागा वाटपासह उमेदवारांच्या नावांवर गडकरींची सहमती घेण्याचे प्रयत्न झाले. नागपूर जिल्ह्यासह विदर्भातील बहुतांश जागांवर गडकरींचा पगडा आहे. शिवाय गडकरींना मानणारा वर्गही मोठा आहे. त्यामुळे येथील जागांसह उमेदवारांबाबत गडकरींचे मत काय आहे, हे जाणून घेण्यासाठी फडणवीस व बावनकुळे यांनी अंतिम चर्चा केली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

तिन्ही नेत्यांमध्ये चर्चा सुरू असताना भाजपचे विदर्भ संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर हे देखील गडकरींच्या घरी पोहचले होते. उमेदवारांच्या नावाबाबत गडकरींनी दोन्ही नेत्यांना काही जागांवर महत्वपूर्ण सूचनाही केल्याची माहिती आहे.

रामटेकमध्ये आमदार आशिष जयस्वाल हे महायुतीचे उमेदवार असतील, अशी घोषणा केल्यानंतर भाजपाचे माजी आमदार डी. मल्लिकार्जून रेड्डी यांनी बंड पुकारले आहे. भाजपाने तडकाफडकी कारवाई करीत रेड्डी यांना निलंबित केले. या कारवाईमुळे नाराज झालेल्या भाजपा पदाधिकाऱ्यांनी मेळावा घेत सामूहिक राजीनामे दिले. या सर्व नाराज पदाधिकाऱ्यांना शनिवारी रात्री देवगिरीवर बोलावण्यात आले. उपमुख्य फडणवीस व प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी त्यांची समजूत काढली.

# राज्यातील प्रत्येक मतदारसंघात 10 हजार मतांची फेरफार

## महाषडयंत्राचे सूत्रधार बावनकुळे असल्याचा राऊतांचा गंभीर आरोप

प्रतिनिधी
मुंबई

महाविकास आघाडीत जागावाटपावरून धुसफूस सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. अशातच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांच्यामधील वाद चव्हाट्यावर आला होता. यावरून नाना पटोले आणि संजय राऊत हे आमने-सामने आले होते. मात्र, यानंतर आज मुंबईत महाविकास आघाडीच्या नेत्यांची जागावाटपासंदर्भातील एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत नाना पटोले आणि संजय राऊत हे दोघे एकत्र दिसले. त्यामुळे नाना पटोले आणि संजय राऊत यांच्यातील वाद मिटल्याचं बोललं जात आहे.





दरम्यान, यावेळी नाना पटोले आणि संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधत महायुतीवर गंभीर आरोप केले आहेत. राज्यातील प्रत्येक मतदारसंघात 10 हजार मतांची फेरफार सुरु असून या षडयंत्राचे प्रमुख भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे असल्याचा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला आहे. तसेच महाराष्ट्रातील मतदारांची नावे कट करून दुसऱ्या राज्यातील लोकांची नावे जोडण्यात येत असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला आहे. तसेच वेळ पडल्यास आम्ही निवडणूक आयोगावर मोठा मोर्चा काढणार असल्याचा इशाराही यावेळी संजय राऊत यांनी दिला.

पान 8 वर

# विजया रहाटकरांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती

## अध्यक्षपद भूषवणाऱ्या पहिल्याच मराठी व्यक्ती

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

भाजपच्या राष्ट्रीय सचिव, राजस्थानच्या सह प्रभारी श्रीमती विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही आपला ठसा उमटवला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने त्यांची नियुक्ती केली आहे.



राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या त्या पहिल्या मराठी व्यक्ती ठरल्या आहेत. त्यांना केंद्रीय राज्यमंत्री पदाचा दर्जा असेल. संवैधानिक दर्जा असणाऱ्या राष्ट्रीय महिला आयोगाला अत्यंत व्यापक अधिकार आहेत. 1992 मध्ये विशेष कायद्यान्वये स्थापन झालेल्या या आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत.

# मोदींना युक्रेन युद्धाची चिंता

## पुतिन यांनी केले कौतुक

मॉस्को

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी शुक्रवारी सांगितले की, नरेंद्र मोदी युक्रेन युद्धाबाबत खूप चिंतेत आहेत. एएनआय न्यूज एजन्सीनुसार, रशियामध्ये ब्रिक्स परिषदेपूर्वी एका मीडिया ब्रीफिंगमध्ये पुतिन म्हणाले की, जेव्हा ते त्यांच्याशी बोलतात तेव्हा ते प्रत्येक वेळी हा मुद्दा उपस्थित करतात आणि त्यांचे मत व्यक्त करतात. यासाठी आम्ही पंतप्रधान मोदींचे आभार मानतो.

रशियाला युक्रेनचे संकट शांततेने संपवायचे आहे, असे पुतीन म्हणाले. आम्ही ते संपवण्याचा प्रयत्न सुरू केला, पण युक्रेनने चर्चा थांबवली. ते म्हणाले की, पाश्चात्य देशांमुळे युद्ध सुरू आहे. युक्रेन युद्धात रशियाचा विजय झाल्याचा दावा पुतिन यांनी केला.

बॉलीवूड चित्रपटांचे कौतुक करताना पुतिन म्हणाले की, रशियामध्ये भारतीय चित्रपट खूप पाहिले जातात. आमच्याकडे एक खास टीव्ही चॅनेल आहे ज्यावर भारतीय चित्रपट 24 तास दाखवले जातात.

# इस्राईली पंतप्रधान नेतन्याहू यांच्या घरावर ड्रोन हल्ला

जेरुसलेम

हिजबुल्लाहने शनिवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या खाजगी घरावर ड्रोन हल्ला केला. पीएमओने हा हल्ला लेबनॉनमधून झाल्याचे म्हटले आहे. तेव्हा नेतन्याहू आणि त्यांची पत्नी सारा घरी नव्हते. सध्या या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

इस्त्रायली संरक्षण दलाने (IDF) सांगितले की, लेबनॉनमधून शनिवारी इस्रायलवर तीन ड्रोन उडवण्यात आले. यापैकी एक सीझरिया शहरातील इमारतीवर पडले, जे



लेबनॉनमधून आणखी दोन ड्रोन सोडले गेले. त्यामुळे गिलोट लष्करी तळावर अलार्म वाजू लागला. आयडीएफने कबूल केले की त्यांची हवाई संरक्षण यंत्रणा हल्ला रोखण्यात अयशस्वी ठरली, ज्यामुळे हा हल्ला झाला. ड्रोन घुसल्याचा तपास करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# नक्षलवाद्यांनी घडवलेल्या स्फोटात 2 जवान शहीद; दोन जखमी

**रायपूर ।** नक्षलवाद्यांनी छत्तीसगडच्या नारायणपूरमध्ये जवानांवर निशाणा साधला आहे. नक्षलवाद्यांनी घुरबेरा भागात आयईडी स्फोट घडवून आणला. या स्फोटात चार जवान जखमी झाले आहेत.यापैकी दोन जवानांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना रायपूरला पाठवण्याची तयारी सुरू होती. मात्र तेथे नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अमर पनवार आणि के राजेश अशी शहीद जवानांची नावे आहेत. आयटीबीपी-बीएसएफची संयुक्त टीम ओरछा, मोहंडी आणि इरकभट्टी येथे गस्तीवर होती. काही दिवसांपूर्वी या परिसरात नक्षलवाद्यांची पोलिसांशी चकमक झाली होती. चकमकीनंतर शुक्रवारी परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली होती. शोधमोहिमेनंतर शनिवारी सैनिक परतत होते.

# महायुतीचं सरकार म्हणजे महादु:खी सरकार - अखिलेश यादव

## मालेगावमधून सपातर्फे निहाल अहमद तर भिवंडीतून रईस शेख यांना उमेदवारी

प्रतिनिधी
मालेगाव

समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी मालेगावच्या सभेत राज्यातील महायुती सरकारवर सडकून टीका केली.राज्यात महाविकास आघाडीच्या सोबत समाजवादी पक्ष आहे. त्यामुळे महायुतीचं सरकार कितीही प्रयत्न केला तरी राज्या येऊ शकणार नाही असं अखिलेश यादव म्हणाले. भर पावसात त्यांची येथे सभा झाली. तरीही लोक मोठ्या संख्येनं सभेला उपस्थित होते. त्यामुळे त्यांनी सर्वांच्या उत्साहाचं कौतुक केलं.



भारतीय जनता पार्टी हताश झालेली आहे. लोकसभेत त्यांची हार झाली. त्यामुळे या निवडणुकीत जिंकण्यासाठी ते सर्व पर्याय ते वापरत आहे. हरियाणात भाजपा हरता हरता जिंकली. असं असलं तरी महाराष्ट्रात महायुती हरणार म्हणजे हरणार असं स्पष्ट मत समाजवादी पार्टीचे सर्वेसर्वा खासदार अखिलेश यादव यांनी व्यक्त केलं मालेगाव आणि धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या अखिलेश यादव यांनी मालेगाव येथील जाहीर सभेत आपलं मत व्यक्त केलं.

महायुती सरकार म्हणजे महादुखी सरकार आहे, महाभ्रष्टाचारी सरकार आहे, असे यादव म्हणाले. महाराष्ट्रातील सरकार महायुतीचं हरणारं सरकार आहे त्यामुळे केंद्रातील सरकार देखील पडणार आहे. महाराष्ट्र सरकार हे यापूर्वी रोजगार देणारं सरकार होतं. आता सगळे बेरोजगार झालेत. समाजवादी पार्टी ही सगळ्यांचा विचार करणारी पार्टी आहे. मॉबलिंचींग, अन्यायाविरुध्द आम्ही लढा देणार आहोत. लोकसभेत बिल सादर केल्यावर आम्ही त्याला विरोध केला. मुस्लिमांना त्रास देण्यासाठी बिल आणलं जातं आहे असं यादव म्हणाले. मालेगाव मध्य विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात समाजवादी पार्टी उतरणार आहे. यासाठी महाविकास आघाडीच्या वतीनं समाजवादी पक्षातर्फे शान ए हिंद निहाल अहमद यांना उमेदवारी जाहीर करत असून संपूर्ण मालेगाव मधील जनतेनं त्यांना भरघोस मतं देऊन निवडून आणावं असं आवाहन अखिलेश यादव यांनी केलं. तर याचवेळी त्यांनी रईस शेख यांना भिवंडीतून उमेदवारी जाहीर करत असल्याचं देखील सांगितलं.

## आचारसंहितेमुळे 50 शिक्षक महापौर पुरस्कारापासून वंचित

**मुंबई :** मुंबई महापालिका शिक्षण खात्याने 5 सप्टेंबर शिक्षक दिनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या 50 शिक्षक, मुख्याध्यापक यांना शिक्षक महापौर पुरस्कार जाहीर केले आहेत. मात्र पुरस्कार वितरण कार्यक्रम वेळीच न घेतल्याने आता 50 शिक्षकांना आचारसंहिता संपेपर्यंत म्हणजेच तब्बल अडीच महिने पुरस्कारांपासून वंचित राहावे लागणार आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर 15 ऑक्टोबरपासून राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे महापौर पुरस्कार सोहळा आचारसंहितेच्या कात्रित अडकला आहे. कारण आता 20 नोव्हेंबर रोजी मतदान, 23 नोव्हेंबर रोजी निकाल आणि यानंतर निवडणूक आचारसंहिता प्रक्रिया 25 नोव्हेंबर रोजी संपुष्टात येणार आहे. तोपर्यंत पुरस्कार वितरण कार्यक्रम होणार नसल्याने 50 शिक्षकांना तब्बल अडीच महिने पुरस्कारांपासून वंचित राहावे लागणार असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात ऐकायला मिळत आहे.



## थोडक्यात

### रॉंग नंबर महागात; तरुणाने फसवून केला बलात्कार

**वसई:** एका अल्पवयीन तरुणीकडून चुकून लागलेला कॉल चांगलाच महागात पडला आहे. या कॉलचे निमित्त साधून एका तरुणाने तिला फसवून तिच्यावर बलात्कार केल्याचे उघड झाले आहे. बोळींज पोलीस या आरोपीचा शोध घेत आहेत. पीडित तरूणी सध्या १८ वर्षांची असून विरार येथे राहते. मागील वर्षी मे महिन्यात पीडित तरूणी १७ वर्षांची असताना तिच्याकडून एका अनोळखी क्रमांकावर चुकून फोन लागला. पलिकडे शुभम कोळी (२४) मुंबईच्या ग्रॅंट रोड येथे राहणारा तरूण होता. त्या चुकून लागलेल्या कॉलचे निमित्त करून शुभमने पीडित तरुणीशी ओळख वाढवली. तिच्या अज्ञानाचा फायदा घेत तिच्याशी मैत्री केली आणि तिच्या घरी येऊन तिच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित केले. मात्र शुभम तिला फसवत असल्याचे पीडित तरुणीच्या लक्षात आले. तिने मग बोळींज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### चेंबूरमधील मंदिरात भीषण आग

**मुंबई:** चेंबूर कॉलनी परिसरातील संतोषी माता मंदिरात शनिवारी दुपारी २.१५ च्या सुमारास भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या चार गाड्या दाखल झाल्या असून आग्निशामक आग विझविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. चेंबूर कॉलनी परिसरातील एनलक्स रुग्णालयाच्या शेजारी हे मंदिर असून शनिवारी दुपारी २.१५ च्या सुमारास मंदिरात अचानक आग लागली. यावेळी मंदिरात अनेक भाविक उपस्थित होते. आग लागताच भाविकांनी मंदिरा बाहेर धाव घेतली. तसेच आगीची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली. त्यानंत तात्काळ अग्निशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.

### आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे वाचवले प्राण

**मुंबई:** लिव्ह ॲण्ड रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्यासोबत वाद झाल्याने कुर्ला परिसरात राहणाऱ्या एका महिलेने गुरुवारी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र यासंदर्भात माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचलेल्या नेहरू नगर पोलिसांना या तरुणीचे प्राण वाचवले. कुर्ल्यातील नेहरू नगर परिसरात गुरुवारी दुपारी ही घटना घडली आहे. सदर ३५ वर्षीय महिला तिच्या मित्रासोबत म्हाडा इमारतीमध्ये राहते. दोघांमध्ये गुरुवारी वाद झाल्याने तिने खोलीत जाऊन गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. याच वेळी तिच्या मित्राने याची माहिती नेहरू नगर पोलिसांना दिली. नेहरू नगर पोलिसांचे निर्भया पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी महिलेला अडवले.

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# भाजपाच्या वाटेवर असणाऱ्या राजीव पाटील यांची विधानसभा निवडणुकीतून माघार

**प्रतिनिधी**
■ **विरार**

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राज्यातील राजकारण तापताना दिसत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीकडून जागावाटपावरील चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे. तर दुसरीकडे उमेदवारीसाठी इच्छुक नेते पक्षांत्तर करताना दिसत आहे. मुंबईला लागूनच असलेल्या वसई-विरार महापालिकेचे माजी महापौर राजीव पाटील हे विधानसभा निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होत्या. विशेष म्हणजे बहुजन विकास आघाडीमध्ये बंड करून राजीव पाटील यांनी भाजपामध्ये जाण्याचा निर्धार केला होता. मात्र आता त्यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतल्याची माहिती समोर येत आहे.

हितेंद्र ठाकूर यांचे आतेभाऊ आणि बहुजन विकास आघाडीचे कार्याध्यक्ष राजीव पाटील हे गेल्या काही दिवसांपासून भाजपा जाणार असल्याची चर्चा सुरू होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश होणार असल्याची चर्चा सुरू होती. भाजपात प्रवेश केल्यानंतर राजीव पाटील आमदार क्षितीज ठाकूर यांच्या नालासोपारा विधानसभा मतदारसंघातून त्यांच्याच विरोधात निवडणूक लढवण्याची शक्यता होती.



याचपार्श्वभूमीवर राजीव पाटील यांनी मागील काही दिवसांत नवरात्रोत्सवात भाजपा कार्यकर्त्यांच्या मंडळांना भेटी दिल्या होत्या. तर दुसरीकडे गेल्या 25 वर्षांपासून वसई विरारच्या राजकारणात एकहाती सत्ता असणाऱ्या हिंतेंद्र ठाकूर यांनी महायुतीची साथ सोडत महाविकास आघाडीचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचीही चर्चा रंगली होती. मात्र आता भाजपाच्या वाटेवर असणाऱ्या राजीव पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय मागे घेतला असल्याची माहिती सूत्राने दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजीव पाटील बंडाच्या तयारीत असतानाच त्यांच्या 89 वर्षीय मातोश्रींनी नाराज होऊन अन्नपाणी सोडले होते, तसेच राजीव पाटील यांच्याजवळ बोलण्यास नकार दिला होता. आपल्याच भावा आणि पुतण्याविरुद्ध का लढतोय? त्यांच्या मातोश्रींनी विचारला होता. या भावनिक विचारांनी राजीव पाटील यांना निवडणुकीतून माघार घेण्यास भाग पाडले असल्याचे समजते. यानंतर राजीव पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश न करण्याचा निर्णयही घेतला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे बहुजन विकास आघाडीतील समर्थक आणि कार्यकर्त्यांकडून आनंद व्यक्त होताना दिसत आहे.

## पोलिसांवर हल्ला केल्याप्रकरणी अखेर 'नाना'ला 26 वर्षांनंतर अटक

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मालाड परिसरात दरोड्यादरम्यान पोलीस पथकावर दगडफेक करून प्राणघात हल्ला करणाऱ्या आरोपीला २६ वर्षांनंतर अटक करण्यात अखेर दिंडोशी पोलिसांना यश आले. शंकर बाजीराव काळे ऊर्फ नाना असे या ५५ वर्षीय आरोपीचे नाव असून सहा महिने कारागृहात राहिल्यानंतर जामिनावर बाहेर येताच तो पळून गेला होता. अखेर २६ वर्षांनी त्याला पुन्हा अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

मालाड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ एलोरा सहकारी सोसायटीमध्ये ५ ऑक्टोंबर १९९६ रोजी चड्डी बनियान टोळीने सशस्त्र दरोडा टाकला होता. पळून जाताना या आरोपींना गस्त घालणाऱ्या पोलिसांनी पकडण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी या आरोपींनी पोलिसांवर दगडफेक केली होती, घातक शस्त्रांनी प्राणघातक हल्ला केला होता. त्यात काही पोलिसांसह साक्षीदार गंभीररीत्या जखमी झाले होते. या हल्ल्यानंतर पोलिसांनी स्वरक्षणार्थ आरोपींच्या दिशेने गोळीबार केला होता. या गोळीबारात चड्डी बनियान टोळीचा म्होरक्या चकमकीत मारला गेला. त्याचे चार सहकारी चोरीच्या मुद्देमालासह अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले होते. या घटनेची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत आरोपींच्या अटकेसाठी विशेष मोहीम हाती घेण्याचे आदेश स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेला दिले होते. या आदेशानंतर पथकाने पळून गेलेल्या तिघांना संभाजीनगर परिसरातून अटक केली होती. त्यात शंकर काळे याचाही समावेश होता. सहा महिने कारागृहात राहिल्यानंतर त्याला जामीन मंजूर झाला होता.

## मांत्रिकांकडून तरुणीची फसवणूक, गुन्हा दाखल

**प्रतिनिधी**
■ **भाईंदर**

मुंबई सांताक्रूझ येथे राहणाऱ्या एका २० वर्षीय तरुणीला १ लाख ३९ हजार रुपयांचा गंडा घातल्या प्रकरणी तीन मांत्रिकांच्या विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी जादूटोणा कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सप्टेंबर २०२४ मध्ये एका वृत्तपत्रामध्ये मांत्रिक मुस्ताक शाह याने दिलेली जाहिरात पाहून त्यावर तरुणीने कॉल केला. या जाहिरातीत आर्थिक परिस्थीती सुधारण्यासाठी सक्षम असलेला आध्यात्मीक उपाय केला जाईल असे म्हटले होते. तरुणीच्या घरची आर्थिक परिस्थिती खराब असल्याने तिने या मांत्रिकावर विश्वास ठेवला. मांत्रिकाने एक पूजा घालावी लागेल, पुजे दरम्यान वेगवेगळ्या शक्ती बोलवाव्या लागणार असून त्यासाठी तुम्हाला मिठाई, फळ फुले, कपडे किंवा कोंबडा या प्राण्याचा बळी द्यावी लागणार आहे असे सांगितले. त्यास होकार दिल्याने शाह याने पूजेकरिता ६४ हजार घेऊन येण्यास सांगितले.

त्यानंतर २१ सप्टेंबर रोजी ३२ हजार रोख रक्कम आणि ३२ हजार रियाझ चौधरी या इसमाकडे पाठविण्यास सांगितले. त्यानंतर शाह याने तरुणीला एक सुपारी दिली आणि घरी जायला सांगितले. २२ सप्टेंबर रोजी सांगीतले की पूजा संपन्न केली आहे. परंतु तुमच्या घरावर कोणीतरी काहीतरी केलेले आहे, त्यासाठी अजून एक पूजा करावी लागणार आहे त्यासाठी ७५ हजार रुपये लागणार आहे. त्यावेळी पैसे नाहीत एक आठवडा लागेल म्हटल्यावर आठ दिवसांनी फोन करत पूजा घालण्यास विलंब होत आहे. जर पुजा घातली नाही तर तुझ्या घरावर मोठे संकट येणार आहे. त्यावेळी घाबरून जात तरूणीने आई वडिलांकडून वैयक्तिक काम आहे असे सांगून ७५ हजार रुपये घेतले. तरूणीच्या म्हणण्यानुसार २९ सप्टेंबर रोजी फोन करून सांगितले की, सर्व पुजा संपन्न झाल्या असून तुझ्या सर्व अडचणी दुर झालेल्या आहेत. याच दिवशी सायंकाळी पुन्हा सांगितले की काल घातलेल्या पुजेत विघ्न आले आहे. त्यामुळे यापुर्वी दोन म्हशींचा बळी दिला आहे. आणखी एका म्हशीचा बळी द्यावा लागेल. म्हणून पुन्हा पुजा घालावी लागणार आहे,असे सांगितले.त्यानंतर तरूणीला आपली फसवणूक झाल्याचे समजले.त्यानंतर नया नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिलीप राख हे करत आहेत.

## देखभाली अभावी 5 पैकी 2 गॅस दाहिन्या बंदच

**प्रतिनिधी**
■ **विरार**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी वसई -विरार महापालिकेने तयार केलेल्या गॅस दाहिन्या बंदच असल्यामुळे नागरिकांनी त्याकडे पाठ फिरवली आहे. ेखभाली अभावी ५ पैकी २ गॅस दाहिन्या बंद झाल्या आहेत. या गॅस दाहिन्यांचा वापर करण्यासाठी पालिकेने तयार केलेली प्रोत्साहन योजना देखील कागदावरच राहिली आहे. त्यातच नायगाव येथील स्मशानभूमीची दूरवस्था झाली असल्यामुळे नागरिकांना मोबाईलच्या प्रकाशावर अंत्यविधी करावा लागला असल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

पारंपरिक स्मशानभूमीत मृतदेहांवर अंत्यसंस्कार केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होतो शिवाय प्रदूषण होत असते. एका मृतदेहाचे दहन करण्यासाठी साधारण साडेचारशे ते पाचशे किलो लाकडे लागतात. त्याचा खर्च सुमारे अडीच हजार रुपये एवढा येतो. लाकडांसाठी जंगलात वृक्षतोड होऊन वनसंपदा नष्ट होत असते. मृतदेहाचे दहन केल्याने सतत प्रदूषण होत असते. दहनाच्या वेळी होणारे हे विविध प्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरणपूरक अंत्यविधी व्हावी यासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाअंतर्गत (नॅशन क्लिन एअर प्रोग्राम) सर्व महापालिकांना गॅस दाहिन्या लावण्याचे निर्देश देण्यात आले होते.

वसई -विरार शहर पाालिकेने साडेतीन कोटी खर्च करून नवघर,(वसई) पाचूबंदर, (वसई) विराट नगर (विरार) , आचोळा (नालासोपारा) आणि समेळपाडा (सोपारा) या ५ ठिकाणच्या स्मशानभूमीत गॅस दाहिन्या सुरू केल्या होत्या. मात्र त्याला थंड प्रतिसाद मिळाला आहे. मात्र विरारच्या विराट नगर आणि नालासोपारामधील समेळपाडा स्मशानभूमीतील गॅस दाहिन्या बंद पडल्या आहेत. मागील वर्षात आचोळ्यात २२४, नवघरमध्ये ४३ तर पाचूबंदर येथे १०२ मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

***पालिकेची प्रोत्साहन योजना कागदावरच***

*गॅस दाहिनीऐवजी नागरिक आपल्या कुटुंबियांचे अंत्यसंस्कार पारंपरिक पध्दतीनेच करत आहेत. यामुळे या गॅस दाहिन्या विनावापराच्या पडून आहेत. गॅस दाहिन्यांच्या वापर होत नसल्याने पालिकेला लाकडांचा खर्च करावा लागत आहे. पारंपरिक पध्दतीने अंत्यसंस्कार केल्यामुळे वृक्षतोड होते. शिवाय लाकूड जाळल्याने धूराचे प्रदूषण होत असते. हे रोखण्यासाठी नागरिकांनी अधिकाअधिक गॅस दाहिन्यांचा वापर करावा यासाठी पालिकेने जनजागृती करण्याचे ठरवले होते. याचाच भाग म्हणून जे नागरिक आपल्या नातलगांच्या मृतदेहांचे अंत्यसंस्कार गॅस दाहिनीत करतील त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान केला जाणार होता तसेच त्यांना मालमत्ता करातही ५ टक्के सवलत देण्यात येणार होती. मात्र या योजना कागदावरच राहिल्या आहेत.*



## डहाणू-जव्हार मार्गाची दुरवस्था; खड्डे, चिखलामुळे वाहनचालक त्रस्त

### तातडीने कार्यवाहीची मागणी

**प्रतिनिधी**
■ **कासा**

डहाणू-जव्हार राज्यमार्गावर गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात मोठमोठे खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालकांना येथून प्रवास करणे अवघड जात आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने खड्ड्यांची संख्या वाढली आहे. परिणामी, अपघातांची संख्यादेखील वाढत आहे. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे तत्काळ भरावेत, अशी मागणी करत आंदोलनाचा इशारा वाहनचालकांनी दिला आहे.

डहाणू येथून नाशिक, मुंबई, ठाणे, गुजरात या भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. डहाणूत असणारी अदानी कंपनी, आशागड येथील युनिव्हर्सल कॅप्सूल कंपनी, डहाणू, वाणगाव येथील भाजी, चिकू, मासळीची मोठी बाजारपेठ यामुळेही येथे वाहतुकीचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे वाढवण येथे नवीन बंदर



निर्माण प्रकल्प सुरू असून त्याच्या कामानिमित्त अनेक वाहनांची ये-जा सुरू असते.

तसेच, नवीन रेल्वे रुळांची अनेक कामे सुरू असल्याने अवजड वाहनेही ये-जा करत असतात. त्यामुळे या रस्त्याची पुरती चाळण झाली आहे. दरम्यान, रस्त्याच्या दुरवस्थेबाबत डहाणू बांधकाम विभागाकडे अनेकदा तक्रारी करूनसुद्धा रस्त्याची डागडुजी होत नाही. मागे दोन-चार वेळा खड्डे तात्पुरते भरण्यात आले होते, पण पडलेल्या मोठ्या पावसाने पुन्हा पूर्ववत खड्डे निर्माण झाले आहेत. यामुळे अपघातांचेही प्रमाण वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत.

प्रशासनाने त्वरीत ठोस उपाययोजना करण्याचा मागणी वाहनचालकांनी केली आहे. तसेच वेळीच हे खड्डे भरले न गेल्यास आंदोलन करण्याची तयारी काही नागरिकांनी केल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान प्रशासनाने येथील खड्डे आणि चिखलाचे खापर अवजड वाहनांच्या वर्दळीवर आणि पावसावर फोडले असून लवकरच खड्डे भरले जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

## डहाणूतील चिखले - विजयवाडी भागात बिबट्याचा वावर

**प्रतिनिधी**
■ **डहाणू**

डहाणू तालुक्यातील चिखले गावच्या हद्दीत विजयवाडी येथे १५ ऑक्टोबरच्या रात्री बिबट्याने घरानजिक बांधलेल्या बकरीची शिकार केली. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बोर्डी वनक्षेत्रपाल आर. एस. सारणीकर यांच्या नेतृत्वाखाली पंचनामा करून बिबट्याचा माग काढण्यासाठी ३ ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले आहेत.चिखले आणि घोलवड गावातील शेतकरी वर्गात बिबट्याच्या दहशतीमुळे भीती पसरली आहे. १५ ऑक्टोबरच्या रात्री लक्ष्मी आरदोरी या महिला शेतकऱ्याच्या शिवारातील झोपडी नजिकच्या गोठ्यातील दोन बकऱ्या गायब झाल्या. या पैकी एका बकरीवर बिबट्याने हल्ला केला असून तिचा मृत्यू झाल्याचे वन परिक्षेत्रपाल सारणीकर यांनी सांगितले.



याबाबत पंचनामा करण्यात आला आहे, सदर नुकसानीची भरपाई एक महिन्यात मिळण्याची शक्यता आहे.

परिसरातील एका शेतात बिबट्याचे ठसे आढळले असले तरी, लावलेल्या कॅमेऱ्यांमध्ये बिबट्याचा ठावठिकाणा मिळालेला नाही. दरम्यान, भात कापणी हंगामाला सुरुवात झाली असून, परिसरात चिकू बागायती असल्याने शेतकरी आणि मजुरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने नागरिकांना दक्ष राहण्याचे मार्गदर्शन केले आहे. तसेच, गस्ती पथकाची नेमणूक करण्यात आली असून, कोणत्याही संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यास तत्काळ वन विभागाला देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आ.सचिन अहिर यांनी ऐकून घेतल्या लोअर परळ रेल्वे वर्क शॉपमधील कामगारांच्या समस्या आणि विचारला अधिकाऱ्यांना जाब

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस, आमदार सचिन भाऊ अहिर यांनी शुक्रवारी लोअर परेल वर्कशॉप ला भेट दिली. सर्व कामगारांकच्या तक्रारी ऐकून घेतल्यानंतर लोअर परेल वर्कशॉप चे मुख्य कारखाना प्रबंधक .परवेश साहू यांची भेट घेवून कारखान्यातील कामगारांना भेडसावत असणाऱ्या समस्या बद्दल सविस्तर चर्चा केली. प्रामुख्याने कारखान्यात जून 2023 ला नवीन क्रेन येणार होती पण ती आजतागायत आली नाही असे विचारताच दोन महिन्यांत नवीन क्रेन ची कारखान्यात प्रतिष्ठापना होणार आहे याची ग्वाही साहू यांनी दिली. कारखान्यात कामगारांची संख्या खूप कमी असूनही कामगार मेहनतीने आवश्यक आऊट टर्न



देत आहेत. तरीही त्यांना इन्सेंटिव्ह मिळत नाही या बाबतही त्वरित तोडगा काढून कामगारांना इंसेंटिव्ह मिळण्याची तरतूद करू असे मुख्य कारखाना प्रबंधक यांनी सांगितले, बोगी व फियाट सेक्शन मध्ये वारंवार होणाऱ्या अपघात होतात , दहा नवीन न्यूमॅटिक मशीन पुरवण्यात आल्या होत्या त्यापैकी आठ मशीन नादुरुस्त अवस्थेत आहेत त्याचा परिणाम कामगारांच्या कार्यावर होत आहे व मानसिक त्रासात कामगार कमी अवधीत आवश्यक उत्पादन देऊ शकत नाहीत याची कल्पना प्रशासनाला देण्यात आली , कित्येक वर्षांपासून ट्रेन लाइटिंग व पावर येथील बायो टॅंक मुळे होणाऱ्या दुर्गंधीमुळे तसेच शौचालय चा सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्यामुळे कामगारांना तेथून मार्गस्थ होताना त्रास होत होता. त्याने कामगारांचे आरोग्य धोक्यात आले होते. वारंवार तक्रार करूनही प्रशासन याकडे कानाडोळा करत आहे., या समस्यांची सकारात्मक उत्तरे साहू यांनी दिली.

पेंट शॉप मधील कामगारांना इतर शॉप मध्ये पाठवून त्यांच्या कडून जबरदस्तीने अयोग्य पद्धतीने काम करवून घेतले जात होते. हा अन्याय कामगार खपवून घेणार नाही असे प्रशासनाला सूनवताच त्यांनी अश्या पद्धतीने, पेंट शॉप मधील कामगारांना इतरत्र काम करण्यास प्रशासन भाग पाडणार नाही असे सांगण्यात आले. ASRS स्टोअर 45 नंबर मटेरियल प्रणाली वर सायबर अटॅक झाल्यामुळे मटेरिअल प्रणाली मध्ये खूप काही त्रुटी होत्या त्या त्वरित सुधारून,कामगारांना वेळेत मटेरियल मिळावे ह्यासाठी प्रशासनाने त्वरीत यावर उपाययोजना कराव्यात व कामगारांचा होणारा विलंब टाळावा. दिव्यांग कामगार व महिला कामगारांना त्यांची हजेरी बायोमेट्रिक द्वारे कारखान्यात त्यांना उपलब्ध असलेल्या बायोमेट्रिक मशीन द्वारे करता येईल अशी सुलभ सुविधा त्यांना देण्यासाठी आग्रही भूमिका घेतल्यावर प्रशासनाने त्यांची व्यवस्था लवकरात करण्याचे आश्वासन दिले.

### सार्वजनिक सचूना

माझ्या अशील विशाखा सुनील केदार आणि सुनील भास्कर केदार यांच्या सूचनेनुसार त्याच्या घराच्या बाधणाबाबत ची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे. हि मिळकत सर्व्हे क्र. ४६ / १ तालुका वसई, जि. पालघर यां जमिनीवर बांधली जाणार आहे. गाव - वाघोली, कृपया लक्षात घ्या की माझ्या अशिलाने सदर जमिनीवरील बांधकामासाठी कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडून कोणतीही अद्याप परवानगी घेतलेली नाही आणि परवानगी माझ्या अशील याना घायची असून परवानगी घेण्या अगोदर ही सदर जाहिरात माझे अशिल हे देत आहेतकोणत्याही व्यक्तीला या विकासाबाबत काही हरकत असल्यास, कृपया पुढे येऊन आपल्या लेखी हरकती १४ दिवसाच्या आत खालील पत्यावर नोंदवाव्यात.

सही-/
वकील
संकेत गदगी
९०९६४७०६४१
पत्ता ऑफिस नोख्रिस्त क्रॉस माघे १
वसई कोर्टजवळ, वसई ४०१२०२

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल साई धाम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पत्ता. खारी गाव, नवघर रोड, ता व जि ठाणे ४०११०५, यांच्या मालकीची मौजे खारी येथे जुना सर्व्हे क्र. १७९, नवीन सर्व्हे क्र. ६२ चा हिस्सा क्र. २१ एकूण क्षेत्र ५९० चौ.मी. जागा आहे.
सदर संस्थेने आपल्या इमारतीचा पुनर्विकास करण्याचे ठरविले आहे. व त्यासाठी त्यांनी इच्छुक विकासकाकडून आपल्या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी अर्ज मागविले आहे. सदर अर्जामध्ये विकासकांनी त्यांनी केलेल्या किवा बांधलेल्या किमान ३ इमारतीची माहिती देऊन वरील इमारतीचे पुनर्विकास करण्यासंदर्भातील आपले अर्ज बंद लिफाफ्यात खालील पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत देण्यात यावे. १४ दिवसाचे आत आलेल्या अर्जावर संस्था विचार विनिमय करून योग्य असलेल्या अर्जावर निर्णय घेतील. आलेले अर्ज स्विकारण्याचा तसेच नाकारण्याचा अधिकार (कुठलेही कारण न देता) सदर संस्थेला असेल याची नोंद घ्यावी. इच्छुक विकासकांना जागा तसेच कागदपत्रे पाहणे असल्यास त्यांनी खालील फोनवर संपर्क साधून आगाऊ सुचना द्यावी.

कळावे,
ॲड. जॉन एम. रॉड्रीक्स
वकील
पत्ता. ऑफिस क्र.२,
पहिला मजला,
न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड,
भाईंदर (पू), ता. व
जिल्हा ठाणे, ४०११०५
मो.९८९२४०१३४९

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 120**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १२०**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

**मुंबई ।** घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता संघ व सेना यांच्या वतीने माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन डॉ अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस हा वृत्तपत्र विक्रेता दिवस म्हणून सर्व विक्रेत्यांनी एकत्रित येत वामनराव कोठावदे चौक घाटकोपर पाश्चिम येथे साजरा केला.यावेळी प्रकाश वाणी, प्रकाश गिलबिले,दीपक गवळी, रवी संसारे,सचिन भांगे,अंकुश खरात,नितीन गंभीर,विजय कोठावदे,नितीन रेणुसे,धनंजय शेलार ,रवी मोरणकर,वैभव पावस्कर,जगन वाघ,शिवाजी सुर्वे, विलास कोठावडे,अशोक अवती अशोक हांडे,दिपक पवार व मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेता बांधवांनी उपस्थित राहत डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जागवत अभिवादन केले.




# मविआत मतभेद नाहीत; एक-दोन दिवसात जागा वाटपही पूर्ण होईल : चेन्नीथला

## काँग्रेसच्या वरिष्ठ निरिक्षकांची टिळक भवनमध्ये बैठक संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत, विधानसभेच्या निवडणुका मविआ एकत्रच लढवणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्यातही वाद नाहीत. तिन्ही पक्ष मिळून जागा वाटपाची चर्चाही सुरु आहे, जागा वाटपाची ही चर्चा एक दोन दिवसात पूर्ण होईल, असे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी स्पष्ट केले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची व महाविकास आघाडीची प्रकृत्तीही उत्तम आहे असेही चेन्नीथला यांनी सांगितले.




प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी उद्धव ठाकरेंचे निवासस्थान मातोश्रीवर सकाळी भेट घेतली त्यावेळी त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते, यावेळी त्यांच्याबरोबर CWC सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, आमदार भाई जगताप, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, शिवसेना खा. संजय राऊत उपस्थित होते. त्यानंतर चेन्नीथला यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार यांचीही भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

दुपारी टिळक भवन येथे महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, डॉ. विश्वजित कदम आदी उपस्थित होते. या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना ना पटोले म्हणाले की, महायुतीचा चेहरा कोण आहे त्यांनी जाहीर करावे असे आम्ही सातत्याने विचारत होतो पण मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्यास ते घाबरले आहेत. भ्रष्ट महायुती सरकारने महाराष्ट्र विकायला काढला असून जमिनी विकत आहेत. सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे आणि योजना दूत च्या नावाखाली जनतेच्या पैशावर हे सरकार भाजपाचा प्रचार करत आहे. काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्यानंतर योजनादूत सह सरकारने घेतलेले अनेक निर्णयही रद्द केले आहेत.

पांचज्यन या आरएसएसच्या मुखपत्रात बाबा सिद्दीकींचा कुख्यात माफिया दाऊदशी संबंध जोडलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, दाऊद असो किंवा देशभरातील कोणताही गुन्हेगाराने भाजपात प्रवेश केला तर ते स्वच्छ होतात व संघही त्यांचे स्वागत करते. ज्यांच्याविरोधात गाडीभर पुरावे होते ते भाजपात आले, ज्यांना चक्की पिसिंग करणार होते त्यांना भाजपात घेतले त्यावर संघ काहीच बोलला नाही. भाजपा सरकारबरोबर बाबा सिद्दीकी आले, एकनाथ शिंदे आले व ते मुख्यमंत्री झाले त्यावेळी संघ का बोलला नाही. आता बाबा सिद्दीकींची हत्या झाल्यानंतर त्यांचा दाऊदशी संबंध दाखवण्याचा प्रयत्न ते का करत आहेत? राष्ट्रवादी काँग्रेसच्या नबाव मलिक यांच्यावरही भाजपाने दाऊदशी संबंध असल्याचा आरोप केला होता. त्याच नवाब मलिक यांचे मतदान भाजपाला चालते. भाजपाचे व संघाचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, असेही नाना पटोले म्हणाले.

# पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा, नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी

## मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्याच्या विविध भागात मागील काही दिवसांमध्ये परतीच्या पावसापरतीच्या पावसामुळे झालेल्या शेतीच्या तसेच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.



राज्यातील विविध भागांमध्ये अमरावती, पुणे, नाशिक, कोल्हापूर, मराठवाडा आदी विविध भागातील विविध जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये मागील काही दिवसात मुसळधार पाऊस झाला. काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. यामुळे अनेक ठिकाणी शेतपिकांचे नुकसान झाले आहे. बऱ्याच ठिकाणी शेतात काढून ठेवलेल्या विविध प्रकारच्या पिकांचे नुकसान झाले आहे. काढलेली पिके भिजली आहेत. विशेषतः भात, सोयाबीन, तूर, कपाशी, ऊस आदी विविध प्रकारच्या पिकांसह फळबागांचेही नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत. नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

जिल्हास्तरावरील आपत्ती व्यवस्थापन कक्ष, तालुकास्तरीय यंत्रणा, इतर सर्व संबंधित विभाग यांनी यासाठी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

## घाटकोपर फलक दुर्घटना : आरोपी भावेश भिंडेला सत्र न्यायालयाकडून जामीन

**मुंबई :** घाटकोपर येथील महाकाय फलक दुर्घटनेप्रकरणी अटकेत असलेला इगो मीडियाचा मालक भावेश भिंडे याला सत्र न्यायालयाने शनिवारी जामीन मंजूर केला. भिंडे याने अटकेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तसेच, अटक बेकायदा ठरवून तातडीने जामिनावर सुटका करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही केली होती. मात्र, भिंडे याला करण्यात आलेली अटक ही कायदेशीरच असल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट करून त्याची याचिका फेटाळली होती.

# अति.जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी घेतला मतदान केंद्रावरील सोयी-सुविधांचा आढावा

## मतदारांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व उपाययोजना करा जिल्हाधिकाऱ्यांच्या सक्त सूचना

■ मुंबई

जिल्हाधिकारी तथा अति. जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी मुंबई शहर जिल्ह्यातील मतदान केंद्रांना प्रत्यक्ष भेट देवून तेथील सुविधांचा आढावा घेतला. निवडणूक संबंधित सर्व अधिकारी यांच्याशी संवाद साधला. यावेळी उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्यामसूंदर सुरवसे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यादव म्हणाले, भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, कचरापेटी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हिलचेअर तसेच रॅम्पची व्यवस्था, रांगांमध्ये गर्दी झाल्यास मतदारांना बसण्यासाठी खुर्ची किंवा बाकडे, मोकळ्या ठिकाणी मतदान केंद्र असल्यास मंडपाची उभारणी,पंखे आदी निश्चित किमान सुविधा यादृष्टीने नियोजन करावे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व देखभाल दुरुस्त्या करुन घ्याव्यात. मतदान केंद्रावर ठळक अक्षरात येथील सुविधांचा फलक मतदार केंद्र क्रमांक, दिशादर्शक लावावेत. आयोगाच्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जेष्ठ नागरिकांमध्ये ज्यांचे वय 85 वर्षापेक्षा अधिक आहे असे नागरिक व दिव्यांग मतदार यांच्यासह निवडणूक कर्तव्यानिमित्त नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचारी मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगाने कार्यपध्दती विहित करुन दिली आहे. या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कोणताही मतदार आपल्या हक्कापासून वंचित राहू नये यादृष्टीने ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेले व दिव्यांग मतदारांना गृह मतदान करता येणार आहे. गृह मतदानासाठी नमुना 12-ड तत्काळ उपलब्ध करुन देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

मतदार नोंदणी झालेल्या प्रत्येक मतदाराला सुलभपणे मतदान करता यावे यासाठी मतदार चिठ्ठ्यांचे वितरण करावे व नागरिकांना मतदान केंद्राविषयी माहिती उपलब्ध करुन द्यावी. ज्या मतदारांचा संपर्क होत नाही त्यांना दूरध्वनी, एसएमएस, व्हाट्सअप अशा माध्यमातून संपर्क करावा आणि मतदार केंद्राची माहिती दयावी. कोणत्याही प्रकारची मतदारांची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी.असे आदेशही यादव यांनी यावेळी दिले.

यादव यांनी मुंबई शहर जिल्ह्यातील परिसरातील विविध मतदान केंद्रांना भेटी दरम्यान नागरिकांशी संवाद साधला. नागरिकांना मतदान स्लीप मिळाली का? मतदान केंद्र कुठे आहे? याबाबत विचारणा केली. अनेक मतदारांनी जिल्हाधिकारी यादव यांच्याशी संवाद साधला मतदान दिवशीचा अनुभव सांगितला त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकारी तिथेच आवश्यक सूचना दिल्या

## गीतकार मंगेश कुलकर्णी काळाच्या पडद्याआड

**मुंबई :** मराठी सिनेसृष्टीवर दुसरा आघात झाला आहे. काही दिवसांपूर्वी अभिनेते अतुल परचुरे यांचं निधन झालं. त्यानंतर आता सप्रसिद्ध गीतकार, चित्रपट लेखक आणि अभिनेते मंगेश कुलकर्णी यांचं निधन झालं आहे. मंगेश कुलकर्णी यांनी 'आभाळमाया', 'वादळवाट' यांसारख्या लोकप्रिय मालिकांचे शीषर्कगीत मंगेश कुलकर्णी यांनी लिहिली होते. गीतकार मंगेश कुलकर्णी यांनी वयाच्या ७६ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. मंगेश कुलकर्णी यांच्या निधनाने आभाळमाया, वादळवाट यांसारख्या लोकप्रिय मालिकांमधून शीर्षकगीतातून मनात रुंजी गीतकार हरपल्याची भावना अनेकांकडून व्यक्त केली जात आहे.

# चर्नी रोड ते ऑपेरा हाऊसपर्यंत पालिका बसवणार हेरिटेज विद्युत खांब

## दोन कोटींचा खर्च

■ मुंबई

चर्नी रोड ते ऑपेरा हाऊसपर्यंत रस्ते, पदपथ या ठिकाणी हेरिटेज पद्धतीचे विद्युत खांब बसविण्याच्या कामाला महापालिका आयुक्त कार्यालयाकडून मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी तब्बल दोन कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

सध्या आचारसंहिता लागू झालेली असली तरी तत्पूर्वीच प्रस्ताव मंजूर करून घेतल्याने सदर कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. कामाचे कार्यादेश मिळाल्यापासून पुढील १२० दिवसांत सदर काम पूर्ण करावयाचे आहे. तसेच, काम पूर्ण झाल्यावर त्याचे फोटो काढून पुरावा म्हणून सादर करणे कंत्राटदारवर बंधनकारक असणार आहे. त्याचप्रमाणे त्याला पुढील एक वर्ष हेरिटेज विद्युत खांबाची देखभाल आणि दुरुस्तीची कामे पहावी लागणार आहे.

मुंबई महापालिका आणि विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने मुंबईत शहर आणि उपनगरात विविध ठिकाणी सुशोभिकरणाची दोन हजार कोटी रुपयांची कामे यापूर्वीच हाती घेण्यात आली आहेत. मात्र काही ठिकाणी कामे युद्धपातळीवर सुरू असून काही ठिकाणी कामे प्रगतीपथावर आहेत तर काही कामे रेंगाळलेली आहेत.

मात्र सदर कामे मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री शहर जिल्हा दीपक केसरकर, पालकमंत्री उपनगरे मंगल प्रभात लोढा, महापालिका आयुक्त भूषण गगराणी चार अतिरिक्त आयुक्त यांच्याकडून निवडणूक आचारसंहिता लागू होईपर्यंत सतत पाठपुरावा करीत होते. मुंबईत महापालिका मुख्यालय परिसर, घाटकोपर, अंधेरी आदी परिसरात रस्ते, पदपथ, वाहतूक बेटे आदी ठिकाणी महापालिकेने सुशोभिकरण कामाच्या अंतर्गत हेरिटेज विद्युत खांब बसवणार आहेत.

दरम्यान, महापालिकेने चर्नी रोड ते ऑपेरा हाऊसपर्यंत रस्ते, पदपथ या ठिकाणी हेरिटेज पद्धतीचे विद्युत खांब बसविण्यासाठी टेंडर काढले होते. त्यामध्ये, महापालिकेने सदर कामासाठी १,७६,८१,६९४ रुपये इतका खर्च अंदाजित केला होता. मात्र टेंडर प्रक्रियेला चार कंत्राटदारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी, एक कंत्राटदार मे. अस्मी इंटर प्राईजेस याने तांत्रिक छाननीत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली नाही. त्यामुळे तो टेंडर प्रक्रियेत बाद ठरला, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

उर्वरित तीन कंत्राटदारांपैकी एक मे. पाटील इलेक्ट्रिकल याने अंदाजित खर्चापेक्षा शून्य टक्के कमी म्हणजे १,७६,८१,६९४ रुपये + ( अधिक १८ टक्के जी.एस.टी. अंदाजे ३० लाख रुपये) खर्च दाखवला. तर मे.आर.जे इन्फोटेक या कंत्राटदाराने अंदाजित खर्चापेक्षा फक्त २ टक्के कमी म्हणजे १,७३,२८,०६० रुपये + ( अधिक १८ टक्के जी.एस.टी. अंदाजे ३० लाख रुपये) एवढा खर्च दाखवला.

मात्र मे.जैन इंजि.वर्क्स याने अंदाजित खर्चापेक्षा पाच टक्के कमी म्हणजे १,६७,९७,६०९ रुपये + ( अधिक १८ टक्के जी.एस.टी. अंदाजे ३० लाख रुपये) एवढा खर्च दाखवला. त्यामुळे सदर कंत्राटदाराला सर्वात लघुत्तम दर ठरवत पात्र ठरवले. त्यामुळे आता हेरिटेज पद्धतीचे विद्युत खांब बसविण्याचे कंत्राट काम करण्यास मे. जैन पात्र ठरला.

# धारावीकरांचा उपयोग करुन मुंबईत वोट जिहाद - आमदार शेलार

■ मुंबई

शहरी नक्षलवादांच्या मार्गदर्शनानुसार उबाठा सेनेची लढाई ही अदानी साठी आहे. आमची लढाई धारावीतील गरिबांच्या घरासाठी आहे. धारावी पुनर्विकासाचा उपयोग करून तिथल्या रहिवाशांची माथी भडकवून, धारावीकरांचा उपयोग करून मुंबई व्होटजिहाद केला जातोय, असा गंभीर आरोप मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

धारावीबाबत पुन्हा आमदार ॲड आशिष शेलार यांनी मुंबई भाजपा कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन आदित्य ठाकरे यांना थेट सवाल केले. कोणीही विचारले नसताना आपले पिताश्री वारंवार सांगतात हा मर्दांचा पक्ष आहे म्हणून जर तुम्ही मर्दांचा पक्ष असाल तर खुल्या चर्चेला या, तुम्ही सांगाल तिथे चर्चेला यायला मी तयार आहे. आदित्य ठाकरे यांना उत्तरे देता येत नाहीत म्हणून आमच्या वर्षाताई गायकवाड यांना पुढे करुन अडचणीत आणू नका, असेही आमदार ॲड आशिष शेलार म्हणाले. आपल्याच परिवारातील प्राणी मित्र एका युवकांसाठी धारावीतील नेचर पार्कचा 37 एकरचा भूखंड बळकवण्याचा प्रयत्न उद्धवजींच्या पक्षाकडून होतोय. त्यासाठीच धारावी पुर्नविकासाला विरोध केला जातोय असा अरोप काल पुन्हा एकदा आमदार ॲड आशिष शेलार यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, फेक नॅरेटिव्ह रोखणे माझे काम आणि मुंबईकरांच्या हितासाठी बोलणे माझे कर्तव्य आहे. आता राष्ट्रीय पक्षांचे काही नेते पण शहरी नक्षलवाद्यांचे अजेंडा मांडू लागलेत. म्हणून पळ काढणाऱ्या आदित्य ठाकरे यांना खुले आव्हान हिंम्मत असेल तर चर्चेला या. अन्यथा निर्बुध्द म्हणून तुम्हाला दिलेली पदवी खरी ठरेल, असेही ते म्हणाले.

अदानीला अधिकचा एफएसआय दिला असे खोटे पसरवले जाते आहे, पुर्नविकासाच्या प्रचलीत नियमापेक्षा एक इंचही अधिकचा एफएसआय धारावीसाठी देण्यात आलेला नाही त्यामुळे केवळ खोटं पसरवून, धारावीकरांची माथी भडकवून मते मिळवण्याचा प्रयत्न आदित्य ठाकरे करीत आहेत. मुंबईकरांनी सावधान झाले पाहिजे. आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असा जो शिक्का धारावीच्या माथी आहे तो पुसण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. ४३० एक जागेपैकी २३० एकर जागेमध्ये मोकळया जागा, मैदान, बगिचा, मेट्रो, बस, मोनो, रेल्वे, भूयारी मेट्रोचा मल्टी कॉरिडॉर ट्रान्सपोर्ट हब येथे होणार आहे त्याला विरोध करुन त्यापासून मुंबईकरांना वंचित ठेवले जातेय. या भागातून मुंबई महापालिकेला एकही रुपयांचा मालमत्ता कर,सिव्हरेज टॅक्स, दुकान लायन्सन फी मिळत नाही. हे उत्पन्न वाढवणारे तसेच रेंटल घर योजनेतून, घरांच्या विक्रीतून मुंबई महापालिकेला १५ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे त्याला विरोध केला जातोय. मुंबईत करून सावधान आणि म्हणून आमची विनंती आहे मुंबईकर तुम्ही व्यक्त व्हा, मुंबईकर तुम्ही तुमच्या मुलभूत अधिकारासाठी व्यक्त व्हा आणि धारावीकर हो तुम्ही तुमच्या हक्कासाठी व्यक्त व्हा, असे आवाहन त्यांनी केले. विरोधकांची लढाई अदानासाठी आहे आमची लढाई गरिबांच्या घरासाठी आहे.

त्यांच्या डोक्यात फक्त अदानी, आमच्या डोक्यात धारावी आणि मुंबईकराला मिळणाऱ्या सेवा सुविधा आहेत, म्हणून काही प्रश्न उपस्थित केले आहेत, ही सुरुवात आहे हिम्मत असेल तर उत्तरे दयावीत, असे आव्हानही त्यांनी केले. काँग्रेसने २००० पुर्वीच्याच झोपडयांना संरक्षण दिले होते भाजपा सरकारने २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण दिले आहे. त्यामुळे धारावील २०११ पर्यंतच्या रहिवाशांना धारावीतच घरे मिळतील. त्यानंतरजी घरे आहेत म्हणजे ज्यांनी दोन मजले बांधले आहेत जी अशा पुर्नविकासात पात्र

# मार्वे बीचवरील बेकायदा बांधकामावर पालिकेचा हातोडा



■ मुंबई

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजताच निवडणुकीच्या आड मुंबईत मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामांचा सुळसुळाट झाला आहे. मालाड पूर्वेकडील मार्वे बीच टी जंक्शन जवळ दोन हजार चौरस मीटरचे तीन गाळे दोन दिवसांत बांधण्यात आले. मात्र पालिकेच्या पी उत्तर विभागाला याची तक्रार मिळताच ते गाळे जमीनदोस्त करण्यात आले.

पी उत्तर विभागाचे सहायक अभियंता विजय मानकर यांनी सांगितले की, मार्वे बीच जवळील टी जंक्शन येथे बेकायदा बांधकाम झाल्याची तक्रार मिळताच. उप अभियंता कुबेर शिंदे आणि प्रवीण मुलुक यांच्यावर बेकायदा बांधकाम जमीनदोस्त करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. शिंदे आणि मुलुक यांनी तातडीने बेकायदा बांधकाम झाले त्याठिकाणी जाऊन त्यावर हातोडा चालवला. निवडणूक काळात भूमाफिया अधिक सक्रिय होतात. बेकायदा बांधकाम झाल्याची माहिती मिळताच संबंधितांना नोटीस बजावण्यात येते. मात्र निवडणूक संपताच भूमाफिया न्यायालयात धाव घेतात आणि कारवाईला स्थगिती मिळते. त्यामुळे बेकायदा बांधकाम झाल्याची तक्रार मिळताच पी उत्तर विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत असल्याची माहिती इमारत विभागाचे कार्यकारी अभियंता सागर राणे यांनी दिली.

# गोरेगाव मुलुंड जोडरस्त्याआड आलेले ४० वर्षे जुने मंदिर हटवले, पालिकेच्या विभाग कार्यालयाची कारवाई

■ मुंबई

गोरेगाव – मुलुंड जोड रस्ता प्रकल्पाआड आलेले ४० वर्षे जुने काली माता मंदिर पालिकेच्या पी उत्तर विभागाने शुक्रवारी हटवले. रस्त्याच्या मधोमध असलेले हे मंदिर हटवल्यामुळे रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. मंदिराशी संबंधितांना कायद्यानुसार २५ लाख रुपये मोबदला देण्यात आला आहे.

पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा गोरेगाव – मुलुंड जोडरस्ता मुंबई महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक आहे. सुमारे १२.२ किमी लांबीचा हा मार्ग चार ते पाच विभागांतून जातो. या मार्गावर अनेक ठिकाणी बांधकामे, अनधिकृत बांधकामे असल्यामुळे ती टप्प्याटप्प्याने हटवली जात आहेत. या प्रकल्पाच्या मार्गावरील अनेक बांधकामे आतापर्यंत टप्प्याटप्प्याने हटवण्यात आली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी या रस्त्याच्या मधोमध असलेले एक मंदिरही हटवण्यात आले आहे.

सुमारे २०० चौरस फूट जागेत असलेले काली माता मंदिर ४० वर्षे जुने होते. मात्र रस्त्याच्या मधोमध असल्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडी (बॉटलनेक) होत होती. हे मंदिर हटवल्यामुळे या प्रकल्पाला वेग येणार आहे. तसेच मालाडमधील वाहतूक समस्या सोडवण्यासही मदत होणार आहे. मालाडमधील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभाग कार्यालयाच्या वतीने एकापाठोपाठ एक रस्ता रुंदीकरणाची कामे हाती घेतली आहेत. याचाच एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. अत्यंत संवेदनशील अशी ही कारवाई पार पाडण्यात आली असून पालिकेच्या कायद्यानुसार मंदिराशी संबंधितांना २५ लाख रुपये मोबदला देण्यात आला असल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. एक जेसीबी सयंत्र, २० कामगार आणि पाच अभियंते यांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली.

**मध्य रेल्वे**

**बोगीजचे स्ट्रिपिंग, क्लिनिंग आणि पेंटिंग आणि अन्य कामे**

**कामाचे नाव :** (१) परेल कार्यशाळा, मुंबई येथे फियॅट बोगीजचे स्ट्रिपिंग, क्लिनिंग आणि पेंटिंग आणि अन्य कामे [परी. ५८८ बोगी संच] **कामाचे अंदाजे मूल्य:** रु. १२,४०,९८५.७६. निविदा अर्जाचे शुल्क: -. इरठे: री. २४,८००/-. **पूर्तता कालावधी:** १० महिने. (२) दोन वर्षांच्या कालावधीसाठी व्हील शॉपमधील सीएनसी व्हीटीएल प्लांट क्र. २६४६ चे सर्वंकष एएमसी. **कामाचे अंदाजे मूल्य:** रु. २१,२९,८४९/-. **निविदा अर्जाचे शुल्क :**-. वरील ई-निविदेच्या सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ १४/११/२०२४ रोजी १७.०० वा. पर्यंत आहे. ई-निविदेचा पूर्ण तपशिल अधिकृत रेल्वे संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे.

**खुला ई-निविदा सूचना क्र. – (१) पीआर-पीओएच-एससीपी-२४-२५-६७३ (२) पीआर-पीडी-व्हीटीएल-२४-२५-६८० दिनांकित** १६/१०/२०२४

481

**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**

**CENTRAL RAILWAY**

**COLLECTION AND TESTING OF SAMPLES & VARIOUS OTHER WORKS**

**Name of Work: 1)** Collection and testing of various samples for environment monitoring at Parel Workshop for years 2024 & 2025 of Loco Workshop, Parel. **Approx Cost :** ₹ 2,51,104/-. **Cost of Tender Form**: - **EMD:** ₹ 5,000/-. **Completion Period:** 24 months. **2)** CAMC of facial attendance system at Loco Workshop, Parel. **Approx Cost:** 4,27,619.13. **Cost of Tender Form: - EMD:** ₹ 8,600/-. **Completion Period:** 24 months. The Time and Date for Submission of above E-tenders will be up to **17.00 Hrs.** on **12/11/2024.** Complete details of E tenders is available at official Railway website **www.ireps.gov.in.**

**Open E-Tender Notice No.:**
**1) PR-ISO14001-24-25-669**
**2) PR-CC-FAS-24-25-671**

476

**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**

**मध्य रेल्वे**

**२५ केव्हीए इन्व्हर्टरचे एएमसी**

वरी. डीईई (कोचिंग), मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ४००००१ भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे खुली ई-बोली मागवित आहेत. कामाचे नाव: तीन वर्षांच्या कालावधीसाठी मध्य रेल्वेच्या मेल/ एक्स्प्रेस गाड्यांच्या आरएमपीयू प्रकारच्या एसी कोचेसमध्ये बसविण्यात आलेल्या हिताची हाय-रेल बनावटीच्या २५ केव्हीए इन्व्हर्टरचे वार्षिक देखभाल कंत्राट. (निविदा क्र. बीबी. एलजी.डब्ल्यू.सीएसएमटी.२०२४.११) कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,८५,८५,०००/-. इरठे: रु. २,४३,०००/- वैधता: ६० दिवस. पूर्तता कालावधी: ३६ महिने, निविदा समाप्ती दिनांक: १४/११/२०२४ रोजी १३.०० वा. बोलीदारांना सूचना : १. अंतिम तारखेनंतर निविदा उघडल्या जातील. २. संभाव्य बोलीदारांना अधिक तपशिलांसाठी आमच्या www.ireps.gov.in वेबसाइटला भेट देण्याची विनंती करण्यात आली आहे, जर असेल तर निविदा आणि शुद्धीपत्र. ३. बोलीदार आमच्या www.ireps.gov.in या वेबसाइटद्वारे वरील ई-निविदेत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहभागी होऊ शकतात. केवळ ई-निविदेवर मॅन्युअल ऑफर सादर करण्याची परवानगी नाही. व्यक्तिचलितपणे, सबमिट केल्यास ते उघडले जाणार नाही किंवा विचारात घेतले जाणार नाही. ४. पुढील चौकशीसाठी वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (कोचिंग), ॲनेक्स बिल्डिंग, पहिला मजला, मध्य रेल्वे, सीएसएमटी मुंबई यांच्याशी संपर्क साधावा. ५. ही बोली सार्वजनिक खरेदी धोरण (मेक इन इंडिया) आदेश २०१७ चे दिनांकित १५.०६.२०१७ पालन करते औद्योगिक प्रोत्साहन आणि धोरण विभाग, वाणिज्य मंत्रालयाने जारी केलेले, रेल्वे बोर्ड पत्र क्र. २०१५/आरएस(जी)/७७९/५ दिनांक ०३.०८.२०१७ आणि २७/१२/२०१७.

खुला ई-बोली सूचना क्र. : ०९/२०२४/ दि. १४/१०/२०२४

479

**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**

जर तुम्हाला वेगाने चालायचे असेल तर एकटे चाला. तुम्हाला लांब चालायचे असेल तर इतरांसोबत चाला.



- रतन टाटा
प्रसिध्द उद्योगपती






# साप्ताहिक भविष्य प्रवाह



श्री पावशे शास्त्री (गुरुजी)
२१८/डी २,
सहयोग, डी -२, गोराई २,
बोरिवली (प)., मुंबई - ९२
मो. ७७३८००६४३४

**२१-१०-२०२४ ते २७-१०-२०२४ (रविवार ते शनिवार)**

**मेष - समाधानी वृत्ती राहु शकेल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना लाभात वाढ होऊ शकेल.या दिवसांत जे काही बदल होणार आहे ते अनपेक्षित बरे असु शकतील.त्यामुळे बदल स्वीकारून पुढे जा.म्हणजे नुकसान होणार नाही.इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन समंसपनाचा असु शकेल.असे हे सर्व दिवस असेचआहेत. हा तात्पुरत्या वलयाचा असु शकेल.हे तुम्हाला माहीत झालेले आहे. तरीसुद्धा गैरसमज करून घेणे बरे नसेल. केलेले सकारात्मक विचार पोषक ठरु शकतील.व्यवसायात प्रगती होऊ शकेल. नोकरदार वर्गाला कामामध्ये समाधानी वृत्ती राहु शकेल.मनमानी टाळलेली बरी.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून करावेत.घरगुती वातावरण चांगले राहील. मित्र-मैत्रिणींशी मात्र जेवढ्यास तेवढे राहाने पोषक असेल.दुरावा येणार नाही.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**वृषभ - भाग्योदय होऊ शकेल.**
ग्रहबळ पहाता संपूरण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियजितकामे करतांना भरभरुन यश मिळेल.या सर्व दिवसांचा कालावधी उत्तम राहु शकेल.हे दिवस तुमच्यासाठी प्रसिद्धीचे आहेत.असे समजायला हरकत नाही.आतापर्यंत तुम्ही ज्या गोष्टींसाठी प्रयत्न करत होता तो प्रयत्न यशस्वी होतनव्हता.विलंब लागत होता.सध्या तो लागणार नाही.सहज मार्गी कामे होत राहतील.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदात चांगली वाढ होऊ श केल.केलेले पोषक विचार प्रतिष्ठेत वाढ करु शकतील. नियोजीत असलेल्या व्यवसायात भरभराट होऊ शकेल. नोकरदार वर्गाला नवीन कामाची जबाबदारी मिळेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानी राहाल. राजकीय क्षेत्रात ऊत्तमयश मिळेल.मित्रमैत्रिणींचे नाते अतूट होईल. धार्मिक कार्यासाठी खर्च कराल.सहकार्य मिळेल.
**विद्यार्थी -** आरोग्य ठणठणीत राहील.
**शुभदिनांक-२२-२३-२४.**

**मिथुन - जरा धीर धरणे बरे राहील.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना सकारात्मक स्थिती असु शकेल. या सर्व दिवसांत स्वत:ला झेपेल अशाच गोष्टी कराव्या लागतील.ज्या गोष्टी तुम्हाला जमणार नाहीत अशा गोष्टींची जबाबदारी घेऊच नका.अन्यथा नुकसान होऊ शकते. त्यामुळे कदाचित तुमची चिडचिड होऊन इतरांबरोबर वा द-विवादही होऊ शकतात.प्रत्येक गोष्टीत आपलेच खरे करणे सध्यातरी योग्य राहणार नाही.सध्या इतरांचे मत ऐकून घ्यावेच लागणार.परिश्रम लाभात वाढ करु शकेल. व्यवसायात मागील काही दिवसांपेक्षा सध्याचे दिवस चांगले आहेत.नोकरदार वर्गाला संवादाची गरज भासेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत बचत करणे योग्य राहु शकेल. समाजसेवेची आवड राहील.कुटुंबाची जबाबदारी पार पाडावी लागेल. आध्यात्मिक गोष्टीत मन रमवावे लागेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे असेल.
**शुभदिनांक-२४-२५-२६.**

**कर्क - विश्रांतीची गरज असेल.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना दगदग करुन चालनार नाही.ज्यावेळी सप्ताहात असे भ्रमण असते. त्यावेळी एक गोष्ट लक्षात ठेवावे लागते.ते असे आपण सावधानतेने पाऊल टाकणे गरजेचे राहील.तुमची बाजू सत्य असली तरी ती समोरच्याला पटणार नाही.तेव्हा कोणाला सांगायला किंवा सल्ला द्यायला जाऊ नका."आपले काम भले नि आपण भले" कोणतेही महत्त्वाचे निर्णय सध्या तरी घेऊ नका. सर्व दिवस जपून पाऊल टाका. रागनियंत्रण बरे राहील. व्यवसायात जे चालले आहे. ते योग्य असे समजून पुढे चला.नोकरदार वर्गाने कामात वेळिच लक्ष द्यावे लागेल.
**महिला -** आर्थिक बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न वेळिच करावा लागेल.जोडीदाराच्या सल्ल्याने सर्व निर्णय घ्यावेलागतील. मानसिकदृष्ट्या शांतता राखावी लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृतीची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-२५-२६-२७.**

**सिंह - मध्यस्थी करु नका.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना विचार करुन करत चला.कारण या दिवसांत जे काही निर्णय घेणार त्या निर्णयांना तित केसे यश मिळणार नाही.असे असतानासुद्धा तुम्ही निर्णय घेतले तर ते कदाचित चुकीचे ठरू शकतात.तेव्हा थोडेसे शांत राहून विचार करून मगच निर्णय घ्यावेत.ज्यावेळी दिवस चांगले असतात त्या दिवसांत निर्णय घेणे म्हणजे यशाच्या पायरीपर्यंत पोहोचण्यासारखे असते.कोणतीही घाई करू नका.वर्तमान काळ गुंतवनुकीस चांगला.व्यवसाय नवीन गुंतवणूक अविचाराने करू नका. नोकरदार वर्गाने कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालू नका.
**महिला -** आर्थिक नियोजन पक्के करावे लागेल.कुटुंबाशी जुने असलेले वादविवाद टाळावे लागतील.समाजसेवा करतांना विनाकारण चिडचिड करु नका.
**विद्यार्थी -** प्रकृतीत निष्काळजीपणा टाळा.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**कन्या - उत्तम आठवडा जाईल.**
ग्रहसंकेतपहाता संपूर्ण सप्ताह लाभदाक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संवाद साधत चला.चांगले यशमिळवु शकाल.या सर्व दिवसांत कोणतीही देवाण-घेवाण करताना व्यावहारिकपणे करणे अधिक पोषक राहील.भावनिकपणे कोणतेही केलेले व्यवहार कदाचित नुकसानीचे ठरू शकतात.इतरांच्या सांगण्या बोलण्यावर लक्ष देऊ नका.उगाच चांगली वेळ वाया जाऊ शकेल.जेडोळ्यांनी प्रत्यक्षात दिसते त्यावर विश्वास ठेवा.दिवस चांगले असतील.होणारा लौभसबोल लाभात उत्तम वाढ करु शकेल.व्यवसायात फायद्याचे प्रमाण उत्तम राहु शकेल.नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सदैव सहकार्य मिळु शकेल.
**महिला -** समाधानकारक लाभ होऊ शकतील.वायफळ खर्च कमी करावे लागतील.समाजसेवेतून आनंद मिळेल. मैत्रीचे नाते दृढ होईल. घरगुती वातावरण चांगले राहील.
**विद्यार्थी -** साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-२२-२३-२४.**

**तूळ - परिपक्वता वाढेल.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना सफलता मिळवु शकाल.या सर्व दिवसांचा कालावधी अधिक चांगला कसा जाईल ते पाहिलेले बरे राहील.कारण या दिवसांत कदाचित नको त्या गोष्टी मागे लागू शकतात.अशावेळी घाईगडबडीने कोणतीही गोष्ट करणे कदाचित त्रासाचे राहील.या दिवसांत कोणत्याही अफवांना बळी जाऊ नका.अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.स्वत:चे व्यवहार इतरांच्या हातात देऊ नका.स्वत:च निर्णय घ्यावे लागतील.पोषक बदल चांगला राहील. व्यवसायात परिळ्माने चांगली परिपक्वता येऊ शकेल. नोकरदार कामात जबाबदारी पडत होती ती कमी होईल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या चांगली सफलता मिळु शकेल.राजकीय क्षेत्रात वरिष्ठांचे सहकार्य मिळु शकेल.घरगुती कार्यक्रमाचे नियोजन यशस्वी होऊ शकेल.धावपळ होईल.
**विद्यार्थी -** आरोग्य काळजी घ्या.
**शुभदिनांक-२४-२५-२६.**

**वृश्चिक - स्वतहावर नियंत्रण ठेवा.**
ग्रहसंकेतपहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम वाढवावा लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना उगाचच पोकळ आठवणी जागवतील.त्यातुन वेळिच बाहेर पडने बरे राहील.संवाद वाढवावे लागतील.सप्ताहात सर्वच दिवस प्रतिकूल आहेत."हमकरे सो कायदा"याचा धोका वेळिचओळखने बरे राहील.असेच म्हणायला हरकत नाही.कारण असा कोणताच दिवस नाही की त्यात मनस्ताप संताप चिडचिड होनार नाही.नियंत्रण बरे राहु शकेल.नियोजित उपासना सोडु नका.व्यावसायिकदृष्ट्या गुंतवणूक विचारपूर्वक वाढवावी. नोकरदार वर्ग कामात पूर्णपणे व्यस्त राहावे लागेल.
**महिला -** आर्थिक ताणतणाव कमी होईल असे दिसत नाही.हाती घेतलेले आहे त्या कामाला विलंब होईल. जे आहे त्यातच समाधान मानत मानने बरे.राग नको.
**विद्यार्थी -** मित्र दूर होतील.
**शुभदिनांक-२५-२६-२७.**

**धनू - परंपरा जपु शकाल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना प्रतिसाद मिळु शकेल.सध्या या आठवड्यात असा कोणताच दिवस नाही की जो विशेष काळजी वाढवणारा आहे.मग अशी परिस्थिती असेल त्यावेळी मात्र तुम्ही शांतपणे दिवस पुढे ढकलता. महत्त्वाचे कोणतेही काम करत नाही.तेव्हा सध्या दिवस बर्यापै की बरे आहेत हे विसरू नका.नियोजित कामाला कदाचित गती येईल.तयारी करून कामाला लागावे लागेल.इतरांची मदतही मिळेल. आहारनियंत्रण महत्वाचे असेल.व्यवसायात फायद्याचे प्रमाण बर्यापैकी बरे राहु शकेल.नोकरदार वर्ग कामात संदर्भात वरिष्ठांशी चर्चा करावी.
**महिला -** आर्थिक लाभ बरे होऊ शकल.समाजसेवा करण्याची आवड नसली तरी तुम्हाला ती करावी लागेल. धार्मिक कार्यात सहभाग नसला तरी सहकार्य कराल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**मकर - उत्तम आघाडी मिळवाल.**
ग्रहप्रभावपहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.सर्व दिवसांचा कालावधी अत्यंत चांगला राहु शकेल.सध्या तुम्ही जे ध्येय ठरवलेले आहे ते ध्येय सहज पूर्ण होणारे आहे.त्यासाठी कोणाची मदत घ्यावी लागणार नाही. स्वत:चे काम स्वत:कराल.तुम्ही घेतलेले निर्णय योग्य असु शकतील. धावपळीचा मार्ग कमी होऊ शकेल.उत्साह वाढेल.अनपेक्षित असे प्रस्ताव तुमच्यापुढे येतील.ते तुमच्यासाठी खूप चांगले असतील. अचानक लाभ वाढतील. व्यावसायिकदृष्ट्या उत्तमआघाडी मिळवु शकाल.नोकरदार वरिष्ठांचे मत घेऊनच नियमावली तयार करावी.
**महिला -** आर्थिकआवक वाढेल.सध्या सार्वजनिक ठिकाणी वेळ देणे शक्य होणार नाही.जोडीदाराचे सहकार्य उत्तम मिळु शकेल. आध्यात्मिक गोष्टींची आवड राहील.
**विद्यार्थी -** प्रकृतीत चांगली सुधारणा.
**शुभदिनांक-२२-२३-२४.**

**कुंभ - नियंत्रण ठेवत चला.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊशकेल.नियोजित कामे करतांना यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांनाहे दिवस एक घाव दोन तुकडे असे करून चालणार नाही.त्यामुळे कदाचित नुकसान होऊ शकते.त्यापेक्षा शांततेच्या मार्गाने गोष्टी चांगल्या होतील. स्वत:वर नियंत्रण ठेवने अधिक पोषक राहु शकेल. वाद विवाद या गोष्टींपासून लांब राहा.आपले मत इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.समोरच्याला काही गोष्टी नाही पटल्या तर सोडूनद्या. वाद अजिबात करु नका.व्यवसायात भागीदारी व्यवसाय करताना व्यवहाराला महत्त्व द्यावे.नोकरदार वर्गाला सामूहिकरीत्या काम करावे.
**महिला -** वेळेचे महत्व वेळिच ओळखुन वेळेवर कामे करा.लाभ होतील.आर्थिक बाबतीत बचत करावी लागेल कुटुंबात स्वस्थ राहा. आहाराचे पथ्य पाणी सांभाळा.
**विद्यार्थी -** यश मिळवाल.
**शुभदिनांक-२४-२५-२६.**

**मीन - आळस बाजूला करावा.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उगाचच चिडचिड करुन नुकसानओढवुन घेऊ नये.या दिवसांत आळस बाजूला सारून काम करावे लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना जबाबदारिने बोलने बरे राहील.समाजात कामे करतांना कोणावर अवलंबून राहून काम करायचे ठरवल्यास ते होणार नाही. तेव्हा को णाची अपेक्षा ठेवू नका.कोनत्याही गोष्टीचा शुभारंभ या दोन दिवसात करू नका.येणारे प्रस्ताव स्वीकारू नका.नियमबाह्य गोष्टी टाळाव्यात.प्रवास बरा राहु शकेल.व्यावसायिकदृष्ट्या पावले जपुन टाकावे लागतील.नोकरदार वर्गाला सध्या आहे त्यात समाधान मानावे लागेल.
**महिला -** वायफळ खर्चाची बाजू कमी करावी लागेल ते सांभाळा. मित्र-मैत्रिणींशी उगाचच सलोखा वाढवु नका. घरगुती वातावरण साधारण बेरराहील.शांत रहाणे बरे.
**विद्यार्थी -** उगाचच चिडचिड नको.
**शुभदिनांक-२५-२६-२७.**

# महाकर्जाच्या खाईत महाराष्ट्र!

**प्रविण पुरो**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा बार उडतो असं दिसताच सत्ताधारी युती सरकारने जणू महाराष्ट्रच विकायला काढलाय असे निर्णय घेऊन टाकले आहेत. यापूर्वी विधानसभा वा लोकसभेच्या निवडणुकीआधी असे निर्णय घेतले गेले. पण यावेळचे निर्णय म्हणजे अतिरेकाचा कळस म्हणता येईल. महाराष्ट्र कंगाल झाला तरी चालेल पण सत्ता मिळालीच पाहिजे, ही मनिषा बाळगलेल्या महायुतीतील तिन्ही पक्षांनी महाराष्ट्र विकायला काढलाय, अशीच ही परिस्थिती आहे. जो मागेल त्याला रमणा वाटायचा असा खेळ सरकारने खेळला आणि राज्याला रिकामं खोकं बनवून टाकलं. हा सारा तात्पुरता मामला असावा, असं वाटत असताना या योजना कायम सुरू राहतील, असं जाहीर करत मुख्यमंत्र्यांनी राज्य विक्रीचा परवानाच मिळवलाय, असंच जणू सांगून टाकलंय. एखादा प्रकल्प हाती घ्यायचा तर केंद्रातल्या विरोधी सरकारकडून त्याला संमती मिळत नसे. त्या सरकारच्या अधिपत्त्याखालील रिझर्व्ह बँकेकडून त्याला नकारघंटा मिळे. आज राज्य रसातळाच्या जागी पोहोचूनही सरकारला थांबवण्याची तयारी यापैकी एकाचीही नाही. महाराष्ट्र हे चाराऊ कुरण असल्याने आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी या राज्याला हवं तसं लुटलं. कराचा मोठा वाटा या राज्याकडून काढून घेऊन सुजलाम राज्य म्हणून ठरवून दिलेला वाटाही द्यायचा नाही, असा पणच जणू केंद्र सरकारने केला आहे. याची परिणती राज्य खड्ड्यात जाण्यात झाली. ही नीती अशीच राहिली तर कर्जाच्या खायितून ते बाहेर येईल, यावर कोणालाच भरवसा नाही.

2014मध्ये राज्याच्या राजवटीतून काँग्रेस पायउतार झाली तेव्हा या राज्यावरील कर्जाचा बोजा हा 50 हजार कोटी इतका होता. तो आज 9 लाख कोटींवर जाऊन पोहोचला असल्याने राज्यातली प्रत्येक व्यक्ती ही 7 लाखांची कर्जाच्या खायित गेली आहे. कर्जाचं हे डोंगर कमी होणं आता शक्य नाही. त्याच्या वसुलीसाठी आजपासूनच प्रयत्न करावे लागतील. ते न केल्यास महाराष्ट्राची आर्थिक वासलात ठरलेलीच आहे, म्हणून समजा. सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी योजनेने तर राज्याची तिजोरी जलदगतीने खाली होत आहे. इतर कोणत्याही खात्याची देणी देणं अवघड बनत आहे. कंत्राटदारांची बिलं देणं प्रशासनापुढचं मोठं आव्हान आहे. हे पैसे द्यायचे कसे, असा प्रश्न आ वासून उभा आहे. बहिणी खूश झाल्या खऱ्या पण वर्षाकाठी 35 हजार कोटी आणणार कुठून, याचं साधं उत्तर सरकार देत नाही. हाताला काम देण्याऐवजी असे बिनमेहनतीने पैसे वाटले की त्याचा बोजा आपोआप करदात्यांवर येतो. गेल्याच आठवड्यात मुद्रांक शुल्कातून 100 रुपयांचे मुद्रांक रद्द करत ते 500 रुपये करून सरकारने आपले दात दाखवायला सुरुवात केलीच आहे. तिथे द्याचे आणि इथे काढायचे हे उद्योग परवडणारे नाहीत. जे काम 100 रुपयात व्हायचं त्याला आता चारशेपट खर्च करावे लागणार आहेत. हा पैसा कोणाचा? बहिणीच्या नावाखाली तिच्या भावाचे खिसे रिते करण्याचा हा प्रकार होय.

जाहीर केलेल्या योजनांच्या जाहिरातींनी तर उबग आणलाय. जिथे जावं तिथे जाहिरातच जाहिरात, 1500 रुपये वाटण्यासाठी 200 कोटींच्या जाहिराती केल्या जात असतील, तर केंद्रातल्या मोदींचा मार्ग या सरकारने अवलंबला आहे, असंच म्हणता येईल. आधीच या योजनेत पारदर्शकता नसल्याने एकाच व्यक्तीने 30 बहिणींची खाती काढून पैसे लाटल्याचं प्रकरण पुढे आलं. शाळेतल्या मुलींच्या नावेही पैसे जमा होऊ लागल्याच्या घटना तर बँकांमधील कर्मचाऱ्यांनाही तोंटात बोट घालायला लावत आहेत. दीड हजारांचा बोनस घेणाऱ्या बहिणींच्या चेहऱ्यावर हसू दिसत असलं तरी ज्याला कर द्यावा लागतो, त्याच्या चेहऱ्यावरचं हसू केव्हाच गेलंय. बहिणींकडून हातावर राखी बांधून घेताना राज्याचा आर्थिक हातच अधू होण्याची लक्षण दिसू लागली आहेत. काहीही करण्याची आवश्यकता नाही, रमणा वाटल्याचे फोटो झळकवले की सरकारचं काम झालं, अशी ही परिस्थिती आहे. हे या एका योजनेपुरतं मर्यादित नाही. गेल्या 15 दिवसात जाहीर झालेल्या योजनांचा पसारा पाहिला की सरकार इतकं उदार कसं होऊ शकतं, असा प्रश्न सहज पडतो. एखादा निर्णय राज्याचं हित डोळयापुढे ठेवून घेतला जातो तेव्हा त्याचा प्रसार, प्रचार करण्याची आवश्यकता पडत नाही. मात्र ज्या निर्णयात स्वार्थ दडलेला असतो त्याचा प्रसार केल्याविना पर्याय नसते. मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींचा रमणा हा स्वार्थ कक्षेतला भाग झाल्याने त्याचा जोरकस प्रचार सुरू आहे. यासाठी लागणारा पैसा हा करदात्यांच्या पैशातून जात असल्याने हा करदाता बोटं मोडत असेल तर ते अयोग्य कसं म्हणता येईल? कोण्या वेड्या सत्ताधारी आमदाराने या रमण्याला बाजारात उलाढालीचं केंद्र मानलं. मुंबई प्रवेश टोल बंद करण्याचा निर्णयही असाच अज्ञान मुलक आणि बिनडोक म्हटला पाहिजे.

साठ वर्षांवरील वृध्दांना देशांतर्गत तीर्थ पर्यटनाचा लाभ देण्याचा निर्णय तर वेड घेऊन पेडगावला जाण्याचा प्रकार होय. यासाठी लागणारा निधी आणायचा कुठून हा वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी विचारलेला प्रश्न गंभीर आहे. या योजना राबवायच्या पैशांची तरदूत करायची कशी असा प्रश्न त्यांच्यापुढे आहे. राज्यात विविध कामं करणाऱ्या नोंदणीकृत कंत्राटदारांची संख्या जवळपास तीन लाखांहून अधिक आहे. या कंत्राटदारांनी केलेल्या कामांचे पैसे त्यांना अनेक महिन्यांपासून देता आलेले नाहीत, असं ट्रेझरीतील कर्मचारी सांगतात. अशी देणी 40 हजार कोटींच्या घरात पोहोचली आहेत. सरकारी काम करण्यासाठी या कंत्राटदारांनी व्याजाने पैसा उभा केला आहे. त्याचं व्याज आपसुक वाढतच आहे. एकट्या उत्तर महाराष्ट्रात 4000 कोटी, मराठवाड्यात 4200 कोटी, पश्चिम महाराष्ट्रात 2500 कोटी आणि विदर्भातील 6500 कोटींची थकित बिलं या विभाग ट्रेझरीचं संकट बनलं आहे. 11 आक्टोबरला राज्यातील कंत्राटदारांची एक ऑनलाईन बैठक पार पडली. तीन लाख कंत्राटदारांनी राज्यपालांकडे लेखी तक्रार नोंदवली. होमगार्डचा भत्ता द्यायला सरकारकडे पैसे राहिलेले नाहीत. तिथे सामान्यांच्या गरजा पुरवण्यासाठी सरकार काय करणार, असा प्रश्न आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना द्यायची रक्कम 2024-25 या वर्षासाठी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. खूप गजहब झाला आणि सरकारला ती पुन्हा सुरू करावी लागली. आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांना गेल्या महिन्यांच्या वेतनासाठी वाट पहावी लागली. कोतवाल आणि पोलिस पाटलांच्या मानधनाला तर काटच मारून टाकण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनाला 25 टक्के कट मारणं भाग पडलं आहे. हे असंच होणार असेल तर आम्हास आंदोलनावाचून पर्याय नाही, असा इशारा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

20 हजार कोटींच्या महसुली तुटीच्या अर्थसंकल्पानंतर योजनांच्या भडिमाराने महाराष्ट्राची कंबर अक्षरक्ष: लुळी पडली आहे. या संकटातून बाहेर येण्याचा मार्ग राज्याकडे आज तरी नाही. वित्त सल्लागार म्हणून काम करणारे निरज हातेकर यांनी तर असाच कारभार राहिला तर राज्य व्हेंटिलेटरवर ठेवण्यावाचून पर्याय नाही, असा इशारा दिला आहे. महिलांच्या कष्टाला योग्य मोल दिलं तर तिला पगाराचे 12 हजार मिळतील, अशी व्यवस्था केली तर उत्पन्नाचाही मार्ग रुंदावेल, असं हातेकर यांचं म्हणण आहे. निवडणुकीच्या तोंडावर एकाच दिवसात जारी केलेल्या 259 जीआरनंतर महाराष्ट्राची अवस्था पंगू बालकासारखी होईल, असं हातेकर सांगतात. 27 महामंडळांच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या नावांची घोषणा लक्षात घेता सरकारला निवडणुकीला तोंड देणं किती अवघड आहे, हे दाखवून देतं. कार्यकर्त्यांची सोय लावल्याविना निवडणुकीला सामोरं जाणं सत्ताधाऱ्यांना अडचणीचं आहे. आचारसंहिता जारी होणार हे लक्षात घेऊन 15 ओक्टोबर या एका दिवशीच 259 शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आले. दुसऱ्या दिवशीही 40 निर्णय सरकारच्या वेबसाईटवर झळकू लागल्याने त्याची दखल आयोगाला घ्यावी लागली. राज्य चालवण्याची ही लक्षण राज्याला बाजारात विक्रीला ठेवण्यासारखीच आहे, असं म्हटलं वावगं काय?

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)**

## पत्र मानस

### राज्याची आर्थिक स्थिती नाजूक होत चालली ...

मोफत योजनांचा सुकाळ म्हणजे अर्थव्यवस्थेचा दुष्काळ! निवडणुकीच्या तोंडावर 'मोफत 'योजनांचा वर्षाव म्हणजे लाच, लालूच असते. बऱ्याच वेळा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाला मत देण्यासाठी मतदारांना पैसे दिले जातात.वस्तूंची भेट वस्तूंची लालूच दिली जाते. मात्र सध्या या वेळेस तसे न होता निवडणुकीपूर्वीच विविध शासकीय योजना राबवल्या गेल्या आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकारे विविध मोफत योजना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जाहीर करीत आहे. कर्ज माफी, वीजबिल माफी, इतरही योजना मोफत देऊन मतदारांना आकर्षित करीत आहे. 'मोफत' योजनां संदर्भात सर्वाच्च न्यायालयाने (सुप्रिम कोर्टाने)केंद्र सरकारसह निवडणूक आयोगाला नोटीस बजावत मोफत योजनां संदर्भातली भूमिका मांडण्याचे आदेश दिले आहेत.हि एक स्वागतार्ह घटना आहे. कारण मोफत योजानांचा सुकाळ म्हणजे अर्थव्यवस्थेला दुष्काळ आहे. मोफत योजना देऊन अर्थ व्यवस्था मजबूत कशी राहणार आहे. निवडणुकीच्या तोंडावर मोफत योजना बंद करणे देशहितासाठी उचित आहे.

**- शशिकांत रा सावंत पत्रकार, समाजसेवक, कवी डोंबिवली**

### न्यायदेवतेची सुटका

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी पुढाकार घेऊन भारतीय न्यायदेवतेचा चेहरामोहरा बदलला. तिच्या डोळ्यांवरील पट्टी काढली आणि हातातील तलवार काढून राज्यघटनेची प्रत देण्यात आली. नव्या न्यायदेवतेचा वेशभूषा, केशभूषाही भारतीय आहे. स्वातंत्र्यांनंतर सात दशकांनी का होईना आपण ब्रिटिश प्रभावामधून बाहेर पडत आहोत, हे स्वागतार्ह आहे.डोळ्यावरील पट्टी दूर केलेल्या आणि हाती राज्यघटना घेतलेल्या 'भारतीय' न्यायदेवतेकडून सामान्य भारतीयांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी हटवून न्यायदेवता अंध नाही किंवा कायदा अंध नाही असा संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे का? मुंबईत उच्च न्यायालयाच्या १५० वर्षांहून जुन्या इमारतीवरील न्यायदेवताही डोळ्यांवर पट्टी असलेली आहे. न्यायालयात कोट्यवधी प्रकरणे निकालाच्या प्रतीक्षेत पडून आहेत. आता न्यायदेवता डोळस बनल्याने तिच्या ते लक्षात येईल आणि प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील अशी आशा आहे. ब्रिटिशांच्या प्रभावातून पुर्णपणे बाहेर येत भारतीय न्यायव्यवस्था नवीन रुप घेताना दिसत आहे.गेल्या वर्षाच्या अखेरीस देशभरात पाच कोटी प्रकरणे सुनावणीच्या प्रतीक्षेत आहेत. न्यायदेवता हे केवळ प्रतिक,पण प्रतिकांचा खोलवर ठसा समाजमनांवर उमटलेला असतो.

**-विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

## प्रेमाखातर अपहरण केलेल्या मुलाची वालीव पोलिसांनी केली सुटका

**नालासोपारा :** वालीवमध्ये प्रेमाखातर अपहरण केलेल्या साडे तीन वर्षांच्या चिमुकल्याची चार तासात सुटका करून एका महिला आरोपीला अटक करण्यात वालीव पोलिसांना यश मिळाले आहे. वालीव पोलिसांनी सुटका केलेल्या मुलाला त्याच्या आईवडिलांच्या स्वाधीन केले आहे. फरार दुसऱ्या महिलेचा पोलीस शोध घेत तपास करत आहे. हवाईपाड्याच्या अब्दुल रेहमान चाळीत दिनेश गौतम हे त्यांची पत्नी प्रिती व दोन्ही मुलांसह राहतात. साडे तीन वर्षांचा प्रिन्स हा त्याच्या बहिणीसोबत शनिवारी साडे नऊ वाजता परिसरातील सक्सेस क्लासेसला शिकवणीसाठी गेला. सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास एक महिला क्लासेसला आली व प्रिन्सला त्याच्या आईने बोलावले असून त्याला औषध देण्याचे आहे. त्यानंतर ती महिला प्रिन्सला सोबत घेऊन गेली. त्याची आई ११ वाजता घरी नेण्यासाठी क्लासला गेल्यावर तिथे प्रिन्स मिळून आला नाही. त्यानंतर शिक्षिकेने एक महिला प्रिन्सला घेऊन गेल्याचे सांगितल्यावर आजूबाजूला त्याचा शोध सुरू केला पण तो सापडला नाही.



## म ह त्त्वा चे

### कुटुंबीयांनी वेडी ठरविल्यामुळे आत्महत्या

**कल्याण :** सासरच्या मंडळींनी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला वेड लागले आहे, असा देखावा निर्माण केला. विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला घरात कोंडून ठेवले. या सगळ्या प्रकाराने आलेल्या नैराश्यातून बदलापूरमधील कात्रप भागातील एका विवाहितेने राहत्या घरात बुधवारी आत्महत्या केली. या प्रकरणात बदलापूर पोलिसांनी पती, दीर आणि सासरा यांना अटक केली आहे. रोहित सतिश पवार (३०, पती), दीर धनंजय पवार (३६), सासरा सतिश पवार (६२), सासु सुजाता (६०), जाऊ प्रियंका धनंजय पवार (३५) अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे आहेत. बेळगाव जिल्ह्यातील आथणी तालुक्यातील एका गावातील प्रमिला चंद्रकांत निकम (४६) यांनी याप्रकरणी बदलापूर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे.

### दोन लाख 63 हजारांची फसवणूक

**पनवेल :** फ्रिज विक्री करण्यासाठी दिला असताना पेमेंट देण्यासाठी क्यू आर पाठवून दोन लाख 63 हजार 333 रक्कम ट्रान्सफर करण्यास सांगून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अनोळखी इसमा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. निबिर कश्यप हे खारघर, सेक्टर 10 येथे राहत असून त्यांनी 12 ऑक्टोबर रोजी ओएलएक्स ॲपवर रूम मधील फ्रिज विक्री करण्यासाठी ॲड दिली. त्यांना ओएलएक्स वरून राहुल शर्मा याने मोबाईल क्रमांक सेंड करण्यासाठी मेसेज केला आणि दहा हजारांची ऑफर दिली. यावेळी दहा हजार रुपये गुगल पे करण्यास सांगितले. त्याने क्यूआर कोड सेंड केला आणि त्यावर पाच रुपये पाठवण्यास सांगितले. त्यांनी पाच रुपये पाठवले असता समोरून दहा रुपये आले. त्यानंतर दहा हजारचा क्यूआर कोड पाठवला असता ट्रांजेक्शन फेल झाले. त्याने आणखी एक क्यू आर कोड पाठवला व त्या कोडवर दहा हजार रुपये पाठवले. यावेळी समोरील व्यक्ती त्यांच्याशी फोनवर बोलत होता. मात्र ट्रांजेक्शन फेल होत आहे असे सांगून त्याने एकूण आठ क्यू आर कोड पाठवले. यावेळी कश्यप यांनी यूपीआय आणि नेट बँकिंग एकूण दोन लाख 63 हजार 333 रुपये ट्रान्सफर केले. ते समोरील व्यक्तीच्या खात्यावर जमा झाले.

### वलपमध्ये रंगणार दिवाळी पहाट

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील वलप येथील सामाजिक कार्यकर्ते किरण बाळाराम पाटील ह्यांची कन्या कार्तिकी पाटील हिचा १५ वा वाढदिवस व आर्विक पाटील याच्या १ ला वाढदिवसा निमित्त वलप मध्ये प्रथमच धनत्रयोदशीच्या मुहुर्तावर गुरुवर्य शांकुनाथ बुवा पडघेकर, पद्माकर बुवा खारघरकर, विष्णु बुवा दाढावक, मधुकर बुवा धोंगडे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली २९ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते ९ वाजता दिवाळी पहाटचे आयोजन केले आहे. यावेळी गायक - अमित पाटील (खारघर), महेश पाटील (पेंधर) विश्वनाथ पाटील (वलप), तबला- शाम चौधरी (वळवली), पखवाज - जीवन पाटील (देवीचा पाडा), युवराज पाटील (वलप) असणार आहेत. तरी सर्व नागरिकांनी ह्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन जय हनुमान भजन मंडळ व मित्र मंडळ वलपच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. शिंगणेंच्या प्रवेशाने शरद पवार गटालाच धक्का

## पुतणी बंडखोरीच्या तयारीत

प्रतिनिधी
■ बुलढाणा



बुलढाणा जिल्ह्यातील नेते आणि सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी आज, शनिवारी (19 ऑक्टोबर) अपेक्षेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. डॉ. शिंगणे यांना पक्षात घेऊन शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आणखी एक धक्का दिला आहे. याआधी फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांनी अजित पवार यांची साथ सोडली आहे. मात्र आज डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या पक्षप्रवेशानंतर त्यांची पुतणी गायत्री शिंगणे यांनी बंडखोरीची तयारी वर्तविली आहे.

गेल्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली तेव्हा सुरुवातीला शरद पवार यांच्यासोबत असणाऱ्या डॉ. शिंगणे यांनी नंतर अजित पवार यांना साथ देण्याचा निर्णय घेतला होता. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँक प्रकरणी मदत करण्याचे आश्वासन मिळाल्याने आपण अजित पवार यांच्यासोबत असल्याचे डॉ. शिंगणे यांनी स्पष्ट केले होते. मात्र, विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर डॉ. शिंगणे यांनी आपली भूमिका बदलली आणि घरवापसी करण्याचे संकेत त्यांनी दिले होते.

त्यानुसार आज शरद पवार गटाच्या संसदीय मंडळाची बैठक होत असताना डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात जाऊन तुतारी हातात घेतली. पक्षाध्यक्ष शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत डॉ. शिंगणे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला. त्यानंतर सिंदखेडराजा मतदारसंघात फटाक्यांची आतषबाजी करून कार्यकर्त्यांनी डॉ. शिंगणे यांच्या निर्णयाचे स्वागत केले. त्यांना शरद पवार गटाकडून विधानसभेची उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, डॉ. राजेंद्र शिंगणे यांना शरद पवार गटात पुन्हा प्रवेश देण्याच्या निर्णयावर त्यांची पुतणी गायत्री शिंगणे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. विधानसभा निवडणुकीत पुन्हा त्यांनाच उमेदवारी मिळणार असेल तर आमच्या निष्ठेचे काय? असा सवाल करत गायत्री शिंदे यांनी सिंदखेडराजा मतदारसंघात बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढण्याचा इरादा बोलून दाखवला आहे.

# महायुतीने आखला 'फत्ते मुंब्रा कळवा' प्लॅन

## आव्हाडांना खिंडीत घेरण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी
■ ठाणे

मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी मुंब्रा कळव्याचे शरद पवार गटाचे आ. जितेंद्र आव्हाड यांना खिंडीत गाठण्यासाठी या मतदारसंघात 'फत्ते मुंब्रा कळवा' असा प्लॅन आखल्याची माहिती शिंदेसेनेतील सूत्रांनी दिली आहे. त्यासाठी दोन प्लॅनही पुढे आले आहेत.



यापूर्वी आव्हाड आणि शिंदेसेनेत असलेल्या दिलजमाईमुळे लोकसभेला आव्हाडांकडून तर विधानसभेला शिंदेसेनेकडून छुपी मदत केली जायची. परंतु लोकसभा निवडणुकीपूर्वी शिवसेनेत दोन गट पडले. आव्हाड आणि शिंदेसेना आमनेसामने आल्याचे चित्र पाहावायस मिळाले. आव्हाड गटाचे आठ माजी नगरसेवकांना फोडून मुंब्रा विकास आघाडीही स्थापन करण्यात आली होती. त्यात आता राष्ट्रवादीचे दोन गट पडले.

कळवा मुंब्रा जागा ही शिवसेनेची. उमेदवार शिंदेसेनेचा असणार. राजन किणे हे उमेदवार असू शकतात. त्यांना अजित पवार गट मुंब्र्यात आणि कळव्यात भाजप राजन किणे यांना मदत करणार.

जागा शिवसेनेची उमेदवार अजित पवार गटाचा आणि ताकद तिन्ही पक्षांची. मुस्लिमबहुल मतदारसंघ असल्याने अजित पवार गटाचे नजीब मुल्ला यांना शिवसेनेच्या तिकिटावर उभे करायचे आणि शिवसेना, भाजप मुल्ला यांना मदत करणार. मुल्ला यांची मुंब्रा कळव्यात एक विशिष्ट ओळख आहे. शिवाय आव्हाड यांचे कट्टर विरोधक म्हणून ते नेहमी चर्चेत असतात. परंतु मुल्ला धनुष्यबाण हाती घेतील का? याबाबत एकमत नाही.

# भाजप नेते रवींद्र चव्हाण यांना यश

## उल्हासनगर भाजप पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर

■ उल्हासनगर

भाजपचे नेते रवींद्र चव्हाण यांनीं उल्हासनगर पक्ष कार्यालयात शनिवारी दिवसभर ठाण मांडून स्थानिक पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यां सोबत संवाद साधून एकमेकां विषयी असलेली नाराजी दूर केली. तसेच एक मनाने निवडणुकीला सामोरे जाऊन विजश्री खेचून आणण्याचे आदेश दिले.

उल्हासनगर भाजप उत्तर भारतीय सेलच्या अध्यक्षाने थेट आमदार कुमार आयलानी यांच्यावर आरोप केल्याने पक्षातील वाद चव्हाट्यावर आला होता. त्यानंतर उत्तरभारतीय सेलच्या अध्यक्षाने वंचित पक्षात प्रवेश करून उमेदवारीची तिकीट मिळविले. पक्षाकडून विधानसभेच्या उमेदवारीसाठी इच्छुकांच्या संख्येत वाढ झाल्याने, पक्ष येते चिंतीत होते. अखेर पक्षनेते रवींद्र चव्हाण यांनी उल्हासनगर पक्ष कार्यालयात शनिवारी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत स्थानिक पक्ष नेते व कार्यकर्ते, महिला आघाडी व इतर विविध सेलच्या पदाधिकार्या सोबत संवाद साधून विधानसभा मतदारसंघाबाबत चाचपणी केली. भाजपकडून विद्यमान आमदार कुमार आयलानी व शहरजिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी असे दोघेत इच्छुक असून इतर इच्छुकांनी निवडणुकीतून माघार केल्याचे चित्र भाजपच्या बैठकीत उघड झाले. तर शहरजिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी पक्षनेते रवींद्र चव्हाण यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्या सोबत संवाद साधून त्यांच्या उत्साह भरल्याचे सांगितले.

# कल्याणमध्ये रुळांवर घसरलेले डबे हटवले, पण मध्य रेल्वे रुळांवर येईना

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण रेल्वे स्थानकाजवळ शुक्रवारी रात्री ८.५५ वाजता टिटवाळा-सीएसएमटी लोकलचा एक डबा रूळावरून घसरला होता. यामध्ये कोणीही प्रवासी जखमी झालेला नाही. घसरलेला डबा सुस्थितीत करून रेल्वे मार्ग मोकळा करण्याचे काम तत्काळ सुरू करण्यात आले. त्यानुसार, रात्री १२.४० मिनिटांनी घसरलेला डबा रुळांवरून बाहेर काढण्यात आला, अशी माहिती मध्ये रेल्वेच्या मुंबई विभागाने एक्स पोस्टद्वारे दिली आहे. डबा रुळांवरून काढलेला असला तरीही अद्यापही मध्य रेल्वे उशिराने धावत आहे.

कल्याण रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोन वरून टिटवाळयाहून सीएसएमटीकडे जाणाऱ्या कल्याण दिशेकडील गार्डचा डबा रूळावरून घसरला.



रूळावरून डबा घसरल्याने मोठा आवाज झाला. त्यामुळे प्रवाशांमध्ये काही वेळ घबराट पसरली. थोड्या वेळाने रूळावरून डबा घसरल्याचे प्रवाशांना समजले.

या घटनेमुळे कर्जत, कसाराकडून सीएसएमटीकडे जाणाऱ्या, कल्याणकडे येणाऱ्या लोकलचे वेळापत्रक कोलमडले. कल्याणकडे येणाऱ्या काही लोकल डोंबिवली, ठाकुर्ली दिशेने खोळंबल्या. बराच उशीर लोकल सुरू होत नसल्याने अनेक प्रवाशांनी रेल्वे मार्गातून प्रवास करून ठाकुर्ली, कल्याण रेल्वे स्थानके गाठणे पसंत केले. तर काही लोकल शहाड, विठ्ठलवाडी भागात खोळंबल्या. ऐन गर्दीच्या वेळेत हा प्रकार घडला. त्यामुळे लोकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. दरम्यान, मध्यरात्री रेल्वे रुळांवर डबे हटवण्यात आले. परंतु, तरीही लोकल सेवा अद्यापविस्कळीतच आहे. ठाण्यापलीकडे सातत्याने लोकल सेवा विलंबाने होत असते. त्यामुळे नोकरदारवर्गाचे मोठे हाल होतात. त्यातच अशा घटना घडल्या की रुळांवर चालत जाण्यापलिकडे त्यांच्याकडे पर्याय नसतो.

# शहापूर मतदारसंघात 9 हजार मतदारांची वाढ

प्रतिनिधी
■ ठाणे

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी सरू आहे, तर दुसरीकडे लोकशाहीच्या या उत्सवासाठी जिल्हा प्रशासनदेखील सज्ज झाले आहे. त्यानुसार नुकतेच जिल्हा प्रशासनाकडून १८ विधानसभा मतदारसंघनिहाय मतदारांची आकडेवारी जाहीर केली आहे. यात मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ५० हजार ९३ इतक्या मतदारांची वाढ झाली आहे. त्यामुळे ही वाढलेली मतदार नोंदणी कोणाच्या पथ्यावर पडणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी राबवलेल्या निरंतर मतदार नोंदणी कार्यक्रमांतर्गत मतदारांच्या संख्येत वाढ होऊन जिल्ह्यातील मतदारांची संख्या ६८ लाख एक हजार २४४ वर पोहोचली आहे. त्यानंतरदेखील आयोगाच्या सूचनेनुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला होता. या कार्यक्रमांतर्गत मतदारांनी मतदान नोंदणीकडे भर दिल्याने चार लाख ७८ हजार ८९१ नवीन मतदारांची वाढ झाल असल्याचे दिसून येत आहे.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांत ७१ लाख ५५ हजार ७२८ इतके मतदार आहेत. त्यात ३८ लाख १३ हजार २६४ पुरुष, ३३ लाख ४१ हजार ७० महिला, १३९४ इतर मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ वयोगटातील मतदारांची संख्या एक लाख ६५ हजार ५९७ इतकी आहे. अपंग मतदारांची संख्या ३७ हजार ८५४ इतकी, तर ८५ पेक्षा जास्त वयोगटातील मतदारांची संख्या ५७ हजार २०९ इतकी आहे.

# पनवेलच्या आमदाराची दोरी शहरी मतदारांच्या हाती

## 6 लाख 34 हजारांपैकी 65 टक्के मतदार शहरी

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल विधानसभा मतदारसंघ हा महाराष्ट्रातील टॉप पाच मतदारसंघातील एक असून, नव्याने झालेल्या मतदार नोंदणीत जवळपास ४३ हजार मतदार वाढल्याने पनवेल विधानसभेची मतदारसंख्या ६ लाखांच्या पार झाली आहे. यात ६५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार शहरी भागातील असल्याने या मतदारांवर या मतदारसंघाची धुरा असणार आहे.

एकेकाळी उरण आणि पनवेल हे दोन्ही मतदारसंघ एकच होते. सिडको प्रकल्पामुळे नवीन नोड स्थापन केले गेले. या नोडमध्ये कालांतराने शहरी मतदार वाढू लागले. शिवाय तालुक्यातील २३ ग्रामपंचायती पनवेल महानगरपालिकेत विलीन



होऊन पनवेल महापालिका उदयास आली. मुंबईतील वाहतूक कोंडी, प्रदूषण, गर्दी यामुळे अनेकांनी पनवेल परिसरात धाव घेतली. यामुळे झपाट्याने शहराची लोकसंख्या वाढली. एकेकाळी शेकापचा बालेकिल्ला असलेला हा मतदारसंघ आज भाजपचा गड बनला आहे. शेकापची स्थानिकांसोबत जुळलेली नाळ त्या तुलनेत शहरी मतदारांना आपलेसे करू शकली नसल्याने शेकापमधून बाहेर पडलेले आ. प्रशांत ठाकूर तीन वेळा येथून निवडून आले. या विजयामागे शहरी मतदार महत्त्वाचा फॅक्टर आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील ५४४ पैकी जवळपास ३७० बूथ शहरी भागातील असल्यामुळे येथील उमेदवारांना शहरी मतदारांची मतांवर आपली छाप सोडावी लागणार आहे. सध्याच्या घडीला पनवेल विधानसभेत भाजपकडून आमदार प्रशांत ठाकूर, शेकापमधून माजी आमदार बाळाराम पाटील तसेच उद्धवसेवेतून शिरीष घरत आणि लीना गरड यांची नावे चर्चेत आहेत. अपक्ष म्हणून कांतीलाल कडूदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत.

शहरी भागात खांदा कॉलनी, नवीन पनवेल, कळंबोली, खारघर, नावडे, कामोठे, तळोजे या सिडकोनिर्मित वसाहतीत ३१७ बूथ आहेत. तर ग्रामीण भागात १४४ बूथ आहेत.

# जिताडा उरला आठवणीपुरता, शेतकरी आणि खवय्यांची चिंता वाढली

■ पनवेल

जिताडा मासा हा रायगड जिल्ह्याची खरी ओळख आहे. पेण, शाहाबाज, पेझारी, पोयनाड, अलिबाग, नागोठणे या भागात भात कापणीच्या काळात आवर्जून आढळणारा जिताडा सध्या गायब झाल्याने मत्स्यप्रेमी आणि शेतकरीही चिंतीत झाले आहेत. जो जिताडा मत्स्यप्रेमींच्या चिभेला भुरळ घालायचा तो हल्ली पाहायलाही मिळत नाही. नाही म्हणायला शेततळयांमध्ये जिताडा आढळतो. मात्र, तो गोडा असल्याने खाऱ्याची चव चाखलेल्यांना गोड्या माशाचे अजिबात कौतुक नाही. शिवाय शेततळे खर्चिक असल्याने गोडा जिताडा महाग झाला आहे.

रायगडच्या खारेपट्ट्यात जिताड्याची भात कापणीच्या काळात खूप चर्चा असते. अगदी काही वर्षांपूर्वी



टोपल्या-टोपल्या भरून भात कापणीच्या काळात शेतात जिताडे मिळायचे. आता याच जिताड्याचे दर्शनदेखील दुर्लभ झाल्याचे शेतकरी सांगतात. हे सर्व समुद्रातील वाढत्या प्रदूषणामुळे होत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. समुद्रातून खाडीमार्गे थेट भातशेतात आढळणारे जिताडे मासे खूप चविष्ट असतात. खास जिताडा खाण्यासाठी नोकरीनिमित्ताने बाहेरगावी गेलेले या काळात रायगडमध्ये दोन-तीन दिवसांसाठी येतात. मात्र, सध्या हे चित्र बदलले आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह राज्यातील अनेक राजकीय नेत्यांना जिताड्यांची चव माहीत असल्याने जिल्ह्यातील काही नेते त्यांच्यासाठी खास जिताड्यांचा कालवण नेत होते. आता जलप्रदूषणामुळे जिताडा मासे शेतात फारसे आढळत नसल्याचे चांगल्या चविष्ट माशाला मुकल्याचे खंत शेतकरी आणि खवय्ये व्यक्त करत आहेत.

# रेल्वेमध्ये नोकरी लावण्याचे आमिष, एक कोटी एकतीस लाखांची फसवणूक

प्रतिनिधी
■ पनवेल

रेल्वेमध्ये कारकून या पदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवून 20 जणांकडून एक कोटी 31 लाख रुपये घेऊन नोकरी न लावल्या प्रकरणी सहा जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीसह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

मारुती पाराठे हे खारघर, सेक्टर 19 येथे राहतात. त्यांची मुलगी हर्षदा पाराठे हे राज्यस्तरीय कबड्डी खेळाडू आहे. पंडित पोवार हे कबड्डी प्रशिक्षक असून त्यांची पाराठे यांच्याशी ओळख झाली. यावेळी 2022 मध्ये रेल्वे मध्ये भरती होणार असून तिला स्पोर्ट्स कोट्यातून रेल्वेत भरती करून देऊ असे पोवार यांनी सांगितले. एक महिन्यानंतर पंडित पोवार यांनी रेल्वे भरतीची जाहिरात दाखवली आणि पैसे द्यावे लागतील असे सांगितले. यावेळी दोन लाख रुपये ऑनलाईन पाठवले. त्यानंतर पंडित पोवार व त्यांची पत्नी अश्विनी पोवार यांनी तुमच्या कोणी ओळखीचे असल्यास त्यांना देखील नोकरीसाठी सांगण्यास सांगितले. यावेळी नातेवाईक व मित्र यांचे एकूण 11 लाख रुपये दिले आणि स्वतःचे पाच लाख दिले. त्यानंतर नातेवाईकांचे 52 लाख दहा हजार रुपये खात्यात पाठवले. त्यानंतर आणखी पैसे पंचम पाटील, कृष्णा खोत यांच्या बँक खात्यात पाठवले.

# दिवाळी हंगामासाठी माथेरानची राणी सज्ज

प्रतिनिधी
■ माथेरान

पावसाळ्यात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नेरळ-माथेरान मिनी ट्रेन सेवा मध्य रेल्वेकडून बंद ठेवण्यात येते, तर दसऱ्याला मोठ्या उत्साहात ही सेवा पूर्ववत सुरू होते. यंदा परतीच्या पावसाने धुमाकूळ घातल्याने मिनी ट्रेन सुरू होण्याचा मुहूर्त चुकला असला तरी माथेरानमधील दिवाळीच्या हंगामासाठी मध्य रेल्वे प्रशासन सज्ज झाले आहे. १ नोव्हेंबरपासून माथेरानची राणी रुळावर येणार



असून तिची शीळ पुन्हा एकदा दऱ्याखोऱ्यात घुमणार असल्याचे संकेत रेल्वे विभागाकडून मिळाले आहेत. ८ जून २०२४ पासून सुरक्षेच्या दृष्टीने नेरळ-माथेरान सेवा रेल्वे प्रशासनाने बंद केली होती.

दरवर्षी पावसाळ्यात ही सेवा मध्य रेल्वे प्रशासनाकडून बंद केली जाते, मात्र अमन लॉज ते माथेरान अशी शटल सेवा सुरू असते. माथेरानची राणीला १०० वर्षे पूर्ण झाली असून आजही पर्यटकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. वर्षाकाठी लाखो पर्यटक माथेरानला भेट देत असून सर्वांनाच मिनी ट्रेनने सफर करण्याची इच्छा असते. आता पर्यटकांची प्रतीक्षा संपणार असून १ नोव्हेंबरपासून मिनी ट्रेन सेवा सुरू होणार असल्याचे संकेत मध्य रेल्वे विभागाने दिले आहेत. सध्या नेरळ माथेरान रेल्वे मार्गाची दुरुस्ती अखेरच्या टप्प्यात असून विस्टा डोम डब्यांसह वाफेच्या इंजिनाचा लूक असलेले इंजिन नेरळ लोको शेडमध्ये आणली आहे.

# अंबरनाथला निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

## मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

विधानसभा निवडणुकिसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून येत्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा तसेच मतदाराची मतदान केंद्रात गैरसोय होऊ नये यासाठी लक्ष दिले जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत जोशी यांनी दिली.

अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या अंबरनाथ विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून या विधानसभेत तीन लाख ७६ हजार ५०६ मतदारांची नोंद झाली आहे. मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत १७ हजार ९५२ मतदारांची संख्या वाढली आहे. एकूण ३३९ मतदान केंद्र असणार आहेत. वयाची ८५ वर्षे पुढील मतदारांसाठी व ज्यांना मतदानासाठी केंद्रावर येणे शक्य नाही त्यांच्यासाठी



होम व्होटिंग चा पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पुढील महिन्यात २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी २४०० अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या निवडणुकीसाठी एकूण ३३९ मतदान केंद्र असून अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रात २२८ मतदान केंद्र तर उल्हासनगर महापालिका क्षेत्रात १११ मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. लोकसभा निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या ३१९ इतकी होती. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत २० मतदान केंद्र वाढवण्यात आले आहेत. त्यामुळे मतदारांना कोणताही त्रास न होता आपला मतदानाचा अधिकार बजावता येणार आहे. अंबरनाथ विधानसभा मतदार संघात तीन लाख ७१ हजार ५०६ मतदार असून त्यात एक लाख ९७ हजार ९११पुरुष मतदार व १ लाख ७३ हजार ५३६ महिला मतदारांचा समावेश आहे. तर १०९७ दिव्यांग मतदार, ८५ वर्षे वरील २९३१ मतदार तसेच ५९ तृतीयपंथी मतदारांची नोंद आहे. आचारसंहिता लागू असल्याने नऊ भरारी पथक तैनात आहेत. निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असून महिलांसाठी पिंक बूथ तयार करण्यात येणार आहेत. तसेच नव मतदारांसाठी सेल्फी पॉइंट, गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत जोशी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमित पुरी यांनी दिली.

# भाजपकडून विशिष्ट धर्माच्या लोकांना जाणीवपूर्वक लक्ष्य

## खासदार वर्षा गायकवाड यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

प्रतिनिधी
■ मुंबई

धारावीकरांचा उपयोग करून मुंबईत व्होट जिहाद केला जात आहे असे विधान भाजप नेते आशिष शेलार यांनी केले होते. काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी शेलार यांच्या विधानावर आक्षेप घेतला आहे. तसेच निवडणूक आयोगाने शेलार यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

गायकवाड यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून म्हटले आहे की, राज्यातील सत्ताधारी पक्षातील नेते व्होट जिहाद असा शब्दप्रयोग करून एका विशिष्ट धर्माचा अपमान करत आहेत. निवडणुकीत कोणी कोणाला मतदान करायचे हा त्या मतदाराचा अधिकार आहे.





जर एखाद्या मतदाराने किंवा काही भागातील बहुसंख्य मतदारांनी मतदान केले असेल तर त्याला व्होट जिहाद म्हणण्याचा कोणालाही अधिकार नाही. संविधानाने मतदाराला दिलेल्या हक्क व अधिकाराचे हे उल्लंघन आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या एका पत्रकार परिषदतच व्होट जिहाद सारखे विधाने केल्यास त्यावर तात्काळ कारवाई केली जाईल असे आपण जाहीर केले होते. भारतीय जनता पक्षाचे मुंबईचे अध्यक्ष श्री. आशिष शेलार यांनी दिनांक 19 ऑक्टोबर 2024 रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत, धारावी पुनर्विकासाचा उपयोग करून तिथल्या रहिवाशांची माथी भडकवून, धारावीकरांचा उपयोग करून मुंबईत व्होट जिहाद केला जात आहे. असे विधान केले आहे.

## शिवपुतळा दुर्घटनेतील तिसरा आरोपी यादवला 25 ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी

**मालवण :** मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी अटक करण्यात आलेला तिसरा संशयित आरोपी परमेश्वर रामनरेश यादव (रा. मिर्झापूर उत्तरप्रदेश) याची आज पोलीस कोठडी संपल्याने त्याला मालवण न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला २५ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.मालवणात साजऱ्या झालेल्या नौदल दिननिमित्त राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे ४ डिसेंबर २०२३ रोजी अनावरण झाल्यावर अवघ्या आठ महिन्यांनंतर २६ ऑगस्ट २०२४ रोजी हा पुतळा कोसळला होता. या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार मालवण पोलिसांनी पुतळ्याचा शिल्पकार संशयित जयदीप आपटे व बांधकाम सल्लागार संशयित चेतन पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक केली. सध्या हे दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.



# बिश्नोई गँगच्या नावाने पुण्यातील प्रसिद्ध सराफ व्यावसायिकाला धमकी

## मागितली 15 कोटींची खंडणी

प्रतिनिधी
■ पुणे

बिश्नोई गँगने देशभरात दहशत माजवलीय. खंडणी आणि हत्येचे गुन्हे या गँगकडून केले जात असल्याने सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहे. आता हाती आलेल्या बातमीनुसार, या गॅंगच्या नावाने पुण्यातील प्रसिद्ध सराफ व्यावसायिकाला धमकी आलीय. ईमेलद्वारे व्यवसायिकाकडे १५ कोटी रुपयांची खंडणी मागितलीय.



हा मेल निनावी असून लॉरेन्स बिश्नोई गँगचे नाव वापरून ही खंडणी मागण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिलीय. फसवणूक करण्यासाठी बिश्नोई गँगचा उल्लेख या मेलमध्ये केला आहे. दरम्यान बिश्नोई गँगचे नाव वापरून काहीजणं खोडसाळपणा करत असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिलीय, परंतु या प्रकरणाचा तपास केला जात आहे. पुणे पोलिसांकडून या मेलचे तांत्रिक विश्लेषण केले जात आहे. खरचं हा मेल बिश्नोई गँग कडून आला आहे का याचा तपास सुरू आहे.

पुण्यात अजून अशीच एक घटना घडलीय. बिश्नोई गँगच्या नावाने एकान व्यक्तीने एका जिवे मारण्याची धमकी दिली होती. या बिश्नोई गँगच्या नावाने जिवे मारण्याची धमकी आल्याने पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने लागलीच तपास सुरू केला. मात्र या प्रकरणात मोठा ट्विस्ट समोर आला. दोन तरुणामध्ये भांडण झालं होतं. त्यातून एकाने फेसबूकवरून बिश्नोई गँगच्या नावाने मित्राला जिवे मारण्याची धमकी दिली. बिश्नोई गँगचे नाव वापरून फेसबुकवरून धमकी देणाऱ्या तरुणाला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

हा तरुण फेसबुकवर एका व्यक्तीला आपण बिश्नोई गँगचा मेंबर असल्याचं सांगून धमकावत होता. फेसबुकवर एका पेजखाली कमेंट सेक्शनमध्ये दोघांमध्ये संभाषण सुरू होतं. त्यातून त्याने धमकी दिली होती.

# तेलींच्या प्रवेशामुळे सावंतवाडीच्या महाविकास आघाडीत धुसफुस

## इच्छुक उमेदवारांची घालमेल

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

येथील विधानसभा लढविण्यासाठी आयत्यावेळी राजन तेली यांना संधी देण्यात येणार असल्याची चर्चा सद्यस्थिती महाविकास आघाडीत रंगू लागली आहे. या पार्श्वभूमीवर तीन्ही पक्षातील वातावरण जोरदार ढवळून निघाले आहे. थेट कोणी बोलत नसले तरी आता नेमके काय होणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दुसरीकडे आयत्या वेळी अन्य उमेदवार आणला किंवा इच्छुकांतून उमेदवार दिला तरी त्या ठिकाणी महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आला पाहीजे. अशी इच्छा सर्वसामान्यक कार्यकर्त्यांत आहे. त्यामुळे अंतर्गत सुरू असलेली धुसफुस रोखण्यासाठी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना मात्र कसरत करावी लागणार आहे.

सावंतवाडी विधानसभा मतदार संघातून शरद पवार राष्ट्रवादीमधून अर्चना घारे यांचे नाव चर्चेत आहेत. त्यांनी तशा पध्दतीने तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे काँग्रेसमधून विलास गावडे यांचे नाव सुचविण्यात आले होते. तर महिला जिल्हाध्यक्षा साक्षी





वंजारी या जोरदार इच्छुक आहेत. असे असताना तुर्तास तरी काँग्रेसकडून मतदार संघ लढविण्यासाठी थेट दावा कोणाकडून केलेला नाही. या सर्व परिस्थिती शिवसेनेतून निवडणूक लढविण्यासाठी भाऊ गर्दी होती.

यात विद्यमान जिल्हाप्रमुख बाबुराव धुरी यांच्यासह संपर्कप्रमुख रुपेश राऊळ, बाळा गावडे हे तिघे जोरदार इच्छुक होते. तर कणकवली मतदार संघात कार्यरत असलेले जिल्हाप्रमुख संदेश पारकर यांच्यासह जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सतिश सावंत यांचे ही नाव चर्चेत होते. तर माजी खासदार विनायक राऊत हे या ठिकाणी निवडणूकीला सामोरे जातील अशी चर्चा होती.

या सर्व धामधुमीत सर्व चर्चा बाजूला सरल्या असून आता त्या ठिकाणी भाजपाचे बंडखोर उमेदवार राजन तेली हे ठाकरे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे वृत्त आहे. त्यांच्या प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर इच्छुकात मात्र नाराजीचे सुर आहे. उघड जरी कोणी चर्चा करीत नसले तरी त्या ठिकाणी काही जणांची नाराजी स्पष्टच दिसत आहे. मात्र अंतिम निर्णय हा महाविकास आघाडीचे नेते घेणार असल्यामुळे आता उमेदवारीची माळ नेमकी कोणाच्या गळयात पडते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. मात्र इच्छुक नाखुश असले तरी पुन्हा एकदा मतदार संघात महाविकास आघाडीची ताकद वाढणार असल्यामुळे कार्यकर्त्यांत मात्र चैतन्याचे वातावरण आहे.

# अखेर रणजीतसिंह मोहिते पाटलांचं ठरलं! आमदारकीचा राजीनामा

## लवकरच पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

प्रतिनिधी
■ सोलापूर

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वाटेवर असलेले भाजपचे विधानपरिषद आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती आहे. रणजीतसिंह मोहिते पाटील हे माढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असून त्यामुळेच त्यांनी विधानपरिषद आमदारकीचा राजीनामा दिल्याचे समजते. मात्र आमदारकीच्या राजीनाम्याबद्दल स्वत:



रणजीतसिंह मोहिते पाटलांनी अद्याप अधिकृतरित्या माहिती दिलेली नाही.

लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील कुटुंबाने राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची साथ देण्याचा निर्णय घेतला होता. ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांचे पुतणे धैर्यशील मोहिते पाटील यांनी माढ्यातून लोकसभा निवडणूक लढवली आणि जिंकलीही. मात्र विजयसिंह मोहितेंचे पुत्र रणजीतसिंह मोहिते हे अद्यापही भाजपमध्येच होते. असं असलं तरी लोकसभा निवडणुकीपासून ते भाजपच्या व्यासपीठावर जाणं टाळत होते. त्यामुळे ते लवकरच भाजपला रामराम करतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. अखेर आता त्यांनी आपला राजकीय निर्णय घेत आमदारकीचा राजीनामा दिल्याची माहिती आहे.

माढा विधानसभा मतदारसंघातून शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून लढण्यासाठी तब्बल सहा नेते इच्छुक असल्याचे समजते. यामध्ये विद्यमान आमदार बबन शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे, रणजीतसिंह मोहिते पाटील, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, संजय कोकाटे, नितीन कापसे, संजय घाटनेकर पाटील यांचा समावेश आहे.



**नाशिक :** *नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील मंदिरात पूजा अर्चा केली. या वेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचीही उपस्थिती होती.*

# महाराष्ट्र राज्याच्या सागरी जल क्षेत्रात घुसखोरी

## कर्नाटकच्या मलपे येथील हायस्पीड ट्रॉलर ताब्यात

प्रतिनिधी
■ मालवण

सागरी किनारपट्टीवरील मालवण तारकर्ली समोर महाराष्ट्र राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात घुसखोरी करून अवैध मासेमारी करणाऱ्या कर्नाटक मलपी येथील हायस्पीड ट्रॉलर मत्स्य विभागाने शनिवारी पहाटे कारवाई करत ताब्यात घेतला आहे.

पापलेट, सौदाळा, बांगडा, सुरमई, कट्टर, बळा, कटल यांसह अन्य मासे ट्रॉलर मध्ये मोठया प्रमाणात असून त्याचा पंचनामा करून पुढील कारवाईसाठी हायस्पीड ट्रॉलर सर्जेकोट जेटी येथे आणण्यात



आला आहे.

मत्स्य विभागाचे परवाना अधिकारी मुरारी भालेकर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले, आज, शनिवारी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय सिंधुदुर्ग-मालवण सागर कुवेसकर यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री सागरी गस्ती दरम्यान परवाना अधिकारी मालवण मुरारी भालेकर सोबत सहकारी सागरी सुरक्षा पर्यवेक्षक/ रक्षक दीपेश मायबा, सागर परब, मिमोह जाधव, राजेश कुबल, प्रणित मुणगेकर, स्वप्नील सावजी, पोलिस कॉन्स्टेबल व्ही. व्ही. पाटोळे यांनी कर्नाटक- मलपी येथील नौका वायुपुत्र-२ क्रमांक IND-KA-०२-MM-५८१२ महाराष्ट्र राज्याच्या जलाधी क्षेत्रात अवैध मासेमारी करताना पकडण्यात आली आहे. नौका मालकाविरुद्ध महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

मालवण सागरी किनारपट्टी भागात कर्नाटक मलपी तसेच अन्य राज्यातील हायस्पीड ट्रॉलर गेले काही दिवस सातत्याने मोठ्या संख्येने घुसखोरी करून रात्रीच्यावेळी मासळीची लूट करतात. स्थानिक मच्छिमारांची जाळी तोडून नुकसान करतात. असे असताना एका ट्रॉलरवर कारवाई नको तरी अधिक कारवाई झाली पाहिजे. तसेच पकडलेल्या हायस्पीड ट्रॉलरवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी भुमिका मांडली आहे.

## नवी पेठेतील अभ्यासिकेत आग

■ पुणे

नवी पेठेतील एका अभ्यासिकेत शनिवारी सकाळी आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. नवी पेठेत ध्रुवतारा अभ्यासिका आहे. शनिवारी सकाळी अभ्यासिकेतून मोठ्या प्रमाणावर धूर येत असल्याची माहिती रहिवाशांनी अग्निशमन दलाला कळवली. या घटनेची माहिती मिळतात अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले.

## टुरिझम कमिटी सदस्यपदी राजन नाईक



**कुडाळ :** सदस्य पदी राजन नाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी जिल्ह्यातील पर्यटन रोजगाराच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहील, असे राजन नाईक यांनी सांगितले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अंतर्गत टुरिझम अँड हॉस्पिटलिटी कमिटीत देखील ते कार्यरत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर या महाराष्ट्रातील शिखर संस्थेवर गव्हर्निंग कौन्सिल मेंबर म्हणून राजन नाईक यांची नियुक्ती यापूर्वीच झाली होती. राजन नाईक हे जिल्ह्यातील व्यापारी महासंघाच्या पर्यटन समितीचे ते अध्यक्ष आहेत.

# नागपूर ही पावन भूमी - श्रीनिवासन

## भाजप महिला मोर्चाची बैठक नागपुरात संपन्न

प्रतिनिधी
■ नागपूर

भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश संघटनात्मक बैठक अशोक हॉटेल आठरस्ता चौक लक्ष्मीनगर नागपूर येथे आयोजित करण्यात आली. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा विदर्भ महिला मोर्चा बैठक आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय महिला मोर्चा अध्यक्ष श्रीमती वानाथी श्रीनिवासन यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले कि नागपूर ही पावन भूमी असून डॉ . हेडगेवार सारख्या निष्ठावान देशाच्या प्रती भक्ती असणाऱ्या नागपूर शहराला माननीय केंद्रीय मंत्री




नितीनजी गडकरी,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लाभलेले असून राष्ट्र, महिला सक्षमीकरण तसेच सांस्कृति जपण्यासाठी लढणारे , एकता आणि विशिष्ट हितसंबंधांबद्दल जागरूक करणारी पार्टी म्हणजे भाजपा पार्टी असून प्रत्येक महिला कार्यकर्त्यांनी घरो घरी आपले समन्वय वाढवून जास्तीत जास्त संघटन करून महिला मोर्चाची ताकद दाखवून द्यावी.विधानसभा सभा प्रमुख, महाराष्ट्र प्रदेश अधिकारी,जिल्हा अधिकारी विदर्भातून आल्या असून संस्कृती, राष्ट्र जपण्यासाठी आपण सर्वच विजयाच्या दिशेने मेहनत करूआश्वासन महिला कडून घेतले. तसेच प्रदेशावरून प्रा. वर्षाताई भोसले,सुलक्षणाजी सावंतजी (सहसंयोजक),अश्विनी एमएल (समन्वयक) मायाताई नारोलिया (महाराष्ट्र प्रभारी) अल्का ताई आत्राम यां सर्वांनी मार्गदर्शन केले.

# प्रसूतीसाठी डॉक्टर वेळेत न आल्याने मातेच्या पोटातच दगावले बाळ

## 24 तास महिलेची तडफड

प्रतिनिधी
■ खेड

रुग्णालयात डॉक्टरच उपलब्ध नसल्याने प्रसूतीसाठी आलेल्या मातेच्या पोटातच बाळाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना खेड येथील कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात गुरुवारी रात्री घडली. या प्रकाराबाबत मनसेच्या काही कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर, तब्बल २४ तासानंतर डॉक्टर रुग्णालयात दाखल झाले.

शस्त्रक्रिया करून मृत अर्भकाला बाहेर काढण्यात आले. मंडणगड येथील एका गर्भवती महिलेला खेड येथील कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात दोन दिवसांपूर्वी प्रसूतीसाठी दाखल केले होते. मात्र, या रुग्णालयात डॉक्टरच न आल्याने महिलेच्या पोटातच बाळाचा मृत्यू झाल्याचे विदारक चित्र समोर आले.

डॉक्टरांना माहिती दिल्यानंतरही डॉक्टर रुग्णालयात दाखल झाले नसल्याने गरोदर महिला मृत्यूशी झुंज देत होती. या प्रकाराबाबत खेडमधील मनसेच्या काही कार्यकत्यांना कळताच त्यांनी रुग्णालयात जाऊन प्रशासनाला धारेवर धरले. त्यानंतर डॉक्टर हजर झाले आणि त्यांनी शस्त्रक्रिया करून मृत अर्भकाला बाहेर काढले. दरम्यान, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सगरे यांच्याशी या प्रकाराबाबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क झाला नाही.

# पुण्यात कामगाराचा मशीनमध्ये अडकून अपघात, शीर धडावेगळं झालं

प्रतिनिधी
■ पुणे

उद्योगनगरी असलेल्या पिंपरी - चिंचवड शहरातून अतिशय धक्कादायक घटना समोर आली आहे. कुदळवाडी परिसरात असलेल्या एका स्टील यार्ड कंपनीच्या मशीनमध्ये अडकून कामगारासोबत मोठा अपघात झाला आहे. मशीनमध्ये अडकल्याने कामगाराचे धड शरीरावेगळे झाले आहे. या अपघातात कामगारचा मृत्यू झाला असून अंगावर शहारे आणणारी ही घटना आहे.

मोहनलाल जोखनप्रसाद गौतम असे मृत झालेल्या कामगाराचे नाव असून तो मूळचा उत्तर प्रदेश येथील राहणारा असल्याची माहिती आहे. प्रकरणी चिखली पोलिसांनी कंपनीचे मालक फैयाज उमर शेख आणि फारुख उमर शेख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, पिंपरी - चिंचवड परिसरातील चिखली परिसरात स्टील यार्ड नावाची कंपनी आहे. या कंपनीत मोहनलाल हा काम करत होता. मात्र मोहनलाल याला मशीन चालवण्याचा कोणताही अनुभव नव्हता. त्याने कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नव्हते. तसेच ही मशीन चालवताना त्यावर लक्ष ठेवणारे कोणी कामगार नसताना, अपघात होऊ शकतो हे माहिती असताना देखील कंपनीचे मालक फैयाज उमर शेख आणि फारुख उमर शेख यांनी त्याला मशीन चालवण्यास भाग पाडले.

# आटपाडीमध्ये ओढ्याला आला नोटांचा महापूर

## 500 रुपयांच्या नोटा गोळा करण्यास नागरिकांची झुंबड

प्रतिनिधी
■ सांगली

आटपाडीमध्ये ओढ्याला नोटांचा पूर आल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. 500 रुपयांच्या नोटा ओढ्यातून वाहून आल्याचा प्रकार घडला. यानंतर या नोटा गोळा करण्यासाठी ओढ्यामध्ये नागरिकांची मोठी झुंबड उडाली आहे. गावातल्या अंबाबाई ओढ्यामध्ये या नोटा वाहत आल्या आहेत. शनिवारच्या आठवडी बाजारानिमित्त आलेल्या नागरिकांना ओढ्यातून पाचशेच्या नोटा वाहत असल्याचं निदर्शनास आलं. यानंतर नागरिकांनी नोटा गोळा करण्यासाठी




ओढ्यामध्ये उड्या घेतल्या. जवळपास दोन ते अडीच लाख रुपये या ओढ्यातून नागरिकांनी गोळा केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येतोय.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, आटपाडी शहरात आज शनिवारचा आठवडा बाजार असतो. गावातल्याच अंबाबाई मंदिरा शेजारील सुख ओढा या ठिकाणी हा बाजार भरतो. बाजाराच्या निमित्तानं सकाळच्या सुमारास नागरिकांची ये-जा सुरू होती. सकाळी नऊ वाजताच्या सुमारास या ठिकाणाहून बाजारासाठी आलेल्या काही नागरिकांना ओढ्यातून नोटा वाहत असल्याची बाब निदर्शनास आली.

# राज ठाकरेंचा भोंगा उतरवण्याचे काम सर्वप्रथम आमचे कार्यकर्ते करतील!

## मुस्लिमांसाठी केवळ वंचित बहुजन आघाडी लढते

प्रतिनिधी
■ वाशिम

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांचे सुपुत्र सुजात आंबेडकर यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली आहे. राज ठाकरे यांनी मोठ्या स्पीकरवर, भोंग्यांवर हनुमान चालिसा लावण्याची वल्गना केली आहे. त्यांनी खरेच असे केले तर त्यांचे भोंगे सर्वात अगोदर खाली उतरवण्याचे काम वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते करतील, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापण्याची शक्यता आहे.

वंचित बहुजन आघाडीने वाशिम विधानसभा मतदारसंघातून मेघा डोंगरे यांना उमेदवारी दिली आहे. सुजात आंबेडकर यांनी शनिवारी त्यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. त्यात त्यांनी सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील




महाविकास आघाडीसह मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर तिखट टीका केली. ते म्हणाले, मुस्लिमांसाठी वंचित बहुजन आघाडी संघर्ष करते. ते (राज ठाकरे) म्हणतात आम्ही मोठमोठे स्पीकर लावू, भोंगे लावू आणि त्यावर हनुमान चालिसा वाजवू. आमचा त्याला विरोध आहे. त्यांनी असे काही केले तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा भोंगा उतरवण्याचे काम सर्वात अगोदर वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते करतील.

सुजात आंबेडकर म्हणाले, मुस्लिम समाजाचे 4-5 आमदार निवडून येत नाहीत तोपर्यंत त्यांचे भले होणार नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेचे प्रस्थापित नेते आमचा विकास करू शकत नाहीत. महाराष्ट्रात 15 टक्के मुस्लीम समाज आहे. त्यामुळे जो पक्ष त्यांना 15 टक्के भागीदारी देईल, 15 टक्के उमेदवारी देईल त्यांनाच आम्ही मतदान करू अशी आग्रही मागणी या प्रकरणी आपण केली पाहिजे.

विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने एकला चलोरेची भूमिका घेतली आहे. वंचितने आतापर्यंत 3 उमेदवार याद्या जाहीर केल्या असून, 51 उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. त्यातच सुजात आंबेडकर यांनी थेट राज ठाकरे यांच्याविरोधात रणशिंग फुंकल्यामुळे येथील वातावरण चांगलेच तापण्याची शक्यता आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे वाशिम मतदारसंघात महायुती, महाविकास आघाडी व वंचित बहुजन आघाडीत तिरंगी सामना होण्याची शक्यता आहे त्यामुळे जनता कुणाच्या बाजूने कौल देते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच वाशिममध्ये येऊन बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असणाऱ्या पोहरादेवीचे दर्शन घेतले होते. त्यांच्या कार्यक्रमाला जवळपास 2 लाख बंजारा समाजबांधव उपस्थित होते.

# विदर्भ-मराठवाड्यात आज मेघगर्जनेसह कोसळणार पाऊस

## हवामान खात्याकडून जिल्ह्यांना अलर्ट

■ नागपूर

मागील आठवडाभरापासून राज्यातील हवामानात सातत्याने बदल होत आहेत. काही ठिकाणी पावसाच्या सरी तर काही भागात उन्हाचा कडाका जाणवतो आहे. पावसाची उघडीप असलेल्या भागात चांगलाच उकाडा वाढला आहे. अशातच हवामान खात्याने आज राज्यात वादळी वारे आणि विजांसह जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. यापार्श्वभूमीवर काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

आयएमडीने जारी केलेल्या अंदाजानुसार, सध्या अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. ही प्रणाली पश्चिमेकडे सरकताना आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामानात मोठे बदल होणार असून काही भागात विजांसह जोरदार



पावसाचा अंदाज आहे.

पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातील नंदूरबार, धुळे, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यात पावसाची शक्यता आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली जिल्ह्या देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील वाशीम, नागपूर, बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा जिल्ह्यात पाऊस पडणार आहे.दरम्यान, सध्या काही भागात उन्हाचा चटका चांगलाच वाढला असून नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागतो आहे. ब्रह्मपुरी येथे राज्यातील उच्चांकी ३७.३ अंश तापमानाची नोंद झाली. तर अकोला, चंद्रपूर, अमरावती येथे ३५ अंशापेक्षा अधिक तापमान नोंदवले गेले आहे. पुढील आठवडाभर राज्यात हवामानाची अशीच स्थिती राहिल, असं सांगण्यात आलं आहे.

## चेंबूरमधील मंदिरात भीषण आग

**मुंबई:** चेंबूर कॉलनी परिसरातील संतोषी माता मंदिरात शनिवारी दुपारी २.१५ च्या सुमारास भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या चार गाड्या दाखल झाल्या असून आग्निशामक आग विझविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. चेंबूर कॉलनी परिसरातील एनलक्स रुग्णालयाच्या शेजारी हे मंदिर असून शनिवारी दुपारी २.१५ च्या सुमारास मंदिरात अचानक आग लागली. यावेळी मंदिरात अनेक भाविक उपस्थित होते. आग लागताच भाविकांनी मंदिरा बाहेर धाव घेतली. तसेच आगीची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली. त्यानंत तात्काळ अग्निशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाचे जवानांनी बचावकार्य हाती घेतले असून आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवान प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. दरम्यान, नेमक्या कोणत्या कारणामुळे आग लागली हे समजू शकलेले नाही.



# टीम इंडियाची इच्छा असेल तर ते प्रत्येक सामना खेळून लाहोरहून मायदेशी परत येऊ शकतात...

### फेब्रुवारीमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी

प्रतिनिधी
■ मुंबई



पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (PCB) चॅम्पियन्स ट्रॉफी 2025 संदर्भात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (BCCI) प्रस्ताव दिला आहे. क्रिकबझच्या मते, पीसीबीने म्हटले आहे की टीम इंडिया प्रत्येक सामना खेळल्यानंतर भारतात परत येऊ शकते आणि पाकिस्तानी बोर्ड त्यांना यामध्ये मदत करेल.

पीसीबीने नुकतेच बीसीसीआयला पत्र लिहिले असल्याचे अहवालात म्हटले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय संघाला पाकिस्तानमध्ये राहायचे नसेल आणि प्रत्येक सामन्यानंतर चंदीगड किंवा नवी दिल्लीला परत यायचे असेल तर बोर्ड त्यांना मदत करेल, असे सांगण्यात आले आहे. पीसीबीच्या एका अधिकाऱ्याने या प्रस्तावाला दुजोरा दिला आहे. ही ऑफर देण्याचे कारण म्हणजे भारताच्या शेवटच्या 2 सामन्यांमधील एका आठवड्याचे अंतर आहे.

वृत्तानुसार, भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या नुकत्याच झालेल्या पाकिस्तान दौऱ्यादरम्यान भारतीय संघ पाकिस्तानला जाण्याबाबत चर्चा झाली होती. जयशंकर आणि पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांच्यातील चर्चेदरम्यान हा मुद्दा अनेकदा उपस्थित करण्यात आला होता. या भेटीनंतर पीसीबीच्या आशा उंचावल्या आहेत, मात्र याबाबत अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य जारी करण्यात आलेले नाही.

गेल्या वर्षी पाकिस्तान एकदिवसीय विश्वचषक खेळण्यासाठी भारतात आला होता पाकिस्तानचा संघ गेल्या वर्षी एकदिवसीय विश्वचषक खेळण्यासाठी भारतात आला होता. त्यानंतर 14 ऑक्टोबरला अहमदाबादमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना झाला. भारतीय संघाने हा सामना 7 विकेटने जिंकला.

पाकिस्तानचा भारत दौरा पाकिस्तानने शेवटचा भारत दौरा 2012-13 मध्ये केला होता. त्या दौऱ्यात 3 वनडे आणि 2 टी-20 सामन्यांची द्विपक्षीय मालिका खेळली गेली. पाकिस्तानने एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली, तर टी-२० मालिका १-१ अशी बरोबरीत राहिली.

भारताचा पाकिस्तान दौरा टीम इंडियाने शेवटचा पाकिस्तान दौरा 2008 मध्ये केला होता. 3 कसोटी सामन्यांची ती मालिका भारतीय संघाने 1-0 ने जिंकली होती. या मालिकेतील २ सामने अनिर्णित राहिले.

मुंबईतील दहशतवादी हल्ल्यामुळे भारत पाकिस्तानात जात नाही 2007-08 पासून भारतीय संघाने पाकिस्तानचा दौरा केलेला नाही. 2008 मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानमध्ये क्रिकेट खेळण्यास नकार दिला होता. तेव्हापासून दोन्ही संघ फक्त आयसीसी आणि एसीसी स्पर्धांमध्ये खेळतात. 2013 पासून, दोन्ही संघांनी तटस्थ ठिकाणी 13 एकदिवसीय आणि 8 टी-20 सामने खेळले आहेत.

# श्रेयस अय्यरने संपवला 3 वर्षांचा दुष्काळ, रणजी ट्रॉफीत शतक झळकावत गाठला मोठा टप्पा

प्रतिनिधी
■ मुंबई



भारतीय कसोटी संघातून बाहेर असलेला मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरने शनिवारी तीन वर्षांनंतर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये शतक झळकावले. त्याने मुंबई आणि महाराष्ट्र यांच्यातील दुसऱ्या फेरीतील रणजी करंडक सामन्यात तीन वर्षांनंतर प्रथम श्रेणीतील शतकाचा दुष्काळ संपवला. कर्णधार अजिंक्य रहाणे बाद झाल्यानंतर मुंबईसाठी पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अय्यरने युवा सलामीवीर फलंदाज आयुष म्हात्रेसह मुंबई संघाचा डाव सावरला. या दोघांनी दुसऱ्या दिवशी २०० धावांची भक्कम भागीदारी करत मुंबईला ३०० धावांच्या पुढे नेले.

श्रेयस अय्यरने १३१ चेंडूंत नऊ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने शतक पूर्ण केले. शतकाने अय्यरचा दीर्घकाळचा दुष्काळ संपवला, जो २०२४ च्या सुरुवातीला घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यापासून भारताच्या कसोटी सेटअपमधून बाहेर आहे. २९ वर्षीय अय्यरने मागील प्रथम श्रेणीतील शतक नोव्हेंबर २०२१ मध्ये कानपूरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध झळकावले होते. अय्यरने महाराष्ट्राविरुद्धच्या डावात ६००० प्रथम श्रेणी धावाही पूर्ण केल्या आहेत. आयुष म्हात्रे १७६ धावा करून बाद झाला. देशांतर्गत क्रिकेट हंगाम २०२४-२५ सुरू झाल्यापासून अय्यरची कामगिरी खराब राहिली होती. दुलीप ट्रॉफीमध्ये अय्यरने सहा डावांत दोन अर्धशतके आणि तितक्याच शून्यांसह केवळ १५४ धावा केल्या होत्या. मुंबईसाठी इराणी कप सामन्यात अय्यरने दोन डावात ५७ आणि ८ धावा केल्या. अय्यरने गेल्या आठवड्यात बडोद्यात झालेल्या रणजी ट्रॉफीच्या पहिल्या फेरीत शून्यावर बाद झाला होता. अय्यर आणि भारतीय यष्टीरक्षक इशान किशन यांना २०२४ च्या सुरुवातीला बीसीसीआयने केंद्रीय कराराच्या यादीतून वगळण्यात आले होते, जेव्हा त्यांनी देशांतर्गत स्पर्धेत सहभाग घेतला नव्हता. मुंबईसाठी रणजी सामन्यांपासून दूर राहण्याचे कारण म्हणून अय्यरने पाठ आणि कंबरदुखीचे कारण सांगितले असले तरी, राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे क्रीडा विज्ञान प्रमुख नितीन पटेल यांच्या नेतृत्वाखालील बीसीसीआय वैद्यकीय पथकाला त्याच्या फिटनेसमध्ये कोणतीही समस्या आढळली नव्हती.

# मुंबईतील हवेची गुणवत्ता ‘चांगली’, शनिवारी मुंबईचा हवा गुणवत्ता निर्देशांक 45 वर

प्रतिनिधी
■ मुंबई



पावसामुळे मुंबईतील प्रदूषणाच्या पातळीत घट झाली असून हवेच्या गुणवत्ता निर्देशांकाचा दर्जा शनिवारी ‘चांगला’ नोंदवला गेला. हा दर्जा रविवारीही कायम राहण्याची शक्यता आहे. पावसामुळे मुंबईच्या कमाल तापमानाचा पाराही खाली उतरला आहे. मात्र वातावरणातील आर्द्रतेमुळे उकाडा कायम आहे.

हवेची गुणवत्ता मोजणाऱ्या समीर ॲपच्या नोंदीनुसार मुंबईतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक शनिवारी सायंकाळी ४५ इतका होता. गेले काही दिवस मुंबईच्या हवेत सुधारणा झालेली आहे. मुंबईच्या सर्व केंद्रांवर समीर ॲपच्या नोंदीनुसार हवा चांगली होती. पीएम २.५, पीएम १०, ओझोन यांचा स्तर समाधानकारक नोंदला गेला. दरम्यान, रविवारीही अशीच स्थिती असेल, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

वांद्रे – कुर्ला संकुल, मालाड, वरळी, कुलाबा या भागातील हवेची कायम मध्यम किंवा अतिवाईट अशी नोंद होते. मात्र या भागात शनिवारी हवा निर्देशांक अनुक्रमे ६५, २३,४०, २९ इतका नोंदला गेला. दरम्यान, पावसामुळे कमाल तापमानात घट झाली असली तरी दिवसा उन्हाचा चटका आणि सायंकाळी काहीसा गारवा असे वातावरण सध्या मुंबईत आहे. ढगाळ वातावरणामुळे आणखी एक ते दोन दिवस कमाल तापमानात घट होण्याची शक्यता आहे. मात्र, वातावरणातील आर्द्रतेमुळे उकाडा सहन करावा लागेल. तसेच सायंकाळी किंवा रात्री पाऊस पडण्याची शक्यता असून त्यावेळी वातावरणात काहीसा गारवा निर्माण होण्याची शक्यता आहे. पूर्व – मध्य अरबी समुद्रात कमी दाबाच्या क्षेत्राची निर्मिती झाली आहे. तसेच चक्राकार वाऱ्यांची स्थितीही निर्माण झाली आहे. यामुळे राज्यातील बहुतांश भागात पावसाचा अंदाज आहे. पुढील दोन दिवस राज्यातील विविध भागात पाऊस कायम राहील.

# मार्वे बीचवरील बेकायदा बांधकामावर पालिकेचा हातोडा

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजताच निवडणुकीच्या आड मुंबईत मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामांचा सुळसुळाट झाला आहे. मालाड पूर्वेकडील मार्वे बीच टी जंक्शन जवळ दोन हजार चौरस मीटरचे तीन गाळे दोन दिवसांत बांधण्यात आले. मात्र पालिकेच्या पी उत्तर विभागाला याची तक्रार मिळताच ते गाळे जमीनदोस्त करण्यात आले.

पी उत्तर विभागाचे सहायक अभियंता विजय मानकर यांनी सांगितले की, मार्वे बीच जवळील टी जंक्शन येथे बेकायदा बांधकाम झाल्याची तक्रार मिळताच. उप अभियंता कुबेर शिंदे आणि प्रवीण मुलुक यांच्यावर बेकायदा बांधकाम जमीनदोस्त करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. शिंदे आणि मुलुक यांनी तातडीने बेकायदा बांधकाम झाले त्याठिकाणी जाऊन त्यावर हातोडा चालवला. निवडणूक काळात भूमाफिया अधिक सक्रिय होतात. बेकायदा बांधकाम झाल्याची माहिती मिळताच संबंधितांना नोटीस बजावण्यात येते. मात्र निवडणूक संपताच भूमाफिया न्यायालयात धाव घेतात आणि कारवाईला स्थगिती मिळते. त्यामुळे बेकायदा बांधकाम झाल्याची तक्रार मिळताच पी उत्तर विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत असल्याची माहिती इमारत विभागाचे कार्यकारी अभियंता सागर राणे यांनी दिली.

# प्रदीप म्हापसेकर यांच्या चित्रांचं प्रदर्शन

■ मुंबई

बांद्रा बँड स्टँड येथील ग्रंथाली प्रतिभांगणमध्ये शुक्रवारी 18 ऑक्टोबरपासून चित्रकार प्रदीप म्हापसेकर यांच्या चित्रांचे प्रदर्शन सुरू झाले आहे. ते २० नोव्हेंबरपर्यंत सुरू असणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते झाले.

कुमार केतकर आपल्या भाषणात म्हणाले, 'प्रदीप यांनी प्रामुख्याने काळा आणि पांढरा रंग वापरत अधिक चित्रे काढली आहेत, त्यांतून त्यांनी या दोन रंगाचं महत्त्वच अधोरेखित केले आहे. आपण गुरुदत्तच्या 'प्यासा' किंवा 'साहेब, बिवी और गुलाम' सारख्या ब्लॅक अँड व्हाईट सिनेमांची, ते रंगीत असते तर अशी कल्पनाही करू शकत नाही; कारण त्या सिनेमांना ब्लॅक अँड व्हाईटमध्ये जी खोली, अर्थवत्ता प्राप्त झालीय, ती रंगांमध्ये शक्यच झाली नसती. त्यामुळे गुरुदत्तने जाणीवपूर्वक ब्लॅक अँड व्हाईट हे माध्यम निवडलं. या ब्लॅक अँड व्हाईट माध्यमाची हीच ताकद प्रदीप म्हापसेकर यांनाही उमगली आहे. 'ग्रंथाली प्रतिभांगणच्या अश्विनी भोईर यांनी कार्यक्रमाचे नेटकेपणाने सूत्रसंचालन केले. या छोटेखानी समारंभाला त्यांचे जे जे स्कूलमधील प्रतिभाशाली मित्र, पत्रकार, स्नेही आणि परिवार सदस्य, चाहते उपस्थित होते. हे प्रदर्शन आज 20 तारखेपर्यंत खुले आहे.

# चेंबूरच्या एका गृहनिर्माण प्रकल्पात घोटाळा; झोपडपट्टी धारकांची फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ मुंबई

चेंबूरच्या वाशीनाका भागातील एका गृहनिर्माण प्रकल्पात सोसायटी पदाधिकारी, विकासक यांच्यावर झोपडपट्टी धारकांची फसवणूक करून आर्थिक फायदा करून घेतल्याच्या आरोपावरून आर सी एफ पोलीस ठाण्यात गुन्हा दखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी भारतीय दंड विधान संहिता कलम 420, 465, 467, 468,471, 34 नुसार हा गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी संदीप त्रिलोकीनाथ शुक्ला हे असून, त्यांनी रहिवाशांची ही फसवणूक फेब्रुवारी २०२० पासून ते मार्च २०२१ पर्यंत झाल्याचे म्हटले आहे. चेंबूर वाशी नाका येथील ओम गणेश नगर , एस.आर.ए. सहकारी गृह निर्माण संस्था या सोसायटीचे मुख्यप्रवर्तक राजेश भास्कर केदारे व सोसायटीचे इतर सदस्य, तसेच प्रकल्प विकासक, मेसर्स रेडिअस अँड डिझर्व बिल्डर्स एल.एल. पी. यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या सोसायटीचे पदाधिकारी व विकासक मेसर्स रेडिअस अँड डिझर्व बिल्डर्स एल.एल.पी. यांनी त्यांना आर्थिक फायदा व्हावा या उद्देशाने ओम गणेश नगर, एस.आर.ए., गृह निर्माण संस्था या सोसायटीतील झोपडी धारकांचे घरभाडे वाढ न होण्यासाठी सोसायटीची २३ एप्रिल २०१७ रोजी सर्वसाधारण सभा झाल्याचे भासवून, सर्वसाधारण सभेच्या नोंदवहीत फिर्यादी यांची निधन झालेली आई मालतीदेवी त्रिलोकिनाथ शुक्ला यांची व इतर झोपडी धारकांच्या बनावट साह्य करून ती सर्व साधारण सभेची नोंदवही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात सादर केली होती. याप्रकरणी झोपडीधारकांची व शासनाची फसवणुक केली म्हणून या सोसायटीचे पदाधिकारी व विकासक मेसर्स रेडिअस अँड डिझर्व बिल्डर्स एल.एल.पी. यांचे विरुद्ध गुन्हा नोंद केला असून, याप्रकरणी तपासी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पाटिल हे तपास करत आहेत.

# ‘कोण होणार हिटलर?’ या महाराष्ट्राला पडलेल्या प्रश्नाचे मिळाले ‘क्युट’ उत्तर!

### ‘मु. पो. बोंबीलवाडी’मध्ये प्रशांत दामले साकारणार हिटलरची भूमिका

प्रतिनिधी
■ मुंबई



‘कोण होणार हिटलर?’, या उभ्या महाराष्ट्राला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर आता मिळाले आहे. ‘मु. पो. बोंबीलवाडी’ या १ जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणाऱ्या बहुप्रतीक्षित चित्रपटात हिटलर भूमिकेत ज्येष्ठ व लोकप्रिय रंगकर्मी प्रशांत दामले दिसणार आहेत. तीन लागोपाठच्या चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार मिळविणाऱ्या परेश मोकाशी यांचा हा चित्रपट असल्याने रसिकांमध्ये जी उत्कंठा लागून राहिली आहे, ती हिटलरच्या भूमिकेत प्रशांत दामले असल्याचे जाहीर झाल्याने आता दुपटीने वाढली आहे.

‘कोण होणार हिटलर?’ या प्रश्नावरील पडदा लेखक, दिग्दर्शक परेश मोकाशी, निर्माते मधुगंधा कुलकर्णी आणि विवेक फिल्मस्, मयसभा करमणूक मंडळी यांनी हॉटेल ऑर्किड येथे झालेल्या पत्रकार परिषदेत उघडला आहे. चित्रपटाचे लेखन -दिग्दर्शन परेश मोकाशी यांचे आहे. हरिश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या चित्रपटांसाठी राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅट्रिकनंतर मधुगंधा कुलकर्णी आणि परेश मोकाशी घेऊन येत असलेल्या "मु. पो. बोंबिलवाडी" मधील हिटलरच्या भूमिकेमध्ये कोण आहे, हा लाखमोलाचा प्रश्न रसिकांना पडला होता. हिटलरचा शोध घेण्यासाठी खरे तर प्रेक्षकांचा कल घेण्यात आला आणि त्याला भरघोष प्रतिसाद मिळाला.त्याशिवाय वैभव मांगले, प्रणव रावराणे, मनमीत पेम, सुनील अभ्यंकर, गीतांजली कुलकर्णी, रितिका श्रोत्री, अद्वैत दादरकर यांचीही नावे या स्पर्धेत पुढे होती. मात्र अंतिमतः शिक्कामोर्तब प्रशांत दामले यांच्या नावावरच झाले. हिटलरच्या भूमिकेबद्दल विचारले असता प्रशांत दामले म्हणाले, “मुळात हिटलर म्हटले की आपल्या डोळ्यासमोर एक आकृती येते, प्रकृती येते. मी माझ्या आयुष्यात असला हिटलर केला नाही आणि करणारही नाही. हे जे पात्र आहे त्याला हिटलर का म्हणावे हा प्रश्न पडावा असे हे पात्र आहे. चित्रपटाच्या निर्मात्या मधुगंधा कुलकर्णी म्हणाल्या, “आम्ही आत्तापर्यंत जेवढे चित्रपट केले त्यानिमित्ताने जेव्हा आम्ही लोकांना प्रीमियर किंवा इतर कार्यक्रमांच्या निमित्ताने भेटायचो तेव्हा लोक परेशला आवर्जून सांगायचे की, तुम्ही ‘बोंबीलवाडी’ नाटक परत आणा. या नाटकावर चित्रपट का आणू नये? मग आम्ही ठरवले की या संकल्पनेचे चित्रपटीकरण करून त्याचा चित्रपट करायचा. त्यात आनंदाची बाब म्हणजे प्रशांत दामले यांनी हिटलरचे काम करायला हो म्हटल्यामुळे चित्रपटाचे मूल्य वाढले आहे. हिटलरच्या निवडीबाबत बोलताना लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी म्हणाले, “आमचा हिटलर कसा असावा याबाबत चर्चा सुरु होती. हिटलर म्हणजे क्रूर, जगज्जेता, कठोर अशी त्याची प्रतिमा आहे. पण नाटकाचा फार्सिकल बाज पाहता, आमचा हिटलर ‘क्युट’ असावा अशी एक टूम निघाली. असा प्रश्न आल्यावर महाराष्ट्रात क्युट म्हणून ज्याची ओळख आहे, असे एकाच नाव पुढे आले आणि ते म्हणजे प्रशांत दामले. नाटकामधून या कथेचे चित्रपटात रुपांतर होताना जे बदल झाले, त्यातून मग कलाकारांची निवड झाली आणि ती चपखल आहे.

# 'थॉट्स ऑफ आंबेडकर' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न




प्रतिनिधी
■ मुंबई

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषण या महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या ग्रंथ मालिकेतील खंड क्रमांक १८ भाग १ या खंडाचे बारकाईने परिशिलन करुन विविध विचारांचे संकलन केलेल्या नामदेव साबळे यांच्या थॉट्स ऑफ आंबेडकर या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा प्रख्यात साहित्यिक आणि ज्येष्ठ नेते अर्जून डांगळे यांच्या हस्ते मुंबई प्रेस कल्बच्या सभागृहात शुक्रवारी १८ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दलित पँथरचे अध्यक्ष आणि नेते सुरशदादा केदारे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून दैनिक सार्वभौम राष्ट्राचे संपादक प्रा. प्रेमरत्न चौकेकर हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक दिवाकर शेजवळ, वर्कशॉप या मॅगजिनचे संपादक सुनिल कदम आणि साहित्यिक विचारवंत राजू रोटे यांनी या मार्गदर्शन केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज चाळके यांनी तर प्रास्ताविक नामदेव साबळे यांनी केले. सदर कार्यक्रमास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खोब्रागडे गटाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील निरभवणे, समाज भूषण पुरस्कार प्राप्त सो.ना. कांबळे, समाज भूषण पुरस्कार प्राप्त दिगंबर वानखेडे , गुन्हे नोंद या मासिकाचे संपादक संतोष भालेराव, विद्रोही कवी बबन सरवदे, साहित्यिक अशोक रणदिवे, समाज सेवक आत्माराम आव्हाड, मिमचे नेते विजय शिरसागर , राष्ट्रवादी रिपब्लिकन पक्षाचे उपाध्यक्ष मंजाप्पा गौडा, मुंबई प्रदेश अध्यक्ष सुरेश कुमार बिंद, उपाध्यक्ष संजय लांडगे, आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आ. दिलीप लांडे आयोजित मेळाव्यात शेकडोजणांचा शिवसेनेत प्रवेश

### माता भगिनींची ताकद वाढवण्याचे काम सरकारने केले - शिंदे

प्रतिनिधी
■ मुंबई



सद्याचे हे युग लाडक्या बहिणींचे आहे, हा मुख्यमंत्र्यांचा संदेश देण्यासाठी मी येथे आलो आहे, विरोधक लाडकी बहीण योजना बंद होईल असा अपप्रचार करत आहेत मात्र ही योजना कधीच बंद होणार नाही असा ठाम विश्वास शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी साकीनाका येथील कार्यक्रमात व्यक्त केला आहे. शिवसेना आमदार दिलीप लांडे यांनी चांदिवली म्हाडा येथील गणेश मैदान येथे महाविजय संवाद सभेचे आयोजन केले होते.

यावेळी उपस्थित जनसमुदायला संबोधित करताना श्रीकांत शिंदे पुढे म्हणाले की याआधी कोणत्याही सरकारने लाडली बहिणींचा विचार केला होता का? शिवसेना भाजप सरकारने ही योजना आणून माता-भगिनींची ताकद वाढवण्याचे काम केले आहे. शिंदे म्हणाले की, आमचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या दोन वर्षांत जेवढी विकासकामे केली आहेत, तेवढी आजपर्यंतच्या कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी केली नाहीत हे स्पष्ट दिसते. चांदिवलीचे शिवसेनेचे आमदार दिलीप लांडे यांचे कौतुक करताना मामा यांनी आपल्या विधानसभा मतदारसंघात शासकीय निधीचा योग्य वापर करून केलेली विकासकामे सर्वांच्या डोळ्यासमोर असल्याचे सांगतानाच शिंदे यांनी दिलीप मामा लांडे यांचे पुन्हा अभिनंदन केले.

जनतेने पुन्हा एकदा लांडे मामाला निवडून आणण्याचे आवाहन केले. यावेळी दिलीप लांडे म्हणाले की, चांदिवली विधानसभा मतदार संघाचा विकास हे माझे ध्येय आहे, लोकांना मुलभूत सुविधा पुरविणे हे माझे काम आहे, जनतेचा आशीर्वाद माझ्यावर असाच राहू द्या, माझ्या हातून चांदिवलीतील सर्व विकासकामे पूर्ण होतील. चांदिवली म्हाडा येथील गणेश मैदानावर आयोजित महाविजय संवाद मेळाव्यात खासदार श्रीकांत शिंदे. खासदार नरेंद्र म्हस्के, आमदार दिलीप लांडे, माजी खासदार संजय निरुपम, शिवसेना सचिव सिद्धेश कदम, विधानसभा प्रमुख अशोक माटेकर, माजी नगरसेवक किरण लांडगे, माजी नगरसेवक वाजिद कुरेशी, युवा सेना महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य प्रयाग लांडे यांच्यासह अनेक मान्यवर आणि मोठया संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. या दरम्यान लांडे यांच्या नेतृत्वाखाली विविध पक्षातील शेकडो लोकांनी श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यात अधिकाश मुस्लिम समाजाच्या महिला पुरुषांचा समावेश आहे.

# 'गिरे तोभी टांग उपर' अशी राऊतांची अवस्था

### भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकरांचे टिकास्त्र

प्रतिनिधी
■ मुंबई

उबाठाला आपले अस्तित्व दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न करावा लागताना दिसतोय. बाळासाहेब हयात असताना सगळे केंद्रीय नेते मातोश्री दरबारी येत होते. परंतु अलीकडच्या काळात उद्धव ठाकरे दिल्लीच्या चरणी लोटांगण घालत होते. नाना पटोलेंच्या वादाच्या निमित्ताने चेन्नीथला यांना मातोश्रीवर यावे लागले यात उद्धव ठाकरे खुश राहणार आहेत. परंतु संजय राऊत यांनी लगेच पलटी मारलीय. गीर गया तोभी टांग उपर, अशी त्यांची अवस्था आहे, अशी घणाघाती टीका भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी केली आहे.

महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केलेल्या विधानावर दरेकर यांनी म्हटले की, स्वास्थ्य चांगले आहे की ठीक आहे हे महाराष्ट्रातील जनतेला आपल्या एकमेकांवर ज्या कुरघोड्या चाललेल्या आहेत त्यातून दिसून येतंय. आमची महायुतीची झालेली पत्रकार परिषद खेळीमेळीच्या वातावरणातील लोकांनी पाहिलीय. नाना पटोले पत्रकार परिषदेतून उठून जाताना विजय वडेट्टीवार हाताने धरताना पाहिलेले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे स्वास्थ्य काय आहे हे महाराष्ट्रातील जनतेला नीट दिसून आलेय. तसेच विदर्भात नाना पटोले आणि काँग्रेस उबाठा गटाला मोजायलाच तयार नाही. नगण्य अशा प्रकारची दोन तीन जागा देण्याची तयारी असु शकते.

परंतु उद्धव ठाकरे गटाचे तेथील संपर्क प्रमुख भास्कर जाधव जास्तीच्या जागांवर अडून आहेत. मात्र नाना पटोले आणि काँग्रेस उबाठा गटाला हिंग लावून पुसायला तयार नाहीत. जरी तेथे जागा वाटप झाले तरी निवडणुकीत काय होईल हे विदर्भात निकालात दिसून येईल, असेही दरेकर म्हणाले. संजय राऊत यांच्या विधानावर दरेकर म्हणाले की, वाटा हा मागून मिळत नसतो, वाटा हा आपल्या अस्तित्वावर, आपली असणारी ताकद, असणारा जनाधार यावर मिळत असतो. परंतु अलीकडच्या काळात संजय राऊत आणि त्यांच्या पक्षाने लाचारीची भुमिका घेतली आहे. बाळासाहेब हयात असताना जी शिवसेना होती त्यावेळी भाजपने बाळासाहेबांच्या शिवसेनेला सातत्याने झुकते माप दिलेले आहे. अगदी मुख्यमंत्री मनोहर जोशिंच्या रूपाने पाहिलेला आहे. त्यासाठी अस्तित्व, भुमिका लागते. हिंदुत्व, मराठी माणसाच्या हिताची भुमिका सोडून काँग्रेसच्या चरणी 'घालिंग लोटांगण' करत असाल तर महत्वाचा वाटा, जागा कशा मिळणार? महाराष्ट्राची ओळख ही स्वाभिमानी म्हणून आहे. परंतु उबाठा गटाने काँग्रेसच्या चरणी लोटांगण घालून लाचार अशी प्रतिमा बनवून ठेवली असल्याची टिकाही दरेकरांनी केली.

***संजय राऊतांनी दुसऱ्याच्या पॅंटीची काळजी करू नये***

*संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याविरोधात केलेल्या वक्तव्यावर बोलताना दरेकर म्हणाले की, आपल्या पॅंटीला काही डाग लागणार नाही याची काळजी संजय राऊत यांनी घ्यावी. दुसऱ्याच्या पॅंटीची आणि चिखलाची काळजी करत असताना आपली त्रेधातिरपट उडू नये याची काळजी घ्या. संजय राऊत यांनी स्वतःच्या अंगाला चिखल लागणार नाही याची काळजी घ्यावी, असा टोलाही दरेकरांनी लगावला.*

## आग्र्यात रील बनवणाऱ्या तरुणाचा गळा कापला

**आग्रा:** आग्रा येथे रील बनवत असताना एका तरुणाची मान लोखंडी जाळीने कापली गेली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताचा व्हिडिओ समोर आला आहे. हा व्हिडिओ नमक की मंडी येथील जोहरी प्लाझा येथील असल्याचे सांगण्यात येत आहे. 35 सेकंदाचा व्हिडिओ समोर आला ही घटना शनिवारी सकाळी साडेदहा ते अकराच्या दरम्यान घडल्याचे सांगण्यात येत आहे. हा तरुण जोहरी प्लाझामध्ये काम करतो. तो त्याच्या चार मित्रांसह दुकान उघडण्यासाठी आला होता. यावेळी तरुण डान्स स्टेप्स करत होता. त्यावेळी त्याच्यासोबत आलेला एक मुलगा दुकानाचे शटर उघडत होता. दुसरा मुलगा त्याचा मोबाइल बघत होता. तरुण संथ गतीने रील बनवत होता. तर त्याच्या सोबत असलेल्या दोन मुलांपैकी एक लोखंडाच्या जाळीवर बसला होता. तो पुन्हा त्याला परत जायला सांगतो. मुलगा परत जातो आणि लोखंडाच्या जाळीजवळ येताच तो जाळी उचलतो. त्याने लोखंडी जाळी उचलताच त्याचा पाय घसरतो. यावेळी लोखंडी जाळीही बंद होते. तेथे उपस्थित मुले त्याला वाचवण्यासाठी धावतात. त्यानंतर जाळीत अडकल्यानंतर त्याची मान धडापासून वेगळी होऊन मान व शरीर चौथ्या मजल्यावरून तिसऱ्या मजल्यावर अलगद पडले. या दरम्यान, खाली संपूर्ण मजल्यावर रक्त पसरले.



# जम्मू आणि काश्मीरला मिळणार पूर्ण राज्याचा दर्जा; नायब राज्यपालांची मंजुरी

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

जम्मू आणि काश्मीर राज्यातून लडाख वेगळा करत हे दोन्ही प्रदेश केंद्रशासित करण्यात आले होते. यानंतर आता जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या प्रस्तावाला नायब राज्यपालांची मंजुरी दिली आहे. उमर अब्दुल्ला यांच्या कॅबिनेटनं दोन दिवसांपूर्वीच या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. त्यामुळं आता नायब राज्यपालांनी मंजुरी दिल्यानं केंद्र सरकार यावर काय निर्णय घेतंय हे पाहावं लागणार आहे.

जम्मू आणि काश्मिरला पूर्ण राज्याचा दर्ज देण्याचा प्रस्वात गुरुवारीच मंजूर झाला होता. पण आज अधिकृतरित्या हा निर्णय घेण्यात आला आहे. ४ नोव्हेंबर रोजी जम्मू आणि काश्मीर विधानसभेचं पहिलं अधिवेशन सुरु होणार आहे. तत्पूर्वीच कॅबिनेटनं जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. या प्रस्तावात म्हटलं आहे की, पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करणं ही राज्याच्या विकास प्रक्रियेची सुरुवात असेल. यामुळं जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना आपले संविधानिक अधिकार पुन्हा प्राप्त होतील. यामुळं त्यांची ओळख कायम ठेवली जाईल.

नवनिर्वाचित ओमर अब्दुल्ला यांच पक्ष नॅशनल कॉन्फरन्स हा जम्मू आणि काश्मीरच्या लोकांची ओळख आणि अधिकारांचं



संरक्षणाचं वचन देत सत्तेत आला आहे. दरम्यान, नायब राज्यपालांच्या मंजुरीनंतर आता मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला येत्या काळात दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्र्यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती एनसीच्या प्रवक्त्यानं दिली आहे.

४ नोव्हेंबर रोजी राज्याचं हिवाळी अधिवेशन पार पडणार आहे. यावेळी राज्यपालांसाठी अभिभाषण देखील तयार करण्यात आलं आहे. याचा मसुदा मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आला होता.तसंच मुबारक गुल यांना प्रोटेम स्पीकर म्हणून नियुक्त करण्याची शिफारस नायब राज्यपालांकडं करण्यात आली आहे. याला राज्यपालांनी मंजुरी देखील दिली आहे. त्यामुळं आता २१ ऑक्टोबर २०२४ रोजी विधानसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांना ते शपथ देतील. कलम ३७० आणि ३४ अ हटवल्यानंतर केंद्र सरकारनं जम्मू आणि काश्मीर राज्याचं विभाजन करुन त्यातून जम्मू-काश्मीर आणि लडाख असे दोन भाग केले आहेत. या दोन्हींना केंद्रशासित राज्यांचा दर्जा देण्यात आला आहे. तसंच जम्मू आणि काश्मीरला स्वतःची विधानसभा असणार आहे, त्यामुळं इथं रितसर निवडणुका होणार आहेत. तर लडाखला विधानसभा असणार नाही, हा भाग थेट केंद्र सरकारच्या अखत्यारित असणार आहे.

# 'बियर्डलेस बॉयफ्रेंड की तमन्ना अब हमारे दिल में है'

## खोटी दाढी लावून तरुणींची इंदूरमध्ये जोरदार घोषणाबाजी




**वृत्तसंस्था**
**इंदूर**

"सोशल मीडियावर एक व्हिडीओ सध्या तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये काही तरुणी या एक रॅलीमध्ये घोषणा देताना दिसत आहेत. 'बियर्ड हटाव प्यार बचाव' अशा घोषणा या तरुणी देत असून त्यांचा व्हिडीओची सर्वदूर चर्चा होताना पाहायला मिळत आहे.

हा व्हिडीओ मध्यप्रदेशातील इंदौरचा असल्याचे सांगितले जात आहे. या रॅलीमध्ये सहभागी झालेल्या तरणींनी हातात काही पाट्या देखील घेतल्याचे पाहायला मिळत आहे. ज्यावर काही घोषवाक्य लिहीण्यात आली आहेत, जसे की 'बियर्डलेस बॉयफ्रेंड की तमन्ना अब हमारे दिल में है', बियर्ड हटाओ, प्यार बचाओ, बियर्ड रखो या गर्लफ्रेंड रखो चॉइस तुम्हारी, नो क्लीन शेव्ह नो लव्ह, अशा आशयाचे पोस्टर सर्वांचे लक्ष वेधत आहेत. यासोबतच व्हिडीओमध्ये मुलींनी चेहऱ्यावर खोटी दाढी लावल्याचे दिसते.

या मजेशीर व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या भरभरून कमेंट्स येत आहेत. अनेकांनी अशा पद्धतीची रॅली काढणे हे करमणूक करणारं असल्याचं म्हटलंय तर काहीजण याला रील्ससाठी करण्यात आलेला स्टंट म्हणत आहेत. मात्र ही रॅली काढण्यामागचा नेमका उद्देश काय आहे हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. हा कुठल्यातरी प्रमोशन कॅम्पेनचा भाग असण्याची शक्यता आहे.

हा व्हायरल व्हिडिओ एका युजरने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर शेअर करण्यात आला आहे. तसेच हा व्हिडिओ आतापर्यंत लाखो वेळा पाहिला गेला आहे आणि अनेकांनी तो लाईकही केला आहे.

पान १ वरुन

## राज्यातील प्रत्येक मतदारसंघात १० हजार मतांची फेरफार

"आमच्याकडे खूप गंभीर काही माहिती आहे. देशातील निवडणुका निष्पक्ष घेण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. मात्र, त्या अधिकाराचे उल्लंघन सुरु आहे. निवडणुकीमध्ये आपण विजयी होऊ शकत नाही, आपण सत्ता गमावत आहोत, या भितीने देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी हे मोठं कारस्थान लोकशाही विरोधात रचलं आहे. त्यासंदर्भात एक महाविकास आघाडीचे नेते निवडणूक आयोगालाही भेटले आहेत. काही मतदारसंघ त्यांनी ठरवलेले आहेत. त्यासाठी विशेष ॲपची निर्मिती करून प्रत्येक मतदारसंघात किमान १० हजार मते त्यामधून काढून टाकायची आणि तेवढी मते त्या ठिकाणी दुसरे बाहेरील राज्यातील टाकण्याचे कारस्थान समोर आलेलं आहे. १५० मतदारसंघात हा घोळ सुरु आहे. प्रत्येक मतदारसंघात भाजपाच्या टीम या कामाला लागल्या आहेत. याचे सुत्रधार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे असल्याचं मला दिसत आहे. या राज्याच्या भविष्याचा हा मुद्दा आहे. मात्र, आम्ही हे षडयंत्र उधळून लावू आणि वेळ पडली तर निवडणूक आयोगावर मोठा मोर्चा काढू", असा इशारा संजय राऊत यांनी दिला. "ज्या प्रमाणे संजय राऊत यांनी सांगितलं की, महाराष्ट्रातील काही मतदारांची नावे कट करून छत्तीसगड, मध्य प्रदेशसह बाहेरच्या राज्यातील काही मतदारांची नावे त्यामध्ये टाकून १०, १० हजार नावे जोडली जात आहेत. त्यामध्ये राज्यातील काही अधिकारी सहभागी झाले आहेत. आम्ही याची माहिती निवडणूक आयोगाला दिली. त्यामुळे ही सर्व व्यवस्था तातडीने दुरुस्त करावी, असं आम्ही आवाहन केलं आहे. निवडणुकीत पारदर्शकता आहे का? याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. पण हे महाराष्ट्र कदापी सहन करणार नाही. भाजपा महाराष्ट्राच्या लोकांचं गळा घोटण्याचं काम करत असेल तर आम्ही ते खपवून घेणार नाही. आम्ही निवडणूक आयोगालाही सूचित करत आहोत की हे लोकशाहीचा गळा घोटण्याचं काम सुरु झालं आहे, हे थांबलं पाहिजे", असं नाना पटोले म्हणाले.

# झारखंडमध्ये निवडणूक आयोगाची मोठी कारवाई; पोलीस महासंचालकांना हटविले

**वृत्तसंस्था**
**रांची**

गेल्या निवडणुकीत पोलीस महासंचालक अनुराग गुप्ता यांच्याविरोधात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यामुळे यावेळच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी गुप्ता यांना तात्काळ हटविण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेचा निधी रोखल्यानंतर निवडणूक आयोगाने झारखंडकडे आपला मोर्चा वळविला आहे. तेथील पोलीस महासंचालकांना पदावरून हटविण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या निवडणुकीत पोलीस महासंचालक अनुराग गुप्ता यांच्याविरोधात अनेक तक्रारी प्राप्त




झाल्या होत्या. यामुळे यावेळच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी गुप्ता यांना तात्काळ हटविण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. गुप्ता यांना हटविण्यामागे त्यांच्या इतिहास तक्रारींचा असल्याचा हवाला देण्यात आला आहे.

गुप्ता यांना हटविल्यानंतर राज्य सरकारला अहवालही सादर करण्यास सांगितला आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीवेळी गुप्ता यांच्यावर पक्षपातीपणा केल्याचा आरोप झामुमोकडून करण्यात आला होता. यानंतर त्यांना झारखंडच्या एडीजी (विशेष शाखा) पदावरून कर्तव्यमुक्त करण्यात आले होते. यानंतर त्यांना दिल्लीला पाठविण्यात आले होते. तसेच निवडणूक प्रक्रिया पूर्ण होत नाही तोवर राज्यात परतण्यावर बंदी आणण्यात आली होती.

२०१६ मध्येही गुप्ता यांच्यावर राज्यसभा निवडणुकीत पदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप करण्यात आला होता. निवडणूक आयोगाने चौकशीनंतर त्यांच्याविरोधात चार्जशीट जारी केली होती. यानंतर त्यांच्यावर विभागीय चौकशी लावण्यात आली होती. हा सर्व इतिहास पाहता यावेळी निवडणूक आयोगाने गुप्ता यांच्यावर ही कारवाई केली आहे.

# सुवर्ण मंदिरात वृद्धाचा आत्महत्येचा प्रयत्न

## तलावात उडी मारली

**वृत्तसंस्था**
**अमृतसर**

अमृतसरचे संस्थापक श्रीगुरु रामदास जी यांच्या प्रकाश पर्वावर सुवर्ण मंदिरात एका भाविकाने आत्महत्येचा प्रयत्न केला. वृद्ध व्यक्तीने तलावात उडी मारली. ज्याला टास्क फोर्स आणि एसजीपीसी कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत वाचवले. सध्या या वृद्धाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गुरू रामदासजींच्या प्रकाश पर्व सोहळ्यासाठी लाखो भाविक सुवर्ण मंदिरात दर्शनासाठी आले होते. अचानक एका वृद्धाने तलावात उडी घेतल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आत्महत्येच्या विचाराने वृद्धाने उडी घेतली. मात्र शिरोमणी गुरुद्वारा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि टास्क फोर्स टीमने तत्परता दाखवत त्याचवेळी त्याला तलावातून बाहेर काढले. त्यानंतर वृद्धाला प्राथमिक उपचार करून शुद्धीवर आणण्यात आले, त्यानंतर पोलिस प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आले. पोलीस प्रशासनाने रुग्णवाहिका बोलावून त्याला उपचारासाठी रुग्णालयात पाठवले. जिथे त्याच्यावर अजूनही उपचार सुरू आहेत. वृद्धेने उडी का मारली हे पूर्ण शुद्धीवर आल्यानंतरच कळेल. हा वृद्ध कोठून होता हे अद्याप समजू शकलेले

# उत्तर प्रदेशात महिला कॉन्स्टेबलची शिरच्छेद करून हत्या

**वृत्तसंस्था**
**मुरादाबाद**

दोन दिवसांपूर्वी मुरादाबादमधील रामगंगेच्या काठावर आढळून आलेला शिरच्छेद मृतदेह पोलिस हवालदाराचा होता. रिंकी असे त्या महिला कॉन्स्टेबलचे नाव होते. या दिवसांत रिंकी रामपूरच्या महिला पोलिस ठाण्यात तैनात होत्या. सुमारे 15 दिवसांपासून त्या बेपत्ता होत्या. रिंकी यांच्या पतीने आपल्या मुलीची हत्या करून मृतदेह लपवल्याचा आरोप करत पालकांनी रामपूरच्या सिव्हिल लाइन्स पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केला होता.

एसपी सिटी रणविजय सिंह यांनी पत्रकार परिषद घेऊन महिलेच्या मृतदेहाची ओळख पटवण्याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले - रिंकी रामपूरच्या महिला पोलिस ठाण्यात तैनात होती, तर तिचा पती सोनू कुमार रामपूरमध्येच स्पेशल ब्रांच (इंटेलिजन्स युनिट) मध्ये तैनात आहे. रिंकी आणि सोनू कुमार दोघेही बिजनौर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. दोघांची नियुक्ती रामपूरमध्येच होती. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या पालकांनी तिचा हवालदार पती सोनू कुमारविरुद्ध रामपूरच्या पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केला होता.

# मंत्र्यांचा पुतळा जाळताना काँग्रेस कार्यकर्ते भाजले

## लखनौमधील घटना; एसीपीही पडले आगीच्या भक्ष्यस्थानी

**वृत्तसंस्था**
**लखनौ**

लखनऊमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी मंत्री दिनेश प्रताप यांचा पुतळा जाळला. पुतळा जाळताना काँग्रेस कार्यकर्तेही भाजले. त्यांना वाचवण्यासाठी आलेले एसीपीही आगीच्या भक्ष्यस्थानी आले. पोलिसांनी कार्यकर्त्यांना तेथून हटवून इको गार्डनमध्ये पाठवले.

मंत्री दिनेश प्रताप सिंह यांनी X वर प्रियंका गांधी यांना वृद्ध महिला असे लिहिले होते. तेव्हापासून लखनऊ ते दिल्लीपर्यंत निदर्शने सुरू आहेत. दिनेश प्रताप सिंह यांनी माफी मागावी, अशी मागणी काँग्रेस कार्यकर्ते करत आहेत.

शनिवारी दुपारी एक वाजता काँग्रेस कार्यकर्ते निदर्शने करणार होते. याबाबत पोलिसांना माहिती मिळाली होती. कार्यकर्त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी सकाळपासूनच विधानसभा आणि मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठा फौजफाटा तैनात केला होता. पोलिसांना चकमा देण्यासाठी काही कार्यकर्ते काँग्रेस मुख्यालयात उपस्थित होते. दरम्यान, व्हीव्हीआयपी गेस्ट हाऊसजवळ काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले. पोलिस येताच दिनेश प्रताप सिंह यांचा पुतळा जाळण्यात आला. आग विझवण्यासाठी आलेले एसीपी अरविंद वर्मा हेही भाजले.

कार्यकर्त्यांनारोखण्यासाठी पोलिसांनी ट्रिपल लेअर बॅरिकेडिंग केले होते. हुसेनगंज, हजरतगंज आणि गौतम पल्लीसह तीन पोलिस ठाण्यांतील फौजफाटा तैनात करण्यात आला होता. संतप्त कार्यकर्त्यांनी बॅरिकेडिंगवर चढून घोषणाबाजी केली. पोलिसांनी आंदोलक कार्यकर्त्यांना इको गार्डनमध्ये नेले.

# हरियाणात तरुणाला मृत्यूनंतर 2 सरकारी नोकऱ्या

**चंदीगड**


हरियाणा स्टाफ सिलेक्शन कमिशनने (HSSC) ग्रुप-सी आणि डी भरती परीक्षेचा निकाल जाहीर केला. ज्यामध्ये नारनौलच्या मुकेशची गट क आणि गट ड मध्ये निवड झाली. त्याची क गटात पटवारीसाठी निवड झाली. 2 सरकारी नोकऱ्यांमध्ये निवड झाल्याचा मेसेज मोबाईलवर आल्यावर घरच्यांचे डोळे पाणावले. कारण निकालाच्या 47 दिवस आधी मुकेशचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. ज्या दिवशी निकाल लागला तो मुकेशचा वाढदिवस होता. आता या नोकऱ्यांचे काय करणार, असे त्याचे कुटुंबीय म्हणतात. काम करायला कोणी नसताना आम्ही काय करणार? मुकेशचे कुटुंब नारनौलच्या मोती नगरमध्ये राहते. त्यांचे वडील सीता राम हे व्यवसायाने व्यापारी आहेत. मुकेशने फॉर्म कधी भरला हे घरच्यांना कळले नाही.

# हिमाचलमध्ये अश्लील व्हिडिओ बनवून ब्लॅकमेलिंग

**वृत्तसंस्था**
**भुवनेश्वर**

हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यातील पालमपूरमध्ये दोन महिलांनी एका व्यक्तीला मशरूम खरेदीच्या बहाण्याने घरी बोलावले आणि अश्लील व्हिडिओ बनवून ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. पालमपूर पोलिसांना दिलेल्या तक्रारीत पीडिताने हा आरोप केला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित



मशरूमचा व्यवसाय करतो. रामचौक येथील एका महिलेने गेल्या गुरुवारी त्या व्यक्तीला तिच्या घरी बोलावले आणि त्याला मशरूम देण्यास सांगितले. ती व्यक्ती घरी पोहोचताच त्याला पहिले पाणी प्यायला दिले आणि दरवाजा बंद केला. यानंतर दोन्ही महिलांनी अंगावरील कपडे काढून त्या पुरुषासोबत अश्लील कृत्य केले. या अश्लील कृत्याचा व्हिडिओ बनताच घरातील दुसऱ्या खोलीत आधीच उपस्थित असलेल्या आणखी दोघांनी त्या व्यक्तीला बेदम मारहाण केली. पोलिसांना दिलेल्या तक्रारीत पीडिताने दोन महिला आणि दोन पुरुष आपल्याला ब्लॅकमेल करत पैशांची मागणी करत असल्याचा आरोप केला आहे.

# बॉम्बच्या धमकीनंतर 20 विमानांचे इमर्जन्सी लँडिंग

## 6 दिवसांत 40 हून अधिक विमानांना खोट्या धमक्या

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

इंडियन एअरलाइन्सच्या २० हून अधिक विमानांना शनिवारी बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. यामध्ये इंडिगो, एअर इंडिया, आकासा, विस्तारा, स्पाइसजेट, स्टार एअर आणि अलायन्स एअर यांचा समावेश आहे.

गेल्या एका आठवड्यात 40 हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या असून त्या सर्व खोट्या असल्याचे सिद्ध झाले आहे. या धमक्यांमुळे आतापर्यंत 80 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

सततच्या धमक्यांमुळे केंद्र सरकारने 16 ऑक्टोबर रोजी विमानांमध्ये एअर मार्शलची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेतला होता. गृह मंत्रालयाने विमान वाहतूक मंत्रालयाकडूनही अहवाल मागवला आहे.




वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, इंडिगोच्या तीन विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. यामध्ये दिल्ली आणि मुंबईहून इस्तंबूलला जाणाऱ्या इंडिगोचाही समावेश आहे. याशिवाय विस्ताराच्या उदयपूर ते मुंबई विमानालाही धमकी मिळाली होती. या सर्व विमानांचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले.

लंडन आणि दुबईला जाणाऱ्या विमानांना बॉम्बची धमकी शुक्रवारी रात्री उशिरा एअर इंडिया एक्स्प्रेस आणि विस्तारा एअरलाइन्सच्या प्रत्येकी एका फ्लाइटमध्ये बॉम्बची धमकी देण्यात आली होती. यापैकी दिल्लीहून लंडनला जाणारे विस्तारा विमान फ्रँकफर्टला वळवण्यात आले. तर 189 प्रवाशांना घेऊन दुबई जयपूरला येणारे एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाइट (IX-196) दुपारी 1:40 वाजता जयपूरमध्ये आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. तपासादरम्यान दोन्ही विमानांमध्ये काहीही संशयास्पद आढळले नाही.

मुंबई पोलिसांनी एकाला अटक केली विमानात बॉम्ब ठेवल्याची खोटी बातमी पसरवल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली असून एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. त्याने १४ ऑक्टोबरला इंडिगोच्या विमानात बॉम्ब ठेवण्याची धमकी दिली होती. सततच्या धमक्यांमुळे दिल्ली पोलिसांनी 6 एफआयआर नोंदवले आहेत. दुसरीकडे, विमानात बॉम्ब असल्याचा खोटा दावा करणारी 10 सोशल मीडिया खाती सरकारने ब्लॉक केली आहेत.



# झाकीर नाईक लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांना भेटला

## भारतातील वॉन्टेड इस्लामी प्रचारक पाकिस्तान दौऱ्यावर

**वृत्तसंस्था**
**लाहोर**

भारतातील वॉन्टेड इस्लामिक धर्मोपदेशक झाकीर नाईक पाकिस्तानमध्ये दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाच्या लोकांसोबत दिसला.एका वृत्तानुसार झाकीर लाहोरमधील बादशाही मशिदीत एका कार्यक्रमात सहभागी झाला होता. तेथे त्यांनी सुमारे दीड लाख लोकांच्या जमावासमोर भाषण केले. यादरम्यान तो लष्कर-ए-तैयबाचा कमांडर मुजम्मिल इक्बाल हाश्मी, मोहम्मद हरिस धर आणि फैसल नदीमसोबत दिसला.

2008 पासून अमेरिकेने या तिघांना आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित केले आहे. या बैठकीनंतर फैसल नदीम आणि मुझम्मिल हाश्मी यांनी झाकीरच्या भेटीचा प्रचार करण्यासाठी ऑनलाइन मोहीमही चालवली.

झाकीरच्या भेटीचा भारताने निषेध केला झाकीर 30 सप्टेंबरला पाकिस्तानात पोहोचला. महिनाभराच्या दौऱ्यावर ते येथे आले आहेत. त्यांचा हा दौरा राज्य पाहुणे म्हणून असतो, जो सहसा परदेशातील उच्च प्रोफाइल नेत्यांना दिला जातो. झाकीरच्या दहशतवाद्यांसोबतच्या भेटींमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर चिंता वाढली आहे. झाकीरच्या भेटीचा भारताने निषेध केला आहे. भारतात वॉन्टेड आहे झाकीर झाकीर 2016 पासून भारतात वॉन्टेड आहे. त्याच्यावर भडकाऊ भाषणे, मनी लाँड्रिंग आणि दहशतवाद पसरवल्याचा आरोप आहे. खरं तर, जुलै 2016 मध्ये बांगलादेशची राजधानी ढाकामध्ये 5 दहशतवाद्यांनी हल्ला केला होता, ज्यामध्ये 29 लोक मारले गेले होते. या घटनेच्या तपासात अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एका आरोपीने झाकीर नाईकच्या भाषणाचा प्रभाव असल्याचे सांगितले होते. यानंतर मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेने या प्रकरणाचा तपास केला.

सुरुवातीच्या तपासानंतर, भारताच्या राष्ट्रीय तपास संस्थेने (NIA) 2016 मध्ये UAPA आणि इतर कलमांखाली त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला होता. यानंतर तो भारतातून सौदी अरेबियात पळून गेला. तेथून तो मलेशियाला गेला आणि तेव्हापासून तो तिथेच राहत होता. तेथे मलेशियाचे तत्कालीन पंतप्रधान महाथिर मोहम्मद यांनी त्यांना सरकारी संरक्षण दिले.

झाकीर नाईक 8 वर्षांपासून फरार 2017 मध्ये मुंबईच्या NIA कोर्टाने नाईकविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. यानंतर 2019 मध्ये मुंबईच्या विशेष न्यायालयानेही त्याच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. ईडीने त्याच्याविरुद्ध मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला होता.